नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६२ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## राहुल गांधी पाळत नाही सुरक्षा प्रोटोकॉल

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
केंद्रीय राखीव पोलीस दलाने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून राहुल गांधी यांनी सुरक्षा प्रोटोकॉलचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. इटली, व्हिएतनाम, दुबई, कतार, लंडन आणि मलेशिया यासारख्या देशांच्या दौऱ्यांदरम्यान राहुल गांधी यांनी सुरक्षा प्रोटोकॉलचे उल्लंघन केल्याचे सीआरपीएफने म्हटले आहे.

सीआरपीएफने राहुल गांधी यांना एक वेगळे पत्र लिहून या प्रकरणाची माहिती दिली आहे. पत्रात असे लिहिले आहे की त्यांच्या सुरक्षेचा विचार करता असे करणे गंभीर चिंतेची बाब आहे. अशा चुकांमुळे व्हीव्हीआयपी सुरक्षा कमकुवत होते. त्यांना धोक्यांचा सामना करावा लागू शकतो.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## खड्डों की बहार है... !

आज शेतकरी नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी एका अतिशय महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष वेधलेले आहे. कोल्हापूर ते पुणे हा राष्ट्रीय महामार्ग त्याच्या दरम्यानच्या खड्ड्यामुळे अत्यंत त्रासदायक आणि क्लेशदायक झालेला आहे. त्यामुळे या महामार्गावर टोल आकारणी बंद करण्यात यावी, अशी त्यांनी कोल्हापूर सर्किट बेंचकडे मागणी केली होती. विशेष म्हणजे न्यायमूर्तींनी त्यांची मागणी मान्य करून कोल्हापूर, सातारा, पुणे आणि सांगली येथील प्राधिकरण सचिवांना पुढील सुनावणीसाठी उपस्थित राहावे म्हणून उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने नोटीस बजावलेली आहे. टोलच्या बाबतीतला मूळ मुद्दा असा आहे की, एकदा का टोल सुरू झाला की तो कधीच बंद होत नसतो असे नाही. अनेक नाक्यांवरील टोल एक तर बंद किंवा रद्द झालेले आहेत. कारण राज ठाकरे यांच्या मनसे पक्षाने यापूर्वी आंदोलन करून महाराष्ट्रातील अनेक टोलनाके बंद करून टाकलेले आहेत. आपल्या देशातील रस्ते चांगले व्हावेत यासाठी आपले केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी जीवापाड झटत असतात. देशामध्ये त्यांनी सडक क्रांतीच केलेली दिसत आहे. त्यांना ज्या ज्या ठिकाणी कामात कुचराई केलेली लक्षात येते, त्या त्या ठिकाणी नितीनजी आपल्या स्टाईलने संबंधित अधिकाऱ्यांना झापण्यासही कमी करत नाहीत. बिना पैशाने रस्ते तयार होत नाहीत पण नितीनजी गडकरी यांची खासियत ही आहे की, ते त्यांच्या कौशल्यपूर्ण चातुर्याने नवनवे रस्ते तयार करीत आहेत. त्यामागे अर्थातच त्यांची इच्छाशक्ती आहे, तसाच त्यांचा निग्रही स्वभावही आहे. सरकार जवळ एवढा पैसा नसला तरी अनेक मोठमोठ्या कंपन्या या क्षेत्रात काम करण्यासाठी कार्यरत झालेल्या आहेत. या कंपन्या रस्त्यांसाठी लागणारे पैसे उभारतात म्हणजेच बँकेकडून पैसे घेतात, रस्ते बांधतात आणि पंधरा ते वीस वर्षात त्या रकमेचे व्याज आणि नफा मिळवून आपली वसुली मुद्दलीसह करतात. कोणाला पटो किंवा न पटो परंतु चांगले रस्ते होणे ही आता आपली आणि येणाऱ्या काळाची गरज झालेली आहे. आपल्या देशात ५०, ६० वर्षांपूर्वी अतिशय कमी गाड्या होत्या. साधी ॲम्बेसिडर किंवा फियाट गाडी ज्या व्यक्तीकडे असायची त्याचा तोरा त्या काळामध्ये मोठाच होता. केवळ काही बड्या लोकांजवळच विदेशातील गाड्या तत्कालीन काळामध्ये असत. आता ती परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. हल्ली घराघरात दोन चाकी वाहने आलेली आहेत. ज्यांच्याकडे पूर्वी दोन चाकी घेण्याचीही ऐपत नव्हती ते आता चारचाकी वाहन वापरत आहेत. लहान तालुक्याच्या गावात एखाद्याने पूर्वीच्या काळी म्हणजेच तत्कालीन येझडी अथवा राजदूत मोटार सायकल किंवा बुलेट आणली तर त्याला अगदी मोठाच मानसन्मान मिळत होता. आता दोन-चार घरांमागे एक ते दोन कार आणि प्रत्येक घरात दोन-तीन दुचाकी गाड्या तरी आहेतच. खेड्यापाड्यातील बैलजोड्या जाऊन दुचाकी वाहने भरमसाठ वाढलेली आहेत. गेल्या पन्नास वर्षांत जेवढी आपली लोकसंख्या वाढली त्याच्या पाच ते सहा पटीपेक्षाही जास्त चार चाकी आणि दोन चाकी वाहने वाढलेली आहेत. तसेच टोलाधारित रस्त्यांची संख्याही वाढलेली आहे. आता अगदी शेतीपर्यंत गाड्या पोहोचलेल्या आहेत. पण..., पण..., पण... आणि हा पणच अत्यंत धोक्याचा आहे. टोल नाक्यावर वसुली करण्यात येणारे बरेच रस्ते अजूनही खड्डेयुक्त आहेत. गाव किंवा तालुक्यामधील खड्डे सोडा. अगदी मुंबई, पुणे, नागपूर यासह मोठ्या शहरातील रस्तेही खड्डेमुक्त नाहीत. राष्ट्रीय महामार्गावर टोल आहे पण अनेक ठिकाणी खड्डेच आपल्या स्वागताला सिद्ध असतात. हल्ली भराभर नवनवे रस्ते तयार होतात. त्यातील अनेक सिमेंटचे रस्ते इतके खड्डेयुक्त असतात की त्याची धड दुरुस्तीही करता येत नाही. यामुळेच कोल्हापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गातल खड्डे दुरुस्त होत नाहीत. तोपर्यंत टोल आकारू नये ही मागणी रास्त नाही असे कोणी म्हणेल? आपल्या देशातील त्यासोबतच आपल्या राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे राज्य महामार्गाचे, जिल्हा तालुका आणि गावांना जोडणाऱ्या आंतर मार्गाचे आणि विशेषतः शहरातील महामार्गांचे एकदा ऑडिट झालेच पाहिजे. त्यासोबत जनतेला खड्ड्यातून बाहेर पडण्यासाठी चांगला रस्ता मिळाला पाहिजे. किमान एवढी अपेक्षा आपण बाळगली तर त्यात काही चुकीचे आहे असे आम्हाला वाटत नाही. नाहीतर लोकांनी नंतर असे म्हणू नये की, ₹टोलवालों की मार है, खड्डों की बहार है...₹ त्यामुळे चांगले रस्ते मिळावे अशी अपेक्षा करणे यामध्ये काही गैर नाही. कारण टोल आपण सारे भरतच आहोत. त्यासोबत अगदी हक्काने चांगले रस्ते मिळाले, तर तुमचा आमचा प्रवास सुखकर होईल. चांगले रस्ते मिळावे इतकीच आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## उद्योग आणि गुंतवणुकीसाठी

# महाराष्ट्र सर्वोत्तम राज्य

### आयएबीसीए ग्लोबल फोरम लिडर्स मीटमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांचा विश्वास



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. इज ऑफ ड्युईंग बिझनेस अंतर्गत राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि सीईओंसोबत राऊंटटेबल कॉन्फरन्स वेळी फडणवीस बोलत होते.

गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा समावेश आहे.

राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सेवा क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या साठी मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. एक खिडकी योजना असून उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करताना चांगला अनुभव यावा यासाठी प्रयत्नशील असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

वाढवण बंदरामुळे राज्य सागरी व्यापार क्षेत्रात महत्वाचा भागीदार असणार आहे. संपूर्ण राज्यातील महत्त्वाची ठिकाणे सहा तासाच्या अंतराने वाढवण बंदराशी जोडली जात आहेत. राज्यात सांडपाणी व्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. त्याचा ऑस्ट्रेलियातील उद्योगांनी फायदा घ्यावा. शासन उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक निर्णय घेत असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

या राऊंड टेबल कॉन्फरन्सपूर्वी फडणवीस यांनी निमंत्रित व उद्योगांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऑस्ट्रेलिया हा शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य देश आहे. अनेक भारतीय विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी जातात. आता हेच शिक्षण नवी मुंबई येथील एज्यूसिटी मध्ये मिळणार आहे.

यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल, ऑस्ट्रेलियाचे उच्चायुक्त फिलीप ग्रीन, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन यांच्यासह विविध उद्योगांचे प्रतिनिधी तसेच शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### गडचिरोली बनेल लोह राजधानी

महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षमतेबाबत मोठं चित्र उलगडलं आहे. राजधानी मुंबईपासून ते विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रापर्यंत विकासाचे नवे दालन उघडण्याची तयारी सुरु आहे. पण सगळ्यात मोठं विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे ऑस्ट्रेलियातील करारामुळे गडचिरोलीतील खाणकाम उद्योगाला तंत्रज्ञान मिळणार असून, त्यामुळे गडचिरोली लोह उद्योगाचं नवं केंद्र बनणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केले.

### भारत आणि मॉरिशस भागीदार नाहीत

## तर एक कुटुंब : मोदी



■ वृत्तसंस्था, वाराणसी, दि. ११ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुरूवारी वाराणसी दौऱ्यावर होते. येथे त्यांनी मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांची भेट घेतली. दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय चर्चा झाली. यामध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत आणि मॉरिशस हे भागीदार नाहीत, तर कुटुंब आहेत. ही केवळ औपचारिकता नाही, तर एक आध्यात्मिक मिलन आहे.

त्याच वेळी, मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलाम म्हणाले, भारत नेहमीच मॉरिशसच्या प्रगती आणि विकासाच्या प्रवासात त्यांच्यासोबत राहिला आहे. वाराणसीला पोहोचल्यावर, आमच्या स्वागताने मी आणि माज्या पत्नीला आश्चर्य वाटले. मला विश्वास आहे की, इतर कोणत्याही पंतप्रधानांचे असे स्वागत झाले नसते. मला आनंद आहे की, हा तुमचा मतदारसंघ आहे. तुम्ही इतका मोठा विजय कसा मिळवला हे मी समजू शकतो.

त्याआधी, पोलिस लाईनवरून ३ किमी लांबीचा रोड शो केल्यानंतर पंतप्रधान मोदी हॉटेल ताज येथे पोहोचले. यावेळी हजारो लोक त्यांचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या कडेला उभे होते. त्यांनी ताफ्यावर फुलांचा वर्षाव केला. त्यांनी शंख वाजवले. उत्साह पाहून पंतप्रधानांनी ड्रायव्हरला गाडी लोकांच्या जवळ नेण्यास सांगितले.

बुधवारी (१० सप्टेंबर) रात्री उशिरा, यूपी काँग्रेस अध्यक्ष अजय राय यांच्यासह २०० काँग्रेस-सपा नेत्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. प्रत्यक्षात, यूपी काँग्रेसने कथित मतचोरीच्या प्रकरणी वाराणसीमध्ये निषेधाची घोषणा केली होती.

## छत्तीसगडमध्ये १० नक्षलवादी ठार

■ वृत्तसंस्था, गरियाबंद, दि.११ :
छत्तीसगडमधील गरियाबंद जिल्ह्यात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. १० नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्त आहे. १ कोटी रुपयांचे बक्षीस असलेला नक्षलवादी बालकृष्णही मारला गेल्याचे वृत्त आहे. ही चकमक मैनपूरच्या जंगलात झाली. एसपी निखिल राखेचा यांनी चकमकीला दुजोरा दिला आहे.

रायपूर रेंजचे आयजी अमरेश मिश्रा यांनी सांगितले की, सुरक्षा कर्मचारी मैनपूर पोलिस स्टेशन परिसरातील जंगलात नक्षलविरोधी कारवाईवर होते, तेव्हा त्यांचा सामना नक्षलवाद्यांशी झाला आणि दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. एसटीएफ, कोब्रा (सीआरपीएफची कमांडो बटालियन फॉर रिझोल्यूट ॲक्शन) आणि राज्य पोलिस कर्मचारी या कारवाईत सहभागी आहेत. अजूनही अधूनमधून गोळीबार सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किमान १० नक्षलवादी ठार झाले आहेत.

## आरक्षण असताना गॅझेटीयर कशासाठी?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर छगन भुजबळ यांनी उघडपणे सरकारने काढलेल्या शासन निर्णयाला विरोध केला आहे. छगन भुजबळ पत्रकार परिषद घेत म्हणाले, मराठा म्हणून त्यांना आधीपासून १० टक्के आरक्षण असताना आता हैदराबाद गॅझेटियर कशासाठी? असा सवाल भुजबळ यांनी केला.

## मतचोरीचे पुरावे देऊ

■ वृत्तसंस्था, रायबरेली, दि.११ :
काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी गुरुवारी रायबरेलीमध्ये सांगितले - आम्ही मत चोरीचे हमी पुरावे देणार आहोत. आम्ही अधिक गतिमान स्फोटक पुरावे देऊ. भाजपचे लोक चिडचिड करत आहेत. मी म्हणू इच्छितो की चिडचिड करू नका. कारण, जर हायड्रोजन बॉम्ब आला, तर सर्वकाही नष्ट होईल.

ते म्हणाले, मतचोर गद्दी छोड' हा नारा संपूर्ण देशात सुरू आहे. तो आगीसारखा पसरत आहे. हेच सत्य आहे. मते चोरून सरकारे स्थापन केली जात आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक आणि हरियाणाच्या निवडणुकीत मतांची चोरी झाली आहे. आम्ही तीन राज्यामधील मतचोरीचा ब्लॅक अँड व्हाईट पुरावा दिला.

## नेपाळमध्ये अंतरिम ढटवरून जेन झेड तरुणांत हाणामारी

■ वृत्तसंस्था, काठमांडू, दि. ११ :
नेपाळमध्ये अंतरिम पंतप्रधानाच्या नावावर एकमत होत नाहीये. गुरुवारी जेन झी दोन गटात विभागले गेले. त्यानंतर लष्कराच्या मुख्यालयाबाहेर दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाली. यामध्ये अनेक तरुण जखमी झाले.

निदर्शकांच्या एका गटाने अंतरिम पंतप्रधानपदासाठी सुशीला कार्की यांचे नाव नाकारले आहे. सुशीला कार्की भारत समर्थक असल्याचा आरोप या गटाचा आहे आणि त्यांना हे मान्य नाही.

काठमांडूचे महापौर बालेन शाह यांना पंतप्रधान बनवण्याची मागणी या गटाकडून केली जात आहे. यावरून तरूणांमध्ये संघर्ष उफाळला आहे.

# नागरिकांना मिळणार आता व्हॉट्सॲपवर सेवा


### आपले सरकारचे दुसरे व्हर्जन येणार, मुख्यमंत्री फडणवीसांचा मोठा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
डिजिटलाइझ पद्धतीने सेवा देण्याचे काम सरकार सुरू करत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. नागरिकांना आता व्हॉट्सॲपवर सेवा मिळणार असून, त्यात २०० सेवा आणि योजना २६ जानेवारीपर्यंत नागरिकांना डिजिटलाइझ पद्धतीने मिळण्यास सुरुवात होणार असल्याचे देखील फडणवीस यांनी सांगितले आहे.

पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो तेव्हा सेवा हमी कायदा केला होता, याची आपल्याला कल्पना आहे. आता आपले सरकारचे व्हर्जन जुने झाले असून आपण समग्र नावाच्या संस्थेशी करार केला आहे. त्यानुसार, नागरिकांना कोणत्या योजनांची निकड आहे, याचा अभ्यास केला आहे. आता आपण डिजिटल पद्धतीने सेवा देण्याचे प्रयत्न करणार आहोत. लोकांकडून जी मागणी येते, त्यात सेवा आणि योजनांची मागणी येते. त्यामुळे डिजिटलाइझ पद्धतीने सेवा देण्याचे काम सरकार सुरू करणार आहे.

राज्यात सेवा आणि सुविधा संदर्भातील डिजिटलाइझ पद्धतीचा पहिला टप्पा २६ नोव्हेंबरपर्यंतच पूर्ण होईल. सरकारकडे असलेल्या रेकॉर्ड वरूनच आपण माहिती भरणार आहोत, आपले सरकारचे हे दुसरे व्हर्जन येत आहे. यात चार टप्पे असतील, नागरिकांना केलेल्या अर्ज सध्या कुठे आहे, हेही पाहता येणार आहे. तसेच लोकांना डिजिटल सेवा मिळणे आणि प्रेडेक्टेबल होणार, व्हॉट्सॲपवर देखील सेवा उपलब्ध करून देणार आहोत, अशी देखील माहिती फडणवीस यांनी दिली.

### आरक्षणाचा जीआर कायदेशीरच



मराठा आरक्षणाचा राज्य सरकारने काढलेला जीआर पूर्णपणे कायदेशीर असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. या जीआर विरोधात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. आमचे सरकार असेपर्यंत ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. त्यामुळे या जीआरला विरोध करणाऱ्या ओबीसी नेत्यांनी आधी जीआर समजून घेण्याची मागणी देखील त्यांनी केली.



# अर्थव्यवस्था कोलमडली

## सुप्रिया सुळेंचा अर्थमंत्र्यांवर हल्लाबोल



■ **मुंबई :** सरकारकडे योजनांसाठी देण्यास देखील पैसे नाही. लाडकी बहिण योजनेतही पहिल्याच टप्प्यात २६ लाख महिलांना वगळण्यात आले आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. या माध्यमातून त्यांनी नाव न घेता अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला.

पत्रकारांशी बोलताना सुप्रिया सुळे यांनी आरोप केला की, योजनांसाठी निधी मिळत नाही, कारण सरकारकडे पैसे नाही. सरकारने याचा विचार करावा. फिक्सल डिफिसिएट मॅनेजमेंट कायदा हा अटल बिहारी वाजपेयी सरकारने केला आहे. मात्र, सरकारची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. याला कोण जबाबदार आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# मराठा आरक्षणावर सरकारची दुहेरी भूमिका : वडेट्टीवार



**मुंबई :** कुणबी प्रमाणपत्र देत असताना तो ओरिजनल कुणबी असावा त्याबद्दल कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. आरक्षण हे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक या तिन्ही बाबीवर त्या निकषांमध्ये सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणा यावर या आरक्षणाची नीव आहे. सर्वच समाज कुठल्या ना कुठल्या आरक्षणामध्ये घुसत असेल तर या देशातील आणि राज्यातील याच्या पलीकडचा पुढारलेला समाज कोण हे आता दुर्बिणी लावून शोधावे लागतील, असे म्हणत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसी तून आरक्षण दिले तर परिणाम होणार नाही म्हणतात काय प्रशासन आहे.सामाजिक न्याय विभागाच्या लोकांना अक्कल-बिक्कल आहे का नाही. पहिला जी आर काढला त्यानंतर पुन्हा दुसरा जी आर काढला, पहिला जी आर रद्द करण्यापूर्वीच दुसरा जी आर काढलात. सामाजिक न्याय विभागाला इतकीही अक्कल नाही. दुसरा जी आर काढत असताना पहिला जी आर रद्द करणे गरजेचे आहे. पहिला जी आर तरी रद्द केला पाहिजे.

वडेट्टीवार म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांची बैठक घ्यावी आणि परिणाम होतो का नाही होत हे समजून सांगितले पाहिजे. किती नुकसान होणार हे सीएम यांनी बैठक घेत समजून सांगितले पाहिजे. मराठा समाज कुणबीमध्ये आला तर कसे नुकसान होणार नाही, आमचे आरक्षण कसे कमी होत नाही. परिणाम होतो का नाही, नुकसान होणार का नाही हे मुख्यमंत्री सांगू शकतील का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.

उदय सामंत जे म्हणत आहे ते खरे आहे. पण महायुतीच्या नेत्यांमध्ये मराठा आरक्षणावरून मतभेद आहेच ना? उदय सामंत यांची भूमिका हे आम्हाला माहिती नाही. पण त्याच्यातही मतभेद आहेच ना. मराठा समाजातही काही लोक वेगळी भूमिका मांडत आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# चेंबूरकर तरुणाची पॉवरलिफ्टिंगमध्ये ऐतिहासिक कामगिरी

**मुंबई :** मुंबईकरांची छाप आता जगभर झळकतेय. क्रीडा क्षेत्रातले अनेक विक्रम मोडत, भारताचा झेंडा उंचावणारा एक चेंबूरचा तरुण आता जागतिक पातळीवर चर्चेत आला आहे. ही केवळ वैयक्तिक जिद्द नाही, तर संपूर्ण देशाच्या अभिमानाचा क्षण ठरला आहे.

अमेरिकेतील कोस्टा रिका, सॅन होजे येथे नुकतीच वर्ल्ड सब ज्युनियर आणि ज्युनियर क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ पार पडली.

जगभरातील तगड्या खेळाडूंमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून उभा राहिलेला चेंबूरचा रहिवासी चैतन्य पंदेकर आपल्या दमदार कामगिरीने अव्वल ठरला.

अत्यंत कठोर सराव, शिस्त आणि मानसिक ताकद यांच्या जोरावर चैतन्यने मैदानात जे दाखवलं, ते जागतिक स्तरावर भारतीय तरुणाईची ताकद अधोरेखित करणारं ठरलं. ६६ किलो इक्विप्ड गटात त्याने जबरदस्त झुंज देत डेडलिफ्टमध्ये सिल्वर मेडल पटकावलं आणि ओव्हरल ४ था क्रमांक मिळवत भारताचा झेंडा उंचावला.

२५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत चैतन्यच्या विजयामुळे पॉवरलिफ्टिंग इंडियाला आंतरराष्ट्रीय रंगमंचावर मानाचं स्थान मिळालं आहे.

थोडक्यात चेंबूरचा चैतन्य पंदेकर आता जगभरातल्या पॉवरलिफ्टिंग विश्वात नवा आदर्श ठरला आहे!

# महामंडळाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थींना द्या

## अजित पवार यांचे निर्देश : सारथीसह अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने राबवण्यात येणा?्या प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील योग्य व पात्र लाभार्थींपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी विशेष काळजी घेण्यात यावी. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थींना त्याचा फायदा व्हावा, यावर भर देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कामाचा आढावा त्यांनी घेतला.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामाचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, नियोजन विभागाचे सहसचिव विवेक गायकवाड यांच्यासह दूर दृश्य प्रणालीद्वारे सहकार आयुक्त दीपक तावरे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ राजेश देशमुख, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय




संचालक विजयसिंह देशमुख, महाराष्ट्र बँकेचे महाव्यवस्थापक अरुण कबाडे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक आकाश मोरे, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास प्रवगार्तील सुरक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज योजना अशा विविध योजना राबवण्यात येतात.

या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थींना त्याचा फायदा व्हावा. या योजनांची माहिती गरजूंपर्यंत योग्य प्रकारे पोहोचवणे ही महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगून, योजनांचा प्रचार-प्रसार प्रभावीपणे करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

महामंडळ मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये तसेच योग्य लाभार्थींची निवड करून त्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळावी यासाठी यंत्रणांनी विशेष लक्ष देण्याच्या सूचना देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, महामंडळाच्या योजनांमुळे तरुणांना व्यवसाय, उद्योग व उद्यमशीलतेसाठी प्रोत्साहन मिळते, राज्यात स्वयंरोजगाराच्या संधी वाढीस लागून आर्थिक प्रगतीला चालना मिळते. त्यामुळे या योजना अधिक प्रभावीपणे राबवून त्याचे परिणाम समाजाच्या तळागाळापर्यंत दिसून यावेत, यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### निधीची कमतरता भासू देणार नाही

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कामाचा आढावा घेतला. सारथी मार्फत राबवण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, संशोधन, स्वाधार योजना, परदेशी शिष्यवृत्ती योजना व वसतिगृह यांसारख्या विषयांवर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कौशल्य विकास व प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे. तसेच मुलांच्या शिक्षण व प्रगतीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

# मुंबईत ईडब्लूएस घरांचा घोटाळा उघड?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** नवी मुंबईत परवडणाऱ्या घरांच्या योजनांवरून मोठं वादळ उठलं आहे. गरीब व मध्यमवगीयांसाठी राखीव असलेल्या घरे प्रत्यक्षात कुठे गायब झाली? विकासकांकडून ती घरे घेतलीच का नाहीत? आणि जर नाही, तर जबाबदार कोण? या प्रश्नांनीच सध्या राजकारण तापलं आहे.

राज्यभरात चर्चेत असलेल्या या प्रकरणात, नवी मुंबई महानगरपालिकेने नियमानुसार ७९१ घरे विकासकांकडून घेतलीच नाहीत, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. थेट सुमारे १ हजार कोटींचा आर्थिक गैरप्रकार झाल्याचा आरोप भाजप आमदार विक्रांत पाटील यांनी केला.

सभापती राम शिंदे यांच्या दालनात झालेल्या विशेष बैठकीत नगरविकास विभागालाही चूक झाल्याची कबुली द्यावी लागली. यानंतर या संपूर्ण प्रकरणावर उच्चस्तरीय चौकशी अपरिहार्य बनली आहे.

या गंभीर गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने समितीचा प्रारूप आराखडा तयार करून मंजुरी देण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यातील घरकुल धोरणांवरून आधीच प्रश्नचिन्ह निर्माण झालेलं असताना, गरीबांसाठी असलेल्या घरांवरच डल्ला मारला गेल्याच्या या प्रकरणामुळे शासन आणि महानगरपालिकेच्या विश्वसनीयतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

# जरांगेंनी आता अल्टिमेटम देवू नये

■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. ११ :** मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे व मंत्री छगन भुजबळ यांच्यातील वाद एका नव्या उंचीवर पोहोचला आहे. त्यातच आता मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जरांगेंना सरकारला अल्टिमेटम न देता सरकारने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी कशी होईल यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे आता जरांगेंचा मोर्चा चंद्रकांत पाटलांकडे वळण्याची शक्यता आहे.



मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानावरील उपोषणानंतर महायुती सरकारने मराठवाड्यातील मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्यासाठी एक खास जीआर काढला. या जीआरवरून सध्या जरांगे व मंत्री छगन भुजबळ रोज आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. भुजबळ यांनी या शासन निर्णयाला कोर्टात आव्हान देण्याचा निर्णय दिल्यानंतर जरांगे यांनीही मंडल आयोगाच्या निर्णयाला आव्हान देत ओबीसी आरक्षणाच्या मुळावर घाव घालण्याची तयारी केली आहे. यामुळे महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण गढूळ झाले असताना आता राज्याचे उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मनोज जरांगे यांना त्यांनी केलेल्या मागण्यांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे.

### जरांगेंच्या आंदोलनाची धार कमी झाली

चंद्रकांत पाटील गुरूवारी सांगलीत पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत. गाव पातळीवर समिती स्थापन झाली. गावात एखाद्या व्यक्तीकडे कुणबी दाखला असेल तर त्याचा भाऊबंद आहे, त्यालाही प्रतिज्ञापत्रावर सक्षम अधिकाऱ्याने पडताळणी करून दाखला द्यायचा आहे.

त्यामुळे मनोज जरांगे यांनी त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य झाल्यामुळे, आता त्यांची अंमलबजावणी कशी होईल यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. सरकारने जरांगे यांच्या सर्वच मागण्या मान्य केल्यामुळे आता त्यांच्या आंदोलनाची धार कमी होईल असा दावाही मंत्री पाटील यांनी यावेळी बोलताना केला.

# महाराष्ट्रातील १०० जण नेपाळमध्ये अडकले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूरसह विविध जिल्ह्यांतील तब्बल १०० जण हिंसाग्रस्त नेपाळमध्ये अडकल्याची माहिती आहे. सरकार या सर्वांची तेथून सुखरूप सुटका करण्याचा प्रयत्न करत आहे.

नेपाळमधील उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नेपाळचा प्रवास टाळावा, तसेच सध्या जे नागरीक नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावे. विशेषतः या प्रकरणी कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती दिली. ते म्हणाले, नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तिथं अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्य सरकार युध्दपातळीवर प्रयत्न करत आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसंच महाराष्ट्र सदन यांच्या माध्यमातून राज्य शासन नेपाळमधील भारतीय दुतावासाच्या संपर्कात असून राज्यातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरवण्याचे प्रयत्न करत आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणं आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणं हीच प्राथमिकता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटकांनी घाबरुन जाऊ नये, असं आवाहन आहे.



सरकारचे पर्यटकांना सुखरूप परत आणण्यास प्राधान्य

राज्यातील ठाणे, पुणे, मुंबई, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे १०० पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आतापर्यंत प्राप्त झाली आहे. त्याव्यतिरिक्त बीड जिल्ह्यातून गेलेले पर्यटक रस्ता मार्गे खाजगी वाहनानं परत यायला निघालेले असून ते उत्तर प्रदेशात गोरखपूरपर्यंत पोहोचले आहेत.

सर्वाधिक पर्यटक ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथील आहेत. सर्व पर्यटक सुरक्षित आहेत. अडकलेल्या पर्यटकांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून त्यांच्याशी संपर्क साधून आहे, असे ते म्हणालेत.

### आपत्कालीन मोबाईल क्रमांक जारी

आपत्कालीन कार्य केंद्राने मदतीसाठी नेपाळमधील 977-980 860 2881 आणि 977-981 032 6134 हे दोन मोबाइल क्रमांक, तर राज्यातील 91- 9321587143 व 91-8657112333 हे मोबाइल क्रमांक उपलब्ध करून दिले आहेत. या क्रमांकांवर संबंधितांना व्हॉट्सॲप कॉलही लावता येणार आहे.

### नेपाळच्या पर्यटनाला फटका

नेपाळमधील सुंदर मंदिरे, स्वच्छता व एकूणच तेथील संस्कृतीची भुरळ भारतीयांना आहे. नेपाळचे हेच सौंदर्य पाहण्यासाठी जगभरातून लाखो पर्यटक दरवर्षी नेपाळला जातात. पण नेपाळमधील हिंसाचारानंतर पर्यटकांनी आपला नेपाळचा दौरा रद्द केला आहे किंवा लांबणीवर टाकला आहे. पर्यटकांनीच नेपाळकडे पाठ फिरवल्याने त्याचा मोठा फटका नेपाळला बसण्याची भीती आहे.

# भुजबळांचा डाव फडणवीसांना कळला

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. ११ :** ओबीसी नेते छगन भुजबळ हे मराठा समाज व सरकारचे मन जुळू नये म्हणून कट कारस्थान करत आहेत. त्यांचा हा डाव आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आला आहे, असा दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरूवारी केला. मराठा आरक्षणाच्या जीआरला भुजबळांनी कोर्टात आव्हान दिले, तर आम्हीही ओबीसी आरक्षणाला कोर्टात आव्हान देऊ, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



मनोज जरांगे यांनी गुरूवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी पुन्हा एकदा ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, छगन भुजबळ सरकारला व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत आहेत. मराठा व सरकारची मने जुळू नयेत हे काम ते करतात. कारण, मराठा समाज व सरकारचे मन जुळले तर त्याचे भागत नाही. पण आता त्यांचा डाव देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आला आहे. भुजबळ आपल्या स्वार्थासाठी ओबीसी - ओबीसी करतात आणि बाकीच्या जातींना आपल्यापासून तोडतात हे त्यांना समजले आहे.

आमच्या जीआरला काहीच होऊ शकत नाही. आम्ही हा जीआर खूप रक्त जाळून मिळवला आहे. त्यात फेरफार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मराठे कोट्यवधींच्या संख्येने रस्त्यावर दिसतील. त्यानंतर तुम्हाला जशास तसे प्रत्युत्तर मिळेल, असा इशारा त्यांनी दिला.

# कापूसकोंड्याची गोष्ट सभागृहात मांडा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** रोज कापूसकोंड्याची गोष्ट काय सांगता? असा सवाल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे. आमदार रोहित पवार यांनी बावनकुळे यांच्यावर केलेल्या आरोपाला या यामाध्यमातून त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. इतकेच नाही तर या विषयावर गंभीर असाल तर विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न मांडण्याचे आव्हान देखील त्यांनी दिले आहे.

या संदर्भात चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून रोहित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. यामध्ये ते म्हणाले की, 'रोज कापूसकोंड्याची गोष्ट काय सांगता, रोहित पवार जी!! तुम्ही खरोखर या विषयाबद्दल गंभीर असाल तर सभागृहात या; उत्तर देतो. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात चर्चा घडवा. सभागृहात प्रश्न मांडा. महाराष्ट्राच्या जनतेसमोर संपूर्ण माहिती येईल. खरे कोण,खोटे कोण? हेही कळेल. चला, सभागृहातच भेटू..!

या संदर्भात रोहित पवार यांनीही बावनकुळे यांना पुन्हा एकदा प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी पुन्हा एक पोस्ट करत विधानसभेत नक्कीच भेटुया, असे म्हणत बावनकुळे यांनी दिलेले आव्हान स्विकारले आहे. आपण उत्तरे देण्याचा प्रयत्न केला पण प्रत्येक उत्तरानंतर आपण अजून खोलात रुतत गेलात त्यामध्ये माझी काय चूक? असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे.

# रोकड लुटून पसार झालेल्यांना बेड्या

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ११ :** केज येथे एका ऊसतोड मुकादमाच्या हातातील ४ लाख रुपयांची पिशवी चोरीस गेल्याची घटना घडली आहे. केज पोलिसांनी या प्रकरणी आंध्र प्रदेशातील दोन आरोपींना परभणी येथील कारागृहातून ताब्यात घेतले आहे.

उत्तरेश्वर धायगुडे हे त्यांचे मेहुणे आणि पुतण्यासोबत ४ लाख रुपये घेऊन अंबाजोगाईहून केज येथे आले होते. रस्त्यात सरकारी रुग्णालयाजवळ दुचाकीवरून आलेल्या ४ अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या हातातील पैशांची बॅग हिसकावली आणि पळ काढला. आरोपींना अटक करण्यात आली.

# 'बॉम्बे विरूद्ध मुंबई' वाद पुन्हा चव्हाट्यावर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :** मराठीच्या मुद्यावरून आक्रमक झालेल्या राज ठाकरे यांच्या मनसेने आता आपला मोर्चा टीव्ही कार्यक्रमांत मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करणाऱ्यांकडे वळवला आहे.

मनसेने या प्रकरणी कॉमेडियन कपील शर्मा याला आपल्या शोमध्ये मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा न करण्याचा इशारा दिला आहे. बॉम्बेचे मुंबई असे नामकरण होऊन तब्बल ३० वर्षे झालीत, अशी आठवण मनसेने यासंबंधी कपील शमार्ला करून दिली आहे.

राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी शालेय शिक्षणात हिंदीच्या सक्तीला कडाडून विरोध केला. त्यानंतर राज्य सरकारला ही सक्ती मागे घ्यावी लागली. तत्पूर्वी, त्यांनी बँकांच्या व्यवहारातही मराठीचा आग्रह धरला. त्याचेही राज्यभरात तीव्र पडसाद उमटले.

त्यानंतर आता मनसेने आपला मोर्चा विविध टीव्ही कार्यक्रमांत सातत्याने मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करणाऱ्यांकडे वळवला आहे. मनसेच्या चित्रपट आघाडीचे प्रमुख अमेय खोपकर यांनी कॉमेडियन कपील शर्मा याला निवार्णीचा इशारा दिला आहे.




कॉमेडियन कपील शर्माला मनसेचा इशारा

अमेय खोपकर गुरूवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाले की, बॉम्बेचे मुंबई अधिकृत नामकरण होऊन 30 वर्षे झाली. त्यानंतरही बॉलिवूड मधील कपिल शर्मा शो मध्ये सेलिब्रिटी गेस्ट, दिल्लीस्थित राज्यसभा खासदार, शो अँकर आणि अनेक हिंदी चित्रपटात सर्रास बॉम्बे हा उल्लेख होत आहे. १९९५ महाराष्ट्र शासन व १९९६ मध्ये केंद्र शासनाची अधिकृत मान्यता मिळून चेन्नई, बंगळुरू, कोलकाताच्याही आधी मुंबई झाले आहे. तरी याचा मान राखून मुंबई उल्लेख करावा हा विनंती वजा इशारा देण्यात येत आहे.

अमेय खोपकर यांनी आपल्या पोस्टमध्ये एक व्हिडिओही जोडला आहे. त्यात अभिनेत्री हुमा कुरेशी मुंबईचा उल्लेख बॉम्बे म्हणून करताना दिसून येत आहे. खोपकर यांनी 'बॉम्बे टू मुंबई' असा हॅशटॅगही आपल्या ट्विटमध्ये वापरला आहे.

### मनसे - ठाकरे गटाची आघाडी होणार?

राज्याच्या राजकारणात सध्या ठाकरे गट व मनसेच्या संभाव्य युतीचीही चर्चा रंगली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्यामुळे या चर्चेला बळकटी मिळाली आहे. कालच्या भेटीत उद्धव यांच्यासोबत खासदार संजय राऊत व अनिल परब हे ही होते. अनिल परब यांना ठाकरे गटाचे मुंबईतील रणनीतीकार मानले जाते. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या या भेटीत ठाकरे गट व मनसेच्या संभाव्य आघाडीची रुपरेषा ठरल्याचा दावा केला जात आहे.

# मिझोरामला पहिल्यांदाच राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कशी जोडणारा उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :** ईशान्य भारतातील रेल्वे कनेक्टिव्हिटीला एक नवीन दिशा देणारा बैराबी-सैरांग रेल्वे प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर पहिल्यांदाच मिझोरामची राजधानी ऐझॉलला राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कशी जोडण्याची ही एक ऐतिहासिक संधी आहे.

ही ५१.३८ किमी लांबीची रेल्वे लाईन आसाममधील बैराबी स्टेशनपासून सुरू होते आणि मिझोरममधील सैरांगपर्यंत पोहोचते. बैराबी ते हरतकी (१६.७२ किमी), हरतकी ते कवनपुई (९.७१ किमी), कवनपुई ते मुआलखंग (१२.११ किमी) किमी), मुआलाखंग ते सायरंग (१२.८४ किमी) या चार टप्प्यांत पूर्ण झाले आहे.



बैराबी - सैरंग रेल्वे प्रकल्प पूर्णत्वास

या प्रकल्पांतर्गत, हरताकी, कवनपुई, मुआलखांग आणि सैरांग ही ४ नवीन स्थानके विकसित करण्यात आली आहेत. ही सर्व स्थानके ते आधुनिक प्रवासी सुविधांनी सुसज्ज आहेत आणि प्रवासी आणि मालगाड्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

सुमारे ८०७१ कोटी रुपये खर्चून बांधलेला हा प्रकल्प भारतातील सर्वात आव्हानात्मक अभियांत्रिकी प्रकल्पांपैकी एक मानला जातो. कठीण डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल आणि सतत मुसळधार पाऊस यासारख्या नैसर्गिक आव्हानांना न जुमानता, प्रकल्प वेळेवर पूर्ण केला जात आहे.

या प्रकल्पात एकूण ४८ बोगदे (१२,८५३ मीटर लांबी), ५५ मोठे पूल, ८७ छोटे पूल, ५ रोड ओव्हर ब्रिज आणि ६ रोड अंडर ब्रिज आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाची रचना म्हणजे पूल क्रमांक १९६, जो ११४ मीटर उंच आहे, जो कुतुबमिनारपेक्षा उंच आहे.

ही रेल्वे लाईन मिझोरामची राजधानी ऐझॉलजवळ पोहोचते. मिझोरामची सीमा म्यानमार आणि बांगलादेशशी आहे. यामुळे, हा प्रकल्प धोरणात्मक दृष्टिकोनातून देखील खूप महत्त्वाचा मानला जातो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ नोव्हेंबर २०१४ रोजी या प्रकल्पाची पायाभरणी केली. आता हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, मिझोरम आसाम आणि उर्वरित भारतामधील संपर्क सुलभ होईल. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा जलद होईल, व्यापार आणि औद्योगिक उपक्रमांना चालना मिळेल. आणि स्थानिक उत्पादनांसाठी मोठ्या बाजारपेठा उपलब्ध होतील.

# रेल्वे पुलासाठी केंद्राच्या सेतू -बंधन योजनेतून मिळणार निधी

## मंत्री नितीन गडकरींनी खासदार वानखडे यांना दिले आश्वासन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. ११ :**

राजकमल चौकातील रेल्वे पुलाच्या बांधकामास सेतुबंधन योजनेतून निधी देणार आहे,असे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या दिवशी गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी लेखी पत्रद्वारे वानखडे यांनी हा मुद्दा मंत्री गडकरी यांच्या लक्षात आणून दिला.

पुलाचे पुनर्बांधकाम वेगाने पुढे जाण्यासाठी केंद्र सरकारने मदत करावी, असे त्या पत्रात म्हटले आहे.

शहरातील मुख्य व वर्दळीच्या ठिकाणी असलेला रेल्वे ओव्हर ब्रिजला (आरओबी) ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे



तो वापरण्यायोग्य नसल्याचे जिल्हा प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे गेल्या २३ ऑगस्टपासून तो पायी चालण्यासह सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. विशेष म्हणजे पूल बंद करण्याचा निर्णय अचानक घेण्यात आला. पूल केव्हाही कोसळू शकतो या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच बडनेरा येथील प्रो. राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.दरम्यान देखभाल दुरुस्तीअभावी हा पूल आतून ठिसूळ झाला आहे. परिणामी हा पूल केव्हाही कोसळू शकतो, असा हा अहवाल आहे.

# पालिका प्रभाग रचनेत बुलडाण्याचा तिढा कायम आयुक्तांकडे प्रकरण जाण्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी,**
**बुलडाणा, दि. १० :**

नगर पालिका प्रभाग रचनेवरील हरकतीवर सुनावणीला सुरुवात झाली आहे. यात पाच नगर पालिकेच्या हरकती निकाली निघाल्या असून बुलडाणा बाबत अजूनही खलबते सुरु आहे. घेतलेल्या हरकतीवर जिल्हाधिकारी ११ सप्टेंबर पर्यंत निकाल देण्याची अपेक्षा आहे. मात्र जिल्हाधिकारी यांचा आदेश हरकतीच्या बाजुने न लागल्यास आयुक्तालयात बुलडाण्याचे प्रकरण जाणार आहे.

२०२२ पासुन रखडलेल्या नगर पालिकेच्या निवडणुका होण्यासाठी आता प्रभाग रचना करण्यात आली आहे. या प्रभाग रचनेवरील आक्षेप, हरकतींवर ८ सप्टेंबर रोजी सुनावणी झाली. त्यामध्ये सिंदखेड राजा,





शेगाव, मलकापूर, लोणार, जळगाव जामोद आदी पालिकेच्या हरकती खारीज करण्यात आल्या आहेत. सहा नगर पालिकांच्या हरकतींवर जिल्हाधिकारी काय करतात, याकडे लक्ष लागुन आहे. बुलडाणा नगर पालिका त्यात आघाडीवर आहे. बुलडाणा पालिकेच्या प्रभाग रचनेवर १५ हरकती दाखल आहेत. भाजपच्या वतीनेही हरकत , आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. उबाठानेही आपली हरकत कायम ठेवली आहे. त्यावर भाजपने तर स्पष्टीकरण दिल्याने आता या प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी काय निर्णय घेतात. याकडे लक्ष लागुन आहे. मात्र त्यात जर काही तथ्य आढळले नाहीतर आयुक्तालयाचा दरवाजा भाजपला , उबाठाला खुला राहणार आहे.

न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ येणार! मुख्याधिकारी बुलडाणा यांनी आपण प्रगणकानुसार प्रभाग रचना केल्याचे सांगितले आहे. या प्रगणकावरच भाजपने आक्षेप नोंदवला आहे. त्यामुळे मुळ मुद्द्यावर सध्या लढाई सुरु आहे. यात सर्वच प्रभाग रचना खारीज होते की सर्वच कायम राहते. हे पाहणे मजेशीर ठरणार आहे. पण या प्रकरणात न्यायालयात दाद मागण्यापर्यंत भाजपने तयारी ठेवल्याने वेळ प्रसंगी निवडणुका लांबू शकतात.

# वुमेन्स स्टडीज सेंटरमधील यशस्वी करिअर घडवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## विद्यापीठातील एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ११ :**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरअंतर्गत एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज हा आंतरविद्याशाखीय पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवण्यात येतो. स्पर्धा परीक्षा तसेच एनजीओजमधील करिअरच्या दृष्टीने सदर अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे.

या अभ्यासक्रमाच्या मागील वर्षीच्या दोन विद्यार्थांनी करिअर संधीचा शोध घेऊन यश प्राप्त केले. यामध्ये राहुल कांबळे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या अराजपत्रित गट 'ब' सेवेतील पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदाची परीक्षा उत्तीर्ण करून त्यासाठी त्यांची आयोगाद्वारे निवड झाली.

तर दामिनी गादगे यांची अमरावती येथील सुखाय फाउंडेशन या संस्थेत फिल्ड ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली. दोन्ही विद्यार्थ्यांनी करिअर क्षेत्रात प्राप्त केलेल्या यशाबद्दल वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारे त्यांचा सत्कार करण्यात आला.

वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा 'वुमेन इम्पॉवरमेंट आणि जेंडर इक्विटी'



याविषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे मा. प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते ग्रंथसंच देऊन दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विचारमंचावर उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य मा. मनीषा कोडापे, वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, सेंटरच्या सह समन्वयक डॉ. वैशाली धनविजय उपस्थित होत्या. त्यांच्या यशाबद्दल उपस्थित सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या एम.ए. जेंडर अँड वुमेन्स स्टडीज अभ्यासक्रमात लिंगभाव दृष्टीकोनातून समाजातील स्त्रीप्रश्नांचे पर्यायाने लिंगाधारित असमानतेच्या आंतरसंबंधांचे चिकित्सक अध्ययन करण्यावर भर दिला जातो. लिंगभेदाचे उच्चाटन करून लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक-राजकीयमहत्त्वाच्या विषयांचे आवश्यक भान व कौशल्ये विकसित करण्यावर या अभ्यासक्रमात लक्ष देण्यात येते. जेंडर सेन्सटायझेशन, जेंडर पॉलिसी, जेंडर ऑडीट, जेंडर बजेटिंग, जेंडर ट्रेनिंग, महिला सक्षमीकरण, जेंडर मेनस्ट्रीमिंग, जेंडर ॲनलिसेस, कॅपिसिटी बिल्डींग, जेंडर जस्टीस, एलिमीनेशन ऑफ जेंडर बेस्ड व्हायलनब स, जेंडर कन्सल्टंसी, जेंडर इक्वालिटी ॲडव्होकसी, फेमिनायझेशन ऑफ पाव्हर्टी, जेंडर अँड कम्युनिटी डेव्हलपमेंट, जेंडर अँड डेव्हलपमेंट, एलजीबीटीक्यूआयए अँड इंक्ल्यूझीवनेस, जेंडर ब्लांइडनेस, मेन अँड मस्क्युलॅनिटीजब, जेंडर अँड एनजीओजब अशा अनेक महत्त्वाच्या विषयांचे आवश्यक ज्ञान, दृष्टीकोन आणि कौशल्य देणारा हा अभ्यासक्रम आहे.

सोबतच नवीन शैक्षणिक धोरणानुसार हा अभ्यासक्रम अद्ययावत करण्यात आलेला असून त्या अंतर्गत रिसर्च प्रोजेक्ट, फिल्ड व्हिझीट, केस स्टडीज, इंटर्नशिप यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करा

## उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**
**उमरखेड, दि. ११ :**



महाराष्ट्रातील बंजारा जमातीला अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारी सामील करण्याची शिफारस राज्याने केंद्र शासनाकडे करावी, तसेच कर्नाटक, आंध्र, तेलंगणा राज्याप्रमाणे संवैधानिक प्रलंबित न्याय दूर करून सवलती व योजना लागू कराव्यात, या मागणीसाठी उमरखेड तालुक्यातील गोर सेना व सकल बंजारा समाजाच्या वतीने उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. स्थानिक वसंतराव नाईक चौकातून मोर्चाला प्रारंभ करण्यात आला. महाराष्ट्रातील बंजारा जमातीला जनगणनेत विविध नावाऐवजी गोर बंजारा या एकाच नावाने संबोधुन लगतच्या कर्नाटक, आंध्र, तेलंगणा राज्याप्रमाणे संवैधानिक प्रलंबित न्याय दूर करून सवलती व योजना लागू कराव्यात, महाराष्ट्रातील बंजारा जमातीसाठी राज्य मागास आयोगाचे माजी अध्यक्ष न्यायमूर्ती बापट व सर्व आयोगाने केलेल्या शिफारशी मान्य करून त्या केंद्र सरकारकडे पाठविण्यात याव्यात, महाराष्ट्रातील बंजारा तत्सम जमातीला अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश केलेली सेंट्रल प्रोविन्स बेरार नागपूर एमपीच्या शिफारसी समवेत हैदराबाद गॅझेट लागू केल्याची अधिसूचना निमंत्रित करून स्वतंत्रपणे समावेश करणारी राज्य शासनाची स्पष्ट शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात यावी, आदी मागण्या करण्यात आल्यात. बंजारा समाजाला अनुसूचित जाती समाविष्ट करण्यासाठीचा सन २०१६ पासून ते सन २०२४ पर्यंतचे सर्व लेखाजोखा निवेदनासोबत समाजाच्या वतीने जोडण्यात आला. मोर्चासाठी गोर सेनाचे तालुकाध्यक्ष आकाश आडे, गोपाल राठोड, शेषराव जाधव, कान्हा जाधव उपस्थित होते.

# नवनियुक्त उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ११ :**

अमरावती विभागाचे नवनियुक्त उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय कमलाकर खांबोरकर यांचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष श्री. अजय देशमुख यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी विद्यापीठ कर्मचारी वर्गाच्या असलेल्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा करतांना कर्मचा-यांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावे, तातडीने निराकरण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. व यासाठी संघटनेचे सदैव सहकार्य राहील असे आश्वस्त केले. यावर डॉ. खांबोरकर यांनी संघटनेच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत करताना, आवश्यकतेनुसार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करूनच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच, कर्मचारीहिताच्या प्रश्नांवर सहसंचालक कार्यालयाचे सहकार्य कायम राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकी दरम्यान दर महिन्याला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्याचे ठरले. या प्रसंगी संघटनेचे महासचिव श्री. नरेंद्र घाटोळ, उपाध्यक्ष श्री. नरेंद्र खैरे, श्री. सतीश लोखंडे, सहसचिव श्री. प्रेम मंडपे, कोषाध्यक्ष श्री. विजय चवरे, तसेच कार्यकारिणी सदस्य श्री.संजय धाकूलकर, श्री.संतोष मालधुरे, श्री. पंकज ठाकूर श्री.मनिष शास्त्री आणि श्री. निलेश वंदे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने घडवले : समाजामधील विविध संस्कृतीचे दर्शन

**महासागर प्रतिनिधी,**
**यवतमाळ, दि. ११ :**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे व एनसीईआरटी, साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय भारत सरकार व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी डायट येथे जिल्हास्तरीय कला महोत्सव मोठ्या थाटात पार पडला. उपस्थित प्रेक्षकांना आपल्या कलाविष्काराने मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने विविध संस्कृतीचे दर्शन घडविले.जिल्हास्तरीय कला



उत्सवाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रमेश राऊत तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा समन्वयक तथा अधिव्याख्याता सारिका पवार, अधिव्याख्याता मधुमती सांगळे, अधिव्याख्याता धम्मरत्न वायवळ, विस्तार अधिकारी दीपिका गुल्हाने, सारनाथ श्रावस्ती अमरावती, राजेश शिरसाट अकोला, योगिता वानरे, मुकुंदा वरगट अमरावती आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रास्ताविक सारिका पवार यांनी केले. यामध्ये प्रथम क्रमांक एकलमध्ये गीत माने, नृत्य एकल श्वेता कोठारी, समूह गायनमध्ये एसपीएम गर्ल्स हायस्कूल घाटंजी, दृश्यकला एकल चित्रकला कार्तिकी डेहनकर गर्ल्स हायस्कूल घाटंजी, दृष्य कला एकल मूर्ती आरव गजानन जाधव जि. प. हायस्कूल अकोला बाजार, पारंपरिक कथाकथन आयुष्यमान जैन, एजाज गोलर, वादन एकलमध्ये अवधूत अर्धापुरकर वेदधारिणी विद्यालय यवतमाळ, वादन एकल ताल वाद्य धीरज अंगाइतकर जि. प. हायस्कूल सरूळ या विद्यार्थ्यांनी पटकावला.

यामध्ये जिल्ह्यातील सर्व शासनमान्य सर्व माध्यमाच्या इयत्ता ९ ते १२वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यामध्ये प्रथम, द्वितीय तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली गायकवाड, नीलिमा पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार वैशाली गायकवाड यांनी मानले. या जिल्हास्तरीय कला उत्सवाला परीक्षक म्हणून सारनाथ श्रावस्ती अमरावती, राजेश शिरसाट अकोला, योगिता वानरे, मुकुंदा वरगट अमरावती यांनी काम पाहिले. या कला उत्सवासाठी डॉ. वनिता ठाकरे, दीपलक्ष्मी ठाकरे, रेखा भगत, अर्चना मनवर, वैशाली गायकवाड, अश्विनी पाळेकर, नीलिमा पाटील, राजहंस मेंढे, तथा डायट येथील अधिव्याख्याता, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.


# कार्यालय नगर परिषद वाडी - जिल्हा नागपूर

(निविदा सुचना - पहिली वेळ)

**सूचना प्रसिद्धी**

सर्व महाराष्ट्र शासन नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराना सुचित करण्यात येते की नगर परिषद वाडी अंतर्गत प्रभाग क्र १२ ते २५ मध्ये GVP पाईट तसेच इतर ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे CCTV कॅमेरा कामाची निविदा दर मागविण्यात येत आहे. तरी ईच्छुक कंत्राटदाराने आपल्या निविदा दिनांक ११.०९.२०२५ ते १७.०९.२०२५ पर्यन्त या कालावधीत दर सादर करावे, या कालावधी नंतर येनाऱ्या निविदा रद्द करण्यात येईल. शक्य झाल्यास निविदा दिनांक १८.०९.२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात यईल.

(डॉ. ऋचा धाबर्डे)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी


# चांदूर रेल्वेत पेट्रोलपंप मालकाची लूट

## रोकड लुटणाऱ्या आरोपींना अटक, दोघांचा शोध सुरू



**अमरावती** : चांदूर रेल्वे येथील अग्रवाल सर्व्हिस सेंटर पेट्रोलपंपचे संचालक चंपालाल अग्रवाल यांची २.८१ लाख रुपयांची रोकड लुटणाऱ्या चार आरोपींपैकी दोघांना पोलिसांनी १२ तासांत अटक केली आहे. उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू आहे. ८ सप्टेंबर रोजी रात्री पेट्रोलपंपची रोकड घेऊन जात असताना लाल-पांढरे दुपट्टे तोंडाला बांधलेल्या अनोळखी व्यक्तींनी चंपालाल अग्रवाल (७५) यांचा पाठलाग केला. त्यांनी बळजबरीने गाडी थांबवून २ लाख ८१ हजार २९८ रुपये लुटले आणि कारमधून पळून गेले. चांदूर रेल्वे पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. तपासात शुभम गोपाल पवार (२२, काकडधरा, तळेगाव शामजी पंत) आणि रोशन उर्फ राम रवींद्र चव्हाण (१८, राजीव गांधी नगर, चांदूर रेल्वे) यांना अटक करण्यात आली. दोन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून लुटलेली रोकड आणि मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक अनिल पवार यांच्या मार्गदर्शनात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी पंकज कुमावत यांच्या देखरेखीखाली पार पडली. या कारवाईत चांदूर रेल्वे पोलिस ठाणे आणि अमरावती स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सहभागी होते.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **QAMRUNNISA MUSTUFA KHAN**. NOW MY NEW NAME IS **QUAMRUNNISA SAYYED KARIM.**
**ADD :** PLOT NO. 657 MAHENDRA NAGAR TEKA NAGPUR 440017

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **M8591294**. MY OLD NAME WAS **PARVEEN SHAFI SURIYA**. NOW MY NEW NAME IS **PARVIN SHAFI SURIYYA.**
**ADD :** OPP RAM MANDIR MAIN ROAD HIWARA MAHAGAON YAVATMAL 445204

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **J6013414**. MY OLD NAME WAS **NAZIYA SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **NAJIYA ANJUM SHEIKH.**
**ADD :** WARD NO 2 NEAR MATAN MARKET GADCHANDUR CHANDRAPUR- 442908

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **L9776305**. MY OLD NAME WAS **GOVIND PUNAMCHAND PADIA**. NOW MY NEW NAME IS **GOVIND PUNAMCHAND PADIYA.**
**ADD :** RANPISE NAGAR AKOLA 444001

MY OLD NAME WAS **SAIFUDDIN**. NOW MY NEW NAME IS **SAIFUDDIN FIDAALI DAMA.**
**ADD :** HOUSE NO. 563 TASNEEM MANZIL BOHRA MASJID ROAD ITWARI NAGPUR — 440002

MY OLD NAME WAS **RASHIDA**. NOW MY NEW NAME IS **RASHIDA SAIFUDDIN DAMA.**
**ADD :** HOUSE NO. 563 TASNEEM MANZIL BOHRA MASJID ROAD ITWARI NAGPUR — 440002

MY OLD NAME WAS **ARCHANA VIJAY BARPATWAR**. NOW MY NEW NAME IS **SHARDA VIJAY BURREWAR.**
**ADD :** PLOT NO 533A KHALASHI LINE BHIMSEN CHOWK MOHAN NAGAR NAGPUR 440001

MY OLD NAME WAS **MOHAMMAD RUZAIN KHAN**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD RUZAIN RIZWANALI KHAN.**
**ADD :** ANSARI WARD SAUDAGAR MOHALLA BHANDARA PIN CODE NUMBER 441904.

MY OLD PASSPORT NO, **M8776617**. MY OLD NAME WAS **BABYNANDA BHOJRAJ GAHANE**. NOW MY NEW NAME IS **NANDA BHOJRAJ GAHANE.**
**ADD :** QTR NO. B-14/112, NIT QUARTER ANAND NAGAR NAGPUR - 440017.

MY OLD NAME WAS **JINY SUDARSHAN KUMAR**. NOW MY NEW NAME IS **JINY** AND MY SURNAME IS **SUDARSHAN.**
**ADD :** PLOT NO.180,NEAR INDIAN OVERSEAS BANK, KT NAGAR, KATOL NAGAR, NAGPUR - 440013.

MY OLD NAME WAS **MAHER UNISA BEGUM**. NOW MY NEW NAME IS **MEHRUNNISA BEGUM.**
**ADD :** TURAB NAGAR, ITWARA NANDED 431604.

MY OLD NAME WAS **SHEIKH ABDUL KADAR**. NOW MY NEW NAME IS **SHAIKH ABDUL KADAR.**
**ADD :** TURAB NAGAR ITWARA ITWARA NANDED- 431604.

MY OLD NAME WAS **SHEIKH SAMAD**. NOW MY NEW NAME IS **ABDUL SAMAD ABDUL SHEIKH. ADD :** NEAR BABA MACHHALI SHAH DARGAHA BAZAR, BHALDARPURA, NAGPUR -440018.

MY OLD NAME WAS **SHREY**. NOW MY NEW NAME IS **SHREEYASH SHARMA.**
**ADD :** WARD NO 13 CIVIL LINE JAISWAL COLONY SAUSAR : 480106 (DIST) PANDHURNA MADHYA PRADESH, INDIA.



# कार्यालय नगरपंचायत कुही

E-mail ID : nagarpanchayatkuhi@gmail.com | दूरध्वनी क्र : ०७१०२२२२८०

क्रमांक/नपकु/करवि/१९७२/२०२५ | दि. ११/०९/२०२५

**जाहीरनामा**

जाहीरनाम्याद्वारे नागरिकांना सूचित करण्यात येते की, खालील प्रमाणे अर्जदार यांनी मालमत्तेचे फेरफार करण्याबाबत अर्ज सादर केलेले आहे.

| अ.क्र | विकणारे किंवा रेकॉर्डवरील नाव | सर्वे क्र./नभू क्र/ मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ | ज्याच्या नावाने फेरफार घ्यावयाचे आहे ते नाव | सादर केलेल दस्तऐवज |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश प्रभाकर रामने | भू.क्र. १२/३५ | ११८० चौ. फुट | श्री. ईश्वर मारोती लांजेवार | मालमत्ता पत्रक |
| २ | श्री. दौलत लाला येळणे | मालमत्ता क्र. ५९३ | ७२० चौ फुट | श्री. शेषराज लाला येळणे व इतर (भोगवटादार) | शपथपत्र |
| ३ | श्री. अश्विन बुधाजी चकोले | भू.क्र. ३१८/१/अ/७६ | १५७.५० चौ.मी. | श्री. राकेश मारोता लेंडे | मालमत्ता पत्रक |
| ४ | श्रीमती अनिता अनिल हिंगे | न.भू.क्र. ८४० | ३६.४९ चौ.मी. | श्री. ब्रम्हानद मारोती खराबे | मालमत्ता पत्रक |
| ५ | श्री. मनोहर नामदेव सोनकुसरे | भू.क्र. १३८ | १३५ चौ.मी. | सहाय्यक संचालक मिशन इंडिया तर्फे जोसफ (भोगवटादार) | शपथपत्र |
| ६ | श्री. गंगधर बह्याजी बावनकुळे | मालमत्ता क्र. ३९८ | ७५० चौ फूट | श्री. नामदेव गंगाधर बावनकुळे (भोगवटादार) | शपथपत्र |
| ७ | श्री. गंगाधर बह्याजी बावनकुळे | मालमत्ता क्र. ३९८ | ७५० चौ. फूट | श्री. दिनेश गंगाधर बावनकुळे (भोगवटादार) | शपथपत्र |
| ८ | श्री. रवीद्र झीबल ढबाले | न.भू.क्र. ११०३ | ३२.६० चौ.मी. | श्रीमती वनिता रवीद्र ढबाले व इतर | मालमत्ता पत्रक |
| ९ | श्री चंद्रशेखर राजाराम वांढरे | भू.क्र. २०१/१६ | १७२.५० चौ. मी. | श्री. शंकर महागु घारपिंडे | मालमना पत्रक |
| १० | श्री. रामकृष्ण तुळशीराम डहाके | भू.क्र. ४१/३/४ | १७६ चौ.मी. | श्री. सुधाकर मोतीराम लेंडे | मालमत्ता पत्रक |
| ११ | श्री. प्रभाकर नारायण बांते | मालमत्ता क्र. १६६६ | ७५० चौ. फूट | श्री. प्रमोद प्रभाकर बांते | पट्टा प्रमाणपत्र |
| १२ | श्री सूर्यभान बिसन महाजन | मालमत्ता क्र. ८६७ | ३५२ चौ. फूट | श्रीमती लक्ष्मी सूर्यभान महाजन (भोगवटादार) | शपथपत्र |
| १३ | श्री. मारोती राघो चौधरी | न.भू.क्र. १५४ | ६०२ चौ. फूट | श्री गोविंदा मारोता चौधरी व इतर | मालमत्ता पत्रक |
| १४ | श्री मधुकर कंठीराम मस्के | न.भू.क्र. ३९१ | ११२० चौ. फूट | श्रीमती छबुताई मधुकर मस्के व इतर | मालमत्ता पत्रक |
| १५ | श्री. अनंत द्वारकानाथ खापर्डे व इतर | मालमत्ता क्र. १५१३ | ७३८८ चौ फूट | श्री. अविनाश द्वारकानाथ खापर्डे (भोगवटादार) | शपथपत्र |
| १६ | श्री. अनंत द्वारकानाथ खापर्डे व इतर | मालमत्ता क्र. ४५ | ३५१० चौ फूट | श्री. अनंत द्वारकानाथ खापर्डे (भोगवटादार) | शपथपत्र |
| १७ | श्री. धनराज शामराव लांजेवार | मालमत्ता क्र. ७६ | १००० चौ. फूट | श्रीमती शेवंता धनराज लांजेवार व इतर (भोगवटादार) | शपथपत्र |
| १८ | श्री रवींद्र नारायण दुधपपारे | मालमत्ता क्र. १८०५ | १३२० चौ.फूट | श्रीमती जिजा नारायण दुधपचारे व इतर (भोगवटादार) | शपथपत्र |

उपरोक्त नमूद मालमत्तेवरील व त्याव्यतिरिक्त ज्याचा हक्क संबंध असेल त्यानी कोणताहो आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून लेखी दस्ताऐवजसह ७ दिवसाच्या आत नगरपंचायत कुही ला सादर करावा. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास दायित्व बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल.

स्वा /-
मुख्याधिकारी
नगरपंचायत कुही

एलॉन मस्क यांची कंपनी टेस्लाने अलीकडेच भारतात त्यांचं पहिलं शोरूम सुरू केलं अन् पहीलं गिऱ्हाईक एका गब्बर राजकारणाच्या माध्यमातून मिळालं. या शोरूममधून कंपनीने त्यांची पहिली कार विकली आहे आणि ही कार प्रताप सरनाईक यांनी खरेदी केली. प्रताप सरनाईक म्हणतात की, मी ही कार घेऊन आनंदी झालो आहे. ही कार मी माझ्या नातवाला भेट देतोय. ही कार घेऊन त्याला शाळेत पाठवलं जाईल, त्यावेळी इतर मुलं ही कार पाहतील. इतर मुलांमध्ये जनजागृती होईल. जे लोक कार खरेदी करू शकतात ते अशा इलेक्ट्रिक कार्सना प्राधान्य देतील. त्यांचे कार खरेदीचे उद्गार ऐकून संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्यात कदाचित पाणी आले असेल. कारण एक राजकारणी संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी माणसांना टेस्ला कार खरेदी करण्याचे आव्हान करतो हे त्यांना खरोखर आवडले असेल. कारण जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना मिळणारे दीड हजार रुपए किंवा दिवाळी दसऱ्याला मिळणारा 'आनंदाचा शिधा' या व्यतिरिक्त सामान्य जनतेला आजपर्यंत काहीच मिळाले नव्हते. पण आता कदाचित कार मिळेल म्हणून अनेकांनी आपल्या झोपडपट्टीच्या परिसरात पार्किंगसाठी जागेचा शोध घ्यायला सुरुवात केली असेल. गरिबी कुणाच्या वाट्याला आली नाही. अनेकांनी गरिबीतून पुढे जाऊन संपत्ती मिळवली. प्रताप सरनाईक तर रिक्षा चालवत होते. पण आता ते टेस्लासारख्या कितीतरी कार्सचे मालक आहेत. अर्थात प्रताप सरनाईक किती गब्बर राजकारणी आहे, हे सांगण्यासाठी कोणाची गरज नाही, तर ती माहिती आपोआप मिळते. त्यांची एकूण संपत्ती २०२४ मध्ये सुमारे ३३३ कोटी रुपयाहून अधिक आहे, असे त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रामध्येच नमूद केलं आहे. अशा या सरनाईकांनी त्यांच्या नातवासाठी टेस्ला कार खरेदी केली. एवढा पैसा आला कुठून ? हे कुणीच विचारू नये. शिवाय असे विचारणारे आपण कोण? त्यांच्या लाडक्या नातवाला त्यांनी टेस्ला गिफ्ट दिली असली, तरी राज्यातील जनता त्यांच्या लाडक्यांना खेळण्यातील टेस्लाही विकत घेवू शकत नाही, हे कटू सत्य प्रतापरावांना कोण सांगणार? प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, कर भरणाऱ्या तरीही खड्ड्यांमधून कष्टाच्या पैशातून घेतलेली वाहनं चालवावी लागणाऱ्या सामान्य नागरिकांच्या जीवाची किंमत अति श्रीमंत प्रतापराव सरनाईक यांना काय कळणार? लाल दिव्यांचा ताफा बरोबर असलेल्यांच्या दृष्टीने टेस्ला कार म्हणजे 'किस झाड की पत्ती'.

# सरनाईकांच्या 'प्रतापा'ने नातवाला मिळाली 'टेस्ला' कार!






उद्योगपती अंबानी परिवार आपल्या परिवारातील कुणाचा वाढदिवस असेल तर त्यांच्याकडून विमान भेट दिले जाते. मग एखाद्या मराठी माणसाने आपल्या लाडक्या नातवाला कार भेट दिली तर बिघडले काय? असा सर्वसाधारण सूर समाजामध्ये उमटू शकतो. या टेस्ला गाडीची किंमत जवळपास ६० ते ७० लाख रुपयांच्या घरात आहे आणि सरनाईकांनी त्यांच्या नातवासाठी ही महागडी कार खरेदी केली आहे.

आता राज्यातील प्रत्येक माणसाच्या नातवाकडे ही कार आली तर आश्चर्य वाटायला नको. टेस्लाची महागडी कार नातवाला भेट म्हणून दिल्याबद्दल प्रताप सरनाईक यांच्यावर टीका होत आहे. पण त्यांनी अशा टीकाकारांकडे दुर्लक्ष केलेलेच बरे. सामान्य माणसांनी त्यांच्या नातवासाठी घेतलेल्या नवीन टेस्ला रूपी खेळण्याची किंमत किती आहे याच्याशी काय घेणे देण?



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आपल्या नातवासाठी भारतातील पहिली टेस्ला विकत घेणारे आणि एकेकाळी रिक्षाचालक म्हणून काम करणारे मंत्री प्रताप सरनाईक यांची एकूण संपत्ती अचानक आठशे टक्क्यांनी वाढली असे समजते. मध्यंतरी त्यांना काही तपास यंत्रणांनी छळले होते. परंतु एकनाथ शिंदेंबरोबर बंड करून त्यांनी भाजपशी साटेलोटे केले. त्यामुळे आता त्यांना घाबरायची गरज नाही.

आता आठशेऐवजी आज हजार टक्क्यांनी त्यांची संपत्ती वाढली तरी त्यांना विचारणार कोण? त्यामुळेच त्यांनी भारतीय बाजारपेठेतील 'टेस्ला'च्या कंपनीची पहिली कार विकत घेण्याचा मान मिळवल्याने महाराष्ट्राने त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. असे म्हटले जाते की, ही खरेदी केवळ वैयक्तिक नाही तर महाराष्ट्राच्या हरित महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे.

नागरिकांमध्ये, विशेषतः तरुणांमध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटीबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी त्यांनी टेस्लाची कार खरेदी केली आहे. नातवाला कार खरेदी केल्यानंतर प्रताप सरनाईकांबद्दल अनेकांना कुतूहल निर्माण झाले. एवढी वेगाने प्रगती केल्यानंतर नेमका त्यांनी एवढा काय 'प्रताप' केला याचे संशोधन महाराष्ट्रातील लोकांकडून सुरू झाले.

त्यांचा सर्वात मोठा प्रताप म्हणजे २००८-०९ मध्ये ठाणे विहांग गार्डन येथील ११४ सदनिकाधारकांची त्यांनी फसवणूक केली होती. त्यांनी पाच मजले अनधिकृत बांधले. २०१२ मध्ये त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. पण, तत्कालिन ठाकरे सरकारने त्यांना संरक्षण दिल्यावर भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी संपूर्ण महाराष्ट्रात आवाज उठवला होता. तेव्हाचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कारवाईचे आदेश दिले होते.

सरनाईक घोटाळेबाज आहेत. मग तुम्ही त्यांना मदत का करतात ? तुम्ही महाराष्ट्राच्या लोकांना चुकीचा संदेश देऊ नका. त्यांना कशाला वाचवता आहात? मुख्यमंत्री लोकायुक्ताच्या समोर सांगतात, की आम्ही प्रताप सरनाईक यांच्यावर कारवाई करू. मग ठाकरे सरकार त्यांना का पाठीशी घालतात? असे म्हणणारे सोमय्या कुठे गेले हे विचारण्यात आता काहीही अर्थ नाही. सरनाईकच नव्हे तर कोणी कितीही मोठा व्यवहार केला तरी आता सोमय्या कुठेही दिसत नाही हे महाराष्ट्र मात्र उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. असो, एका आजोबाने आपल्या नातवाला टेस्ला कार खरेदी करून दिली, म्हणून त्या आजोबाचे व नातवाचे अभिनंदन करायला काय हरकत आहे!

## प्रताप सरनाईकांची नेत्रदीपक प्रगती

मिळालेल्या माहीतीनुसार २००९ मध्ये प्रताप सरनाईक यांची अवघी सोळा कोटी रुपये कमाई होती. त्यानंतर ही संपत्ती २०१४ मध्ये वाढून १४३ कोटी रुपये झाली होती. २०१९ च्या निवडणुकीमध्ये प्रताप सरनाईक यांनी १४३.९७ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली होती. त्यांच्या संपत्तीचा मुख्य स्रोत त्यांचा 'विहंग ग्रुप ऑफ कंपनीज' आहे, जो रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी आणि बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहे. यामध्ये ठाणे आणि मुंबईतील लक्झरी हॉटेल्स, व्यावसायिक इमारती आणि मोठ्या निवासी प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय त्यांनी मनोरंजन, मीडिया आणि वित्तीय क्षेत्रातही गुंतवणूक केली आहे. रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये सरनाईक यांनी विहंग शांतिवन, विहंग गार्डन, सृष्टी कॉम्प्लेक्स, विहंग रेसिडेन्सी, विहंग टॉवर, विहंग विहार, विहंग पार्क, रौनक टॉवर, विहंग आर्केड, आणि रौनक आर्केडची निर्मिती केली आहे. त्यांच्या संपत्तीमध्ये ५६.३१ कोटी रुपयांच्या जंगम मालमत्तेत रोख रक्कम, बँक ठेवी, शेअर्स, दागिने, लक्झरी वाहने असा किरकोळ प्रकार आहे. स्थावर २३२.६ कोटी रुपयांची मालमत्तेत सतरा बिगर-कृषी जमिनी, बारा निवासी इमारती आणि बारा व्यावसायिक मालमत्तांचाही समावेश आहे.

## सरनाईक चौकशांना कधीच घाबरले नाही

एनएसईएल घोटाळा २०२२ मध्ये प्रवर्तन संचालनालयाने प्रताप सरनाईक यांच्या ११.३५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर ठाण्यातील दोन फ्लॅट्स आणि जमीन मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत जप्त केली. ही कारवाई नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड घोटाळ्याशी संबंधित आहे, ज्यामध्ये आस्था ग्रुपने २१.७४ कोटी रुपये विहंगच्या कंपन्यांना हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. पण लढवय्या माणसाची प्रगती होतच असते. आयकर आणि फौजदारी खटल्यांना ते कधीच घाबरले नाही. सरनाईक यांच्यावर नऊ फौजदारी खटले दाखल आहेत, ज्यामध्ये आयपीसी कलम ५०६ म्हणजेच गुन्हेगारी धमकी देणे, कलम ३३२ नुसार सार्वजनिक सेवकाला कर्तव्यात अडथळा आणणे आणि कलम ४२७ म्हणजेच मालमत्तेचे नुकसान करणे आदी प्रकरणांचा समावेश आहे. त्यामुळेच कधीकाळी रिक्षा चालवणारे सरनाईक २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दुसरे सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले होते. भाजपाचे मंगल प्रभात लोढा हे ४४७ कोटी रुपयांच्या संपत्तीमुळे पहिल्या क्रमांकावर होते. मराठी माणूस एवढा पुढे चालल्यामुळे महाराष्ट्राने टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले पाहिजे.

(कालच्या अंकावरून)

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

म्हणतात ना चुलता, भाऊ, बहिण, आई वडील आणि आजी आजोबा हेच आपले असतात. पण आपली बायको व भावाची बायको ही आपली नसते. हे कदाचित खरे आहे, कारण यांच्यासोबत आपले रक्ताचे नातेसंबंध नसते. म्हणून यांना नवऱ्याच्या घरातील सदस्य नको वाटतात. मग या बाया काय करतात?

आपल्या नवऱ्याला भावाबद्दल, बहिणीबद्दल, आई-वडिलांबद्दल व आजोबांबद्दल भलतेच काहीतरी लावून देतात किंवा त्यांचे कान भरतात. आणि आपल्या पतीच्या नातेवाईकांबद्दल त्याच्या मनात द्वेष व तिरस्कार निर्माण करतात. आपल्या पतीला एकाचे दोन लावून देतात. आणि आजकालची मुले पत्नीचे ऐकून आई-वडिलांना, भावांना व आजी-आजोबांना अंतर देऊन एकत्र कुटुंब पद्धतीला छेद देऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करत आहेत.

आपल्या बायको मुलांना घेऊन कुठेतरी लांब नोकरीच्या ठिकाणी म्हणा किंवा शहरी भागात स्थायिक होऊन मनसोक्त राहतात. आणि पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. ही वस्तुस्थिती सध्या आपण सर्वजण पाहत आहोत. कारण हल्ली माणसाचे मन कलुषित व गढूळ पाण्यासारखे झाले आहे. कारण आजकालच्या मुलांना शालेय शिक्षण म्हणावे तेवढे संस्कारक्षम व दर्जेदार मिळत नाही.

शाळेत केवळ अभ्यासक्रम शिकवला जातो, अभ्यास क्रमाशिवाय इतर ज्ञानसंपदा किंवा संस्काराचे धडे आजकाल कोणत्याच शाळेत वा महाविद्यालयात दिले जात नाहीत. शिक्षक विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व पटवून देत नाहीत. आई-वडिलांचे व आजी आजोबांचे महात्मे सांगणारे धडे आजकाल पुस्तकात समाविष्ट करणे काळाची गरज आहे. आई-वडिलांना अंतर देणे, त्यांना वृद्धाश्रमात पाठवणे, बहिण भावाचा शुल्लक कारणावरून अबोला धरणे आणि गुंठाभर जागेसाठी आपल्याच भावासोबत भांडण तंटा करणे हे सध्या सर्वत्र सर्रास सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे आजकालच्या पिढीला कुठेतरी संस्कार कमी पडलेत आणि त्यांना संस्कार देणे आणि त्यांना नात्याचे महत्त्व सांगणे ही सध्या काळाची गरज आहे.

त्यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महात्मे सांगणारा आणि त्यांना संस्काराचे धडे देणारा अभ्यास पुस्तकात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त चांगला सुसंस्कारी नागरिक बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा.

एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट करून विद्यार्थ्यांना चांगला माणूस बनवून आई-वडिलांना, आजी आजोबांना, बहिण भावांना व समाज बांधवांना अडीअडचणीत, सुखदुःखात, कठीण काळात व संकटात मदत करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आजी आजोबा संस्काराची खान असतात. आजी आजोबांना कधीच अंतर देऊ नका, त्यांच्या विचारांना व आचारांना आचरणात आणून माणसासारखे जीवन जगूया...

त्यासाठी एकाच घरात, एकाच छताखाली आणि शेत वाटणी न करता सगळ्यांनी मिळून सर्व शेती एकत्र करावी...बुद्ध, फुले शाहू, आंबेडकरांचे विचार आचरणात आणून एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व द्यावे, सुरुवात आपल्यापासून करूया म्हणजे आपोआप आपली प्रेरणा घेऊन प्रत्येक जण एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य देईल असे मला वाटते..

बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर
7498715661




# ५१ वर्षांपूर्वी हरवलेले पाकीट शाळेच्या मागे सापडले

**कॅनडातील ओंटारियो येथील ऑर्चर्ड पार्क माध्यमिक शाळेचे नूतनीकरण करणाऱ्या कामगारांना ५१ वर्षे जुने पाकीट सापडले. ते १९७४ मध्ये १७ वर्षांच्या टॉम स्कॉफचे होते, जे आता ६७ वर्षांचे आहेत.**

केअरटेकर लोर्ना मॅक्वीन म्हणाल्या

**की, पाकिटात विद्यार्थी ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, सामाजिक विमा कार्ड, कुटुंब आणि मित्रांचे फोटो, युरोपला जाण्यासाठी ट्रान्झिट पास, डिस्टिलरीकडून किंमत यादी आणि ३५ सेंटचे हॉकी तिकीट होते.**



**जेव्हा शाळा प्रशासनाने फेसबुकद्वारे स्कॉफशी संपर्क साधला तेव्हा स्कॉफला सुरुवातीला हा विनोद वाटला, पण जेव्हा तो शाळेत पोहोचला तेव्हा त्याचे पाकीट सापडल्यानंतर तो भावनिक झाला.**

# सत्यासाठी निर्भय जीवनाची आवश्यकता! निर्भय पणे जगा!

मानव हा सामाजिक प्राणी आहे. त्याचे अस्तित्व केवळ श्वासोच्छवासात नसून त्याच्या वर्तनात, त्याच्या आचरणात, आणि त्याच्या विचारात दडलेले असते. जगण्याची खरी किंमत हे सोन्या-चांदीच्या दागिन्यांत मोजली जात नाही; ती मोजली जाते सद्गुणांच्या तेजोमय प्रकाशात.

जेव्हा मनुष्य दुष्टपणे, अन्यायाने आणि अनितीने वागू लागतो, तेव्हा तो आपले नैतिक अस्तित्व गमावतो. त्याचे जीवन जणू पावसाच्या पाण्यात कोसळलेल्या दिव्या प्रमाणे होते थोडा काळ प्रकाश देतो, पण क्षणात विझून अंधारात बुडतो. अशा वर्तनाचा दुष्परिणाम केवळ त्याच्यावरच नाही तर त्याच्या कुटुंबावर, समाजावर आणि आगामी पिढ्यांवरही उमटतो.

**अपकीतीर्ची सावली**

अपकीर्ती ही अशी छाया आहे, जी एकदा लागली की ती पिढ्यान्पिढ्या मागे सोडत नाही. माणूस कितीही धनाढ्य असो, कितीही उच्चपदस्थ असो, पण जर त्याच्या नावाशी बेईमानी, फसवणूक, कपट, किंवा दुष्टपणाचे शिक्के जोडले गेले, तर समाज त्याला कधीही सन्मानाच्या नजरेने पाहत नाही. पैशाचा डोंगर उभा केला तरी तो डोंगर वाळवंटातील वाळूसारखा कोसळतो. सत्य आणि सदाचार या शिलारुपी पायाशिवाय कुठलाही डोंगर टिकू शकत नाही.

गजानन कुसुम ओंकार हरणे
खडकी, अकोला.
9822942623

पूर्वार्ध

**आळशीपणाची शिक्षा**

दुष्ट आणि अन्यायी व्यक्ती आळशी होतो. तो परिश्रम टाळतो, कारण त्याला वाटते की शॉर्टकटनेच यश मिळेल. पण असे यश हे मृगजळाप्रमाणे असते जितके जवळ जायचे तितके ते दूर पळते. परिश्रमाशिवाय लाभलेली संपत्ती ही वाळूच्या घरासारखी असते एक वारा आला तरी ती ढासळते. म्हणूनच द्रव्यहानी ही अशा व्यक्तींच्या जीवनातील अपरिहार्य परिणती ठरते.

**निर्भयतेचा अभाव**

अनितीच्या मार्गावर चालणारा माणूस कधीही निर्भय होऊ शकत नाही. कारण त्याच्या अंतःकरणात नेहमीच अपराधगंड असतो. तो कितीही बाहेरून धैर्याचे मुखवटे चढवो, पण आतल्या मनात तो भेदरलेलाच असतो. समाजात उघडपणे वावरताना त्याला सतत लाजेचे ओझे वाहावे लागते. जणू आरशासमोर उभे राहिल्यावरच आपले कुरुप चेहरे त्याला दिसतात.

**मानसिक शांतीचा अभाव**

सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे मानसिक शांतीचा अभाव. संपत्ती, सत्ता, मान-सन्मान यांचा ढीग असला तरी, जर अंतःकरण बेचैन असेल, तर त्या जीवनाला काहीही मूल्य राहत नाही. निद्रानाश, अस्वस्थता, भीती हेच त्याच्या जीवनातील साथीदार बनतात. अशा जीवनाला समाधान लाभत नाही.

**सद्गुणांचा सुवर्णमार्ग**

याउलट, जो सज्जन आहे, जो शीलसंपन्न आहे, जो परिश्रमशील आहे, त्याचे जीवन ख?या अथार्ने सुवर्णमय बनते.

**सत्कीतीर्चे तेज**

सज्जनतेने वागणाऱ्या व्यक्तीची कीर्ती सुवासिक फुलांच्या गंधासारखी सर्वत्र पसरते. जशी चांदण्यांची चांदणी रात्रीच्या काळ्या आकाशात झळाळत असते, तशीच त्याची सत्कीर्ती समाजात झळाळते. लोक अशा व्यक्तीला आदराने स्मरतात, त्याचे नाव उच्चारताना त्यांचा आवाज मृदु होतो.

**परिश्रमाचे फळ**

सज्जन व्यक्तीला परिश्रम हेच त्याचे पूजनस्थान मानतात. परिश्रमाने मिळवलेले यश हे केवळ भौतिक संपत्ती देत नाही तर आत्मिक समाधानही देते. परिश्रमाचे घामाचे थेंब हे मोत्यांसारखे असतात, जेव्हा ते जमिनीवर पडतात तेव्हा जीवनातील उगवत्या सूर्याला सुवर्ण किरण देतात.

**मानसिक शांती**

सत्य आणि सदाचाराच्या मार्गावर चालणाऱ्याला मानसिक शांती ही आपोआप मिळते. त्याच्या झोपेत भिती नसते, त्याच्या स्वप्नात अपराध नसतात, त्याच्या हृदयात शांततेचा संगीत निनादत असतो. हाच तो खरा आनंद आहे, जो लाखो रुपयांनी विकत घेता येत नाही.

**सत्याचा अमर दीप**

सत्य हे असे तेज आहे, जे कधीही मावळत नाही. कधीकधी ते त्रस्त होते, दडपले जाते, त्यावर अन्यायाचा डोंगर रचला जातो; पण सत्य कधीही पराभूत होत नाही. ते जणू प्रवाहा सारखे आहे खडकांवर आपटते, पण मार्ग शोधून पुढेच सरकते.इतिहास आपल्याला सांगतो की असत्याचा डंका काही काळ वाजतो, पण सत्याचे शंखनाद मात्र युगानुयुगे घुमत राहतात.

छत्रपती शिवाजी महाराज,भगवान बुद्ध, महात्मा गांधी, तुकोबाराय, संत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगे महाराज यांसारख्या महामानवांनी सत्याच्या मार्गाने समाजाला प्रेरणा दिली. त्यांनी संकटांचे वादळ झेलले, पण सत्याची मशाल विझू दिली नाही. म्हणूनच आजही त्यांचे विचार अमर आहेत.

**आजच्या युगातील आवश्यकता**

आजचा काळ हा वेगाचा, स्पर्धेचा आणि यांत्रिकीकरणाचा आहे. या काळात अनेकदा लोक सत्यापेक्षा खोटेपणाला महत्त्व देतात. पैसा, सत्ता, पद या मोहजालात अडकून माणूस सदाचार विसरतो. पण हे विस्मरण हे आत्महत्येसमान आहे.

वाचक लिहितात

## अशोकस्तंभावर झालेली तोडफोड : राष्ट्रविरोधी मानसिकतेचे प्रतिबिंब...

राष्ट्रीय मानचिन्ह अशोक स्तंभ हे भारताची संस्कृती, परंपरा, एकात्मता आणि सार्वभौमतेचे प्रतीक आहे. भारत सरकारचे अधिकृत प्रतीक म्हणून शासकीय कामकाजात त्याचा वापर केला जातो.

नोटा, नाणी यापासून ते संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालये तसेच विविध शासकीय विभागांच्या इमारतींवर हे चिन्ह असते. असे असताना श्रीनगर येथील हजरतबल दर्ग्याच्या नूतनीकरणाच्या उद्घाटनाच्या वेळी तेथे जो शिलापट कोरण्यात आला आहे, त्यावर अशोक स्तंभ असल्यामुळे वाद निर्माण झाला. दर्ग्यात जमलेल्या मुसलमानांनी दगडांनी या अशोक स्तंभाच्या आकृतीवर प्रहार करून त्याला तोडण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे प्रश्न निर्माण होतो की, या दर्ग्याचे नूतनीकरण सरकारी खर्चाने झालेले आहे म्हणजेच नागरिकांनी दिलेल्या करातून झालेले आहे. या पैशांद्वारे मशिदी, मदरसे चालतात, मुसलमानांना सवलती, सुविधा देखील याद्वारे मिळतात.

असे असताना देशाच्या सार्वभौमतेचे प्रतीक असलेले केवळ एक चिन्ह त्यांना चालत नाही, त्यासाठी शिलापट तोडफोड करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. ही अत्यंत गंभीर घटना आहे आणि यातून भारतविरोधी मानसिकता स्पष्टपणे दिसून येते. ही राष्ट्रविरोधी मानसिकता ठेचण्यासाठी सरकारने कठोर कारवाई करून राष्ट्रभावना जपावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.


■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

## वाहन चालवताना फोनवर बोलू नका !

पी.एम.पी. बसचालक वाहन चालवतांना मोबाईल वापरत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे चालकाने वाहन चालवतांना वाहकाकडे मोबाईल जमा करावा, असा आदेश प्रशासनाने काढला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा नियम लागू करण्यात आला असून यापुढे चालक मोबाईलवर बोलत असल्याचे आढळल्यास चालकाचे तात्काळ निलंबन केले जाणार आहे. वाहन चालवताना मोबाईलवर बोलल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात. वाहतूक नियमानुसार मोबाईलवर बोलत वाहन चालविणे दंडनीय गुन्हा असून वाहन चालकाचा परवानाही रहित होऊ शकतो. वाहन चालवताना मोबाईलवर बोलल्यामुळे समोरील व्यक्ती ज्या विषयाशी निगडित संभाषण करत आहे त्यामध्ये वाहन चालक गुंतत जातो आणि त्याचे लक्ष विचलित होते. लक्ष विचलित झाल्यामुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडू शकतात. पूर्वी संभाषणासाठी थेट मोबाईल कानाला लावावा लागे, नंतर इअरफोन फोन आले, ब्ल्यू टूथ आले, आता तर इअर बड्स आले आहेत. हे इअर बड्स इतके लहान असतात कि कानाला लावले असता सहज दिसतही नाहीत त्यामुळे वाहतूक पोलिसांना फोनवर बोलत वाहन चालवणाऱ्यांना अडवताही येत नाही.

वाहन चालवताना फोनवर बोलल्यामुळे वाहतूक पोलीस दंडित करतील यापेक्षा या सवयीमुळे आपल्याच जीवाचे बरे वाईट होऊ शकते याचे भान वाहन चालकांनी ठेवायला हवे. मोबाईलवर बोलत वाहन चालवल्याने होणाऱ्या अपघातांत अनेकदा रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्या निष्पाप नागरिकांचा बळी जातो किंवा आयुष्यभरासाठी गंभीर दुखापत होते. त्यामुळे फोनवर बोलत वाहन चालवण्याची सवय वाहन चालकांनी सोडायला हवी !

■ जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.



# मूत्रपिंडाच्या समस्या दूर करण्यासाठी हा पदार्थ ठरेल फायदेशीर

मूत्रपिंड हा आपल्या शरीराचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे, जो रक्त फिल्टर करण्याचे आणि शरीरातील विषारी घटक काढून टाकण्याचे काम करतो. ते पाणी आणि इलेक्ट्रोलाइटचे संतुलन राखते आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

मूत्रपिंडाच्या समस्या जळजळ, संसर्ग किंवा फिल्टरिंग क्षमता कमी झाल्यास सुरू होतात. वाईट जीवनशैली, जास्त मीठ सेवन, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि वेदनाशामक औषधांचे दीर्घकाळ सेवन मूत्रपिंड कमकुवत करू शकते. अशा परिस्थितीत, मूत्रपिंडाच्या कार्यावर हळूहळू परिणाम होऊ लागतो, ज्यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होऊ लागतात आणि मूत्रपिंडाचे आजार उद्भवतात.

जेव्हा किडनीचा आजार होतो तेव्हा शरीरातील पाणी आणि रक्ताचे संतुलन बिघडू लागते. यामुळे पाय, हात आणि चेहरा सूजू शकतो. शरीरात विषारी घटक जमा होऊ लागतात, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा आणि भूक न लागणे यासारख्या समस्या वाढतात. हा आजार दीर्घकाळ राहिल्यास उच्च रक्तदाब, हाडांची कमकुवतपणा आणि हृदयाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. जर हा आजार गंभीर स्वरूप धारण करतो तर रक्तात युरिया आणि क्रिएटिनिनची पातळी लक्षणीयरीत्या वाढते, ज्यासाठी डायलिसिस किंवा किडनी प्रत्यारोपणाची आवश्यकता असू शकते.

याशिवाय अशक्तपणा आणि श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या समस्या देखील वाढतात. किडनीचा आजार केवळ शरीराच्या फिल्टरिंग प्रक्रियेवरच परिणाम करत नाही तर संपूर्ण शरीराचे कार्य देखील बिघडवतो.

हळदीमध्ये आढळणारे कर्क्यूमिन हे घटक मूत्रपिंडाची जळजळ आणि संसर्ग कमी करण्यास मदत करते. हळदीमध्ये अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडाच्या पेशींना मुक्त रॅडिकल्स म्हणजेच हानिकारक घटकांपासून संरक्षण करतात.

मर्यादित प्रमाणात हळदीचे सेवन केल्याने मूत्रपिंडाची फिल्टरिंग क्षमता टिकून राहण्यास मदत होते आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्याची प्रक्रिया सुलभ होते. याशिवाय, थकवा आणि अशक्तपणा यासारख्या मूत्रपिंडाच्या आजाराशी संबंधित समस्या कमी करण्यासाठी हळद फायदेशीर आहे. तथापि, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आणि मर्यादित प्रमाणात ते सेवन करावे. जास्त प्रमाणात हळदीचा आरोग्यावरही वाईट परिणाम होऊ शकतो.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

मीठ आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे कमी करा. पुरेसे पाणी प्या. रक्तातील साखर आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवा. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय जास्त काळ औषधे घेऊ नका. तुमच्या आहारात मर्यादित प्रमाणात हळद समाविष्ट करा.

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## पराधिन जगती ...!

आलटं घर पालटं होण्यास
वेळ लागतोच किती ?
पापणी लवत नाही तेवढयात
डाव साधते नियती ...!

मानवी जीवन म्हणजे
पाण्यावरील बुडबूडा
कधी ॲक्सीडंट तर कधी
टक्के त्याला जातो तडा ..!

म्हणून नको अहंकार
नको भ्रष्टाचार मोह माया
नितीमत्तेचे पालन करून
आपले जीवन जगू या ..!

सौ सुनारकी एक लोहारकी
हा दिसतो नियतीचा कायदा
म्हणून चंचल मनाला
आवर घालण्यातच असे फायदा!

# हाँगकाँग येथे झालेल्या एव्हीपीएन ग्लोबल कॉन्फरन्स २०२५ मध्ये डॉ. प्रीती अदाणी यांनी सामाजिक बदलासाठी एकत्रित सहयोगाचे व्यासपीठ उभारण्याचे आवाहन केले




मुंबई, ११ सप्टेंबर : अदाणी फाउंडेशनच्या चेअरपर्सन डॉ. प्रीती अदाणी यांनी हाँगकाँग येथे झालेल्या एव्हीपीएन ग्लोबल कॉन्फरन्स २०२५ मध्ये परोपकारी, व्यवसायिक आणि बदल घडवणाऱ्यांना प्रेरक संदेश दिला फक्त योगदान देऊन काम होणार नाही, खरी बदलाची सुरुवात तेव्हा होईल जेव्हा आपण सगळे मिळून निर्माण करू.

आपल्या मुख्य भाषणात डॉ. प्रीती अदाणी यांनी हे सांगितले की सामाजिक विकासाचे पुढचे मोठे पाऊल सहयोगावर अवलंबून आहे. त्यांनी म्हटले की प्रत्येक परोपकारी, संस्था, एनजीओ आणि भागीदार यांना एकाच मंचावर आणणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रयत्नांचे समन्वय साधले जाईल, शिकण्याची देवाणघेवाण होईल आणि परिणाम अनेक पटींनी वाढेल. डॉ. अदाणी यांनी श्रोत्यांना आठवण करून दिली की समाजकल्याणाची खरी ताकद वेगवेगळ्या योगदानात नाही, तर एकत्रित प्रयत्नात आहे. त्यांनी म्हटले, आपण फक्त दाते न राहता, सोबत निर्माण करणारे व्हायला हवे. खरी बदलाची वेळ तेव्हाच येते जेव्हा आपण भागीदार बनून संसाधने जोडतो आणि अडथळे दूर करतो.

एव्हीपीएनच्या सीईओ नैना सुब्बरवाल बत्रा म्हणाल्या, डॉ. प्रीती अदाणी यांचे मुख्य भाषण हे धाडसी कृतीसाठीचे प्रेरक आवाहन होते. त्यांनी आठवण करून दिली की अनिश्चिततेच्या काळातही आपल्याला पावले उचलावी लागतील आणि अशा उपाययोजनांमध्ये गुंतवणूक करावी लागेल ज्या आशियासाठी शाश्वत आणि समान भविष्याची पायाभरणी करतील. एव्हीपीएनमध्ये आम्ही त्यांच्या या आवाहनाची पुनरावृत्ती करतो. परोपकारासाठी सातत्य ठेवावे लागेल आणि विविध हितधारकांना एकत्र आणावे लागेल, जेणेकरून आपण विश्वासाला कृतीमध्ये बदलू शकू आणि अशी प्रणाली निर्माण करू शकू जी वेळ आणि अनिश्चिततेच्या कसोटीवर टिकतील.

डॉ. प्रीती अदाणी यांनी या सामायिक पुढाकारासाठी तीन अनिवार्य तत्त्वे सांगितली:

एकत्र निर्माण करा: प्रत्येक भागीदार फक्त दाता म्हणून नाही, तर शाश्वत बदल घडवणारा निर्माता म्हणून सहभागी व्हावा.

गुणक बना, लाभार्थी नाही: परिणामाचे खरी मोजमाप हे फक्त आपण काय देतो त्यावर नाही, तर आपण आपल्या लाभार्थ्यांना बदलाचे गुणक कसे बनवतो यावर आहे.

कौशल्याला मूल्यांसोबत जोडा: मूल्यांशिवाय कौशल्य ही पायभरणी नसलेल्या इमारतीसारखी आहे. यांना जोडल्यास आपण नव्या पिढीचा निर्माण करू शकतो.

डॉ. प्रीती अदाणी म्हणाल्या, ही टाळ्या वाजवण्याची वेळ नाही, तर प्रतिबद्ध होण्याची वेळ आहे! आपल्याला अशी पिढी बनायची आहे, ज्याने दुष्काळात बियाणे पेरले, पाऊस येण्यापूर्वी विश्वास ठेवला आणि सर्वांसाठी सन्मान आणि संधीचे पीक घेतले. भाषणाच्या शेवटी, डॉ. अदाणी यांनी उपस्थितांना आग्रह केला की केवळ प्रतीकात्मक पावले उचलू नका, तर सक्रियपणे सहयोग करा, एकमेकांकडून शिका, सर्वोत्तम पद्धती सामायिक करा आणि एकमेकांना उच्च लक्ष्य गाठण्यासाठी प्रेरित करा.

# बायरकडून अधिक स्मार्ट, शाश्वत कीटक व्यवस्थापनासाठी कॅमॅलस हे वैविध्यपूर्ण कीटकनाशक बाजारात




मुंबई, ११ सप्टेंबर : शेती आणि आरोग्यसेवा अशा जीवन विज्ञान क्षेत्रात कार्यरत बायर या जागतिक कंपनीने भारतीय बागायती शेतकऱ्यांसाठी विशेषतः डिझाइन केलेले एक अद्वितीय विविध कीटकांसाठीचे कीटकनाशक कॅमलस बाजारात आणल्याची घोषणा केली आहे. कॅमलस चघळणारे आणि रसशोषक अशा दोन्ही कीटकांच्या नियंत्रणासाठी असून ते आजच्या बागायती पीक लागवडीमध्ये गरजेचे आहे.

भारतातील प्रमुख राज्यांमधील मूल्यवान भाजीपाला बाजारपेठांना लक्ष्य करून, कॅमलस ऑगस्ट २०२५ पासून पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये उपलब्ध असेल.

भारतीय भाजीपाला उत्पादक शेतकरी, विशेषतः लघु भूधारक शेतकऱ्यांना, चघळणाऱ्या आणि रसशोषक कीटकांच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या संयुक्त दबावाचा सामना करावा लागतो.. त्यासाठी वारंवार फवारणी चक्रांची आवश्यकता असते आणि विद्यमान उत्पादनांचा प्रभाव कमी झाल्यामुळे गरज आणि पुरवठ्यातील तफावत निर्माण होते. कॅमलस ही तफावत एका नावीन्यपूर्ण दुहेरी-पद्धतीच्या कृतीने पूर्ण करते. ती कीटकांना खोडे खाण्यापासून थांबवते आणि रोपांचे मुळांपासून पानां पर्यंत संरक्षण करते. हे दीर्घकालीन संरक्षण देते, वारंवार फवारणीची गरज कमी करते – शेतकऱ्यांचा वेळ, खर्च आणि श्रम वाचविण्यास मदत करते. भाजीपाला उत्पादक, विशेषतः टोमॅटो, वांगी, मिरची, कोबी आणि भेंडीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी कॅमलसचा वापर सुरुवातीच्या टप्प्यात केल्यास तो एक शक्तिशाली उपाय ठरेल.

या उद्घाटनावेळी बोलताना बायरच्या भारत, बांगलादेश आणि श्रीलंका प्रभागाचे पीक विज्ञान विभागाचे समूह वाणिज्यिक प्रमुख मोहन बाबू म्हणाले, भारताच्या पीक सुरक्षेच्या गरजा पूर्ण करताना भाजीपाला पिके केंद्रस्थानी आहेत आणि जागतिक निर्यात अर्थव्यवस्थेत देशाचे स्थान मजबूत करण्याची प्रचंड क्षमता त्यांच्यात आहे. भाजीपाला पिकांचा वापर वाढत असताना पीक उत्पादकता आणि गुणवत्ता कायम राखणे अधिक महत्त्वाचे बनते. बायरमध्ये आम्ही भारतीय शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण आणि शाश्वत उपायांनी सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. कॅमलससोबत आम्ही नव्या पिढीचे कीटकनाशक आणत आहोत . ते फक्त कीटक व्यवस्थापन मजबूत करत नाही तर भारत आणि जगासाठी लवचिक, उच्च-गुणवत्तेची भाजीपाला मूल्य साखळी तयार करण्यातही योगदान देते.

## ग्रो म्युच्युअल फंड्सतर्फे मल्टी असेट अलोकेशन फंड

बेंगळुरू, ११ सप्टेंबर : ग्रो म्युच्युअल फंडाने ग्रो मल्टी असेट अलोकेशन लाँच केल्याची घोषणा केली आहे. ही ओपन एंडेड योजना इक्विटी, डेट, गोल्ड व सिल्व्हरमध्ये गुंतवणूक करते. न्यू फंड ऑफर (एनएफओ) १० सप्टेंबर २०२५ पासून खुली होणार आहे. ही योजना गुंतवणुकदारांना वैविध्यपूर्ण अलोकेशन फ्रेमवर्क देते, ज्यात वेगवेगळ्या असेट क्लासचा मेळ घालण्यात आला आहे. यामुळे पोर्टफोलिओची अस्थिरता कमी होते आणि बाजारपेठेतील वातावरणाशी सुसंगत गुंतवणूक होते.

मल्टी असेट्समधील गुंतवणूक वेगवेगळे असेट क्लास वेगवेगळ्या परिस्थितीत कशाप्रकारे कामगिरी करतात यावर अवलंबून असते. इक्विटीजना आर्थिक विकासाचे टप्पे आणि कॉर्पोरेट मिळकतीच्या विस्तारातून लाभ होतो. डेट आउटकमवर व्याजदराचे ट्रेंड्स आणि महागाई चक्राचा परिणाम होतो. सोने आणि चांदी प्रामुख्याने अस्थिरता, जागतिक जोखमीच्या घटना आणि चलनी अस्थिरतेला प्रतिसाद देतात. चालना देणारे असे सर्व घटक परस्परांशी फारसे सुसंगत नसल्यामुळे कोणताच एक असेट क्लास जास्त काळासाठी आघाडीवर राहात नाही.

डेटा असे दर्शवतो, की आघाडीचे स्थान बदलत राहाते काही वर्षांत इक्विटी सर्वात चांगली कामगिरी करतील, काही वेळेस डेट आणि कमॉडिटीजची कामगिरी चांगली होईल. या सर्व असेट्सचा मेळ घालणाऱ्या पोर्टफोलिओने बाजारपेठेतील सर्व टप्प्यांसाठी सज्ज राहाणं आवश्यक आहे.

स्रोत: एनएसई, एएमएफआय, ब्लूमबर्ग, १५ जुलै २०२५. यापूर्वी नोंदवण्यात आलेली कामगिरी भविष्यात टिकून राहील असे नाही आणि भविष्यातील परताव्यांची खात्री देऊ शकत नाही. वर नमूद कर्यात आलेली कामगिरी कोणत्याही म्युच्युअल फंडाच्या स्वतंत्र योजनेची कामगिरी सूचित करत नाही. गुंतवणूक करण्यापूर्वी तुमच्या आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्यावा.

# फॅशन, फ्लेअर आणि स्टारडम: ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्र्ससोबत केली भागीदारी

मुंबई, ११ सप्टेंबर : ब्लेंडर्स प्राईड (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) ने फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्स २०२५ सोबत आपल्या प्रमुख भागीदारीची घोषणा केली. या दोन आयकॉनिक शक्तींच्या एकत्र येण्याने एक भव्य मंच तयार झाला आहे, जो फॅशन, स्टाईल आणि मनोरंजनातील सर्वोत्तम गोष्टींवर प्रकाशझोत टाकतो.

दशकांपासून ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर द्वारे फॅशन आणि लाईफस्टाईलच्या जगात एक अविस्मरणीय शक्ती राहिले आहे. फिल्मफेअर ही भारतातील स्टाईल आणि मनोरंजनाची जुनी व विश्वासार्ह आवाज राहिली आहे, जिने पिढ्यान्पिढ्या स्टारडमची परिभाषा घडवली आहे. या दोघांनी मिळून असा एक मंच तयार केला जिथे विजेते ते झाले, जे निडर आत्मविश्वास झळकवतात, आपल्या स्टाईल स्टेटमेंटने इतरांपेक्षा उठून दिसतात आणि द वन अँड ओन्ली असल्याचा खरा आत्मा साकार करतात.




स्टाईल आणि ग्लॅमरच्या जगात आपली मजबूत उपस्थिती अधोरेखित करताना, ब्रँडने उदयोन्मुख आयकॉननाही खास सन्मानाने गौरवले. फेस ऑफ फॅशन, लिमिटलेस टॅलेंट पुरस्कार ईशान खट्टर यांना प्रदान करण्यात आला, मोस्ट डिझायरेबल (फीमेल) किताब तमन्ना भाटिया यांनी मिळवला आणि बेस्ट यूथ आयकॉन (फीमेल) सन्मान अनन्या पांडे यांना देण्यात आला हे सर्व पुरस्कार ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर यांच्या तर्फे प्रदान करण्यात आले.

पर्नोड रिकार्ड इंडिया येथील जनरल मॅनेजर – मार्केटिंग इशविंदर सिंग म्हणाले, ब्लेंडर्स प्राईड (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) नेहमीच फॅशन, स्टाईल आणि ग्लॅमरच्या अग्रगण्य स्थानी राहिले आहे. फिल्मफेअर ग्लॅमर अँड स्टाईल अवॉर्ड्र्ससह आमची भागीदारी त्या व्यक्तींना सन्मानित करते, जे संस्कृतीमध्ये नवीन ट्रेंड सेट करतात, काय इन-व्हॉग आहे हे ठरवतात आणि द वन अँड ओन्ली असल्याचा गौरव साकार करतात.

# सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल … मालिकेत युगची कुचंबणा: कैरीशी दुरावा वाढला, लताचा जवळीक साधण्याचा प्रयत्न

मुंबई, ११ सप्टेंबर : भावना, नाट्य आणि युग (शब्बीर अहलूवालिया), कैरी (आशी सिंह) आणि लता (रिद्धिमा पंडित)च्या नात्यातील गुंतागुंत यामुळे सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल … मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, युगची आई माईरी (सुप्रिया शुक्ला) शस्त्रक्रियेनंतर आपल्या समस्त कुटुंबाला एकत्र करते आणि युगची पूर्वीची पत्नी लता हिला पुन्हा युगसोबत गृहप्रवेश करायला सांगते.

आगामी भागांमध्ये, युग दोन स्त्रियांच्या ओढाताणीत सापडलेला दिसेल. एकीकडे लता आहे, जिला माईरी पुन्हा पुन्हा युगकडे ढकलते आहे, तर दुसरीकडे कैरी आहे, जी प्रत्येक वादळात युगच्या कुटुंबाच्या बाजूने खंबीरपणे उभी राहिली आहे. स्वतः स्त्रीद्वेष्टा असलेला युग कैरीची मूक ताकद आणि तिने दिलेला आधार पाहून भारावून गेला आहे. माईरी मात्र आपल्याला कैरी आवडत नसल्याचे उघडपणे व्यक्त करत आहे. ती कैरीला परक्यासारखी वागणूक देत आहे, तिचा सगळ्यांसमोर पाणउतारा करत आहे. तिला युगपासून लांब ठेवण्याचा उघड उघड प्रयत्न करत आहे. कैरी जेव्हा भक्तीभावाने गणपतीची मूर्ती घरी घेऊन येते, तेव्हा माईरी सर्वांच्या देखत तिला विरोध करते. त्यामुळे कैरी नाराज होते आणि युगला देखील ते आवडत नाही. भावनांना ऊत आला आहे आणि युगसमोर मोठा पेचप्रसंग उभा राहिला आहे. माईरीच्या इच्छेला मान देऊन त्याने लताचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करावा का? की कैरीला आपल्या हृदयात आणि घरात मनाने स्थान द्यावे?

कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, कैरीने आपल्या वागण्यातून नेहमी स्वतःची मूक ताकद आणि निरपेक्ष प्रेम दर्शविले आहे. जगाने मात्र बऱ्याचदा तिच्याकडे दुर्लक्ष केले आहे. आगामी भागांमध्ये, प्रेक्षक बघतील की तिच्या निष्ठेची कसून परीक्षा होणार आहे. कारण विशेषतः माईरी सतत तिला दूर ढकलते आहे. अशा प्रसंगांत कैरीची ताकद दिसून येते, कारण क्लेशदायक परिस्थिती असली तरी कैरी युग आणि त्याच्या कुटुंबाचे भलेच चिंतते. मला वाटते प्रेक्षकांना तिची लवचिकता नक्की भिडेल आणि कठीण परिस्थितीत देखील प्रेम, विश्वास आणि आशा मनात जिवंत ठेवण्याची तिची धडपड जाणवेल.



## सोनी सबवरील गणेश कार्तिकेय मालिकेत मोहित मलिक दिसणार भगवान शिवाच्या भूमिकेत

मुंबई, ११ सप्टेंबर : सर्व पिढ्यांच्या प्रेक्षकांना आवडतील अशा प्रभावी कथा सादर करण्याबद्दल सोनी सब वाहिनी ओळखली जाते. ही वाहिनी आता भारतीय टेलिव्हिजनवरील अत्यंत भव्य पौराणिक मालिका घेऊन येत आहे- गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय. सर्वात शक्तिशाली आणि दिव्य देवांच्या परिवाराची महान गाथा ही मालिका सादर करेल. ही मालिका प्रामुख्याने भगवान शिव, देवी पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांच्या माहीत नसलेल्या कथा सादर करेल. मालिकेच्या मुळाशी माता-पित्याची सुजाणता, दोन भावांचा प्रवास आणि कुटुंबाच्या भावना आहेत. हे असे कुटुंब आहे, ज्याचा संघर्ष आजही घराघरात दिसतो.

मालिकेच्या भव्यतेत भर घालत अभिनेता मोहित मलिक भगवान शिवाच्या रूपात दिसणार आहे. विश्वाचे संचालन करणाऱ्या त्रिमूर्ती पैकी एक असलेल्या शिवाची पूजा-अर्चना मानवाने युगानुयुगे केली आहे. गणेश कार्तिकेय मालिकेतून शिवाची एक पिता आणि पती म्हणून असलेली भावनिक बाजू दिसेल. आपली दिव्य कर्तव्ये आणि कुटुंबातील गुंतागुंत यांच्यात समतोल साधणारा शिव आपल्याला दिसेल. एक पिता म्हणून तो मार्गदर्शक आहे आणि मूक निरीक्षक देखील आहे, जो यावर लक्ष ठेवतो की, आपली मुले जबाबदारी कशी सांभाळतात, प्रेम आणि आपलेपणा आपल्या वर्तनात कसा आणतात?

# क्रोमामध्ये खरेदी करा पूर्णपणे नवीन आयफोन एअर, आयफोन १७ आणि आयफोन १७ प्रो

नागपूर, ११ सप्टेंबर : क्रोमा भारतात सादर करत आहे ॲपलची नवीन आयफोन १७ लाईनअप, ज्यामध्ये आयफोन १७, अल्ट्रा-थिन आयफोन एअर, आयफोन १७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्स यांचा समावेश आहे. या लाईनअपमध्ये ॲपलचे सर्वात नवीन डिझाइन, परफॉर्मन्स आणि कॅमेरा इनोव्हेशन्स आहेत, ज्यात मोठे डिस्प्ले, ए१९-सिरीज चिप्स, ए१९ आणि ए१९ प्रो आणि प्रगत सेंटर स्टेज फ्रंट कॅमेरा यांचा समावेश आहे. आयफोन १७ ची किंमत छ८२,९०० पासून, आयफोन एअर ची किंमत १,१९,९०० पासून, आयफोन १७ प्रो ची किंमत १,३४,९०० पासून आणि आयफोन १७ प्रो मॅक्स १,४९,९०० पासून पुढे आहे.

आयफोन १७ मध्ये पहिल्यांदाच प्रो-नॉन-प्रो मॉडेलमध्ये प्रोमोशनसह ६.३-इंचाचा सुपर रेटिना एक्सडीआर डिस्प्ले, २५६ जीबीपासून पुढे स्टोरेज, ८ तासांपर्यंत व्हिडिओ प्लेबॅकसाठी १०-मिनिटांचे फास्ट चार्ज, नवीन सेंटर स्टेज फ्रंट कॅमेरा आणि ४८ एमपी फ्यूजन कॅमेरे आहेत. प्रो लाइनअपमध्ये नवीन हॉरीझॉन्टल कॅमेरा लेआउट, ए१९ प्रो चिपसह प्रो-क्लास परफॉर्मन्स, डिस्प्ले आणि थर्मल सुधारणा आणि इतर प्रो-ग्रेड अपग्रेड्स देखील आहेत.

ॲपल वॉच सिरीज ११, ॲपल वॉच अल्ट्रा ३, ॲपल वॉच एसई ३ आणि एअरपॉड्स प्रो ३ चे देखील प्री-बुकिंग करता येईल ज्यांच्या किमती अनुक्रमे ४६,९००, ८९,९००, २५,९०० आणि २५,९०० पासून पुढे आहेत. नवीन ॲपल वॉच सिरीज ११ मध्ये अधिक उजळ डिस्प्लेसह ॲपल इंटेलिजन्स-पॉवर्ड वैशिष्ट्ये आहेत जसे की उच्च रक्तदाबाची सूचना, स्लीप स्कोअर, ५जी सेल्युलर कनेक्टिव्हिटी, दोन पट जास्त स्क्रॅच-प्रतिरोधक आयओएन-एक्स ग्लास, वर्कआउट बडी आणि लाइव्ह ट्रान्सलेशन. ॲपल वॉच अल्ट्रा ३ मध्ये ऑफ-ग्रिड इमर्जन्सी संदेशासाठी बिल्ट-इन सॅटेलाइट कम्युनिकेशन, सर्वात मोठा ॲपल वॉच डिस्प्ले, कमी पॉवर मोडमध्ये ७२ तासांपर्यंत बॅकअप, ५जी कनेक्टिव्हिटी आणि नवीन वेपॉइंट फेस सारखे नेव्हिगेशन-केंद्रित अपग्रेड्स सारख्या प्रगत क्षमता आहेत; आणि ॲपल वॉच एसई ३ मध्ये एस१० चिप, ऑलवेज-ऑन डिस्प्ले, ५जी सेल्युलर आणि स्लीप स्कोअर आणि एपनियाची सूचना सारखी सुधारित आरोग्य माहिती आहे. नवीन एअरपॉड्स प्रो ३ मध्ये ॲपलचे आतापर्यंतचे सर्वात प्रगत एएनसी, हृदय गती निरीक्षण, एक नवीन मल्टीपोर्ट अकॉस्टिक आर्किटेक्चर, पाच आकारांमध्ये फोम-इन्फ्युज्ड इअरटिप्स, ॲपल इंटेलिजन्ससह लाइव्ह ट्रान्सलेशन, सुधारित बॅटरी लाइफ आणि आयपी५७ पाणी आणि धूळ प्रतिरोधक ही वैशिष्ट्ये आहेत.


## आज का अंदाज

शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १२० | १६९ | ४६७ | ५७८ | २६६ | १६८ | १८९ | १४५ |
| ३०० | ३४९ | ८९० | ३३४ | १६७ | ३४८ | ३७८ | ३८९ |
| २२९ | ५५६ | ११५ | १९० | ३५६ | ७८० | २८८ | २७० |
| ३२ | ६२ | ७१ | ०१ | ४६ | ५६ | ८३ | ९३ |
| ३५ | ६५ | ७९ | ०४ | ४० | ५० | ८१ | ९१ |
| ३८ | ६८ | ७४ | ०७ | ४२ | ५२ | ८७ | ९७ |

१२ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५० | ८६ |
| १९ | २९ | ५४ | ८४ |
| १६ | २२ | ५३ | ८३ |
| ११९ | ११० | १७७ | १७० |
| ६७८ | २२८ | ४५६ | ३६९ |
| ५६० | ३३६ | ५०० | २६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ३ ६ ८ ९

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## आपली स्वप्ने पूर्ण करा आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोनसोबत



नागपूर, ११ सप्टेंबर : स्वप्न आपले, गोल्ड लोन आमचे या मूलभूत विश्वासासह आयआयएफएल फायनान्स लाखो भारतीयांसाठी विश्वासार्ह आर्थिक प्रगतीचा भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. व्यक्तींच्या आकांक्षा आणि न्यू इंडियाच्या वाढीस चालना देणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) महत्त्वाकांक्षा ओळखून, आयआयएफएल फायनान्स सुलभ आर्थिक उपाय उपलब्ध करून देत ही गती अधिक वेगवान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोन साध्या आणि पारदर्शक प्रक्रियेद्वारे जलद आर्थिक मदत उपलब्ध करून देते. ग्राहकांना अत्यल्प कागदपत्रांसह त्याच दिवशी रक्कम मिळू शकते. या कर्जामध्ये आकर्षक आणि स्पर्धात्मक व्याजदर तसेच वैयक्तिक आर्थिक गरजांनुसार तयार केलेले लवचिक परतफेडीचे पर्याय उपलब्ध आहेत.

आपल्या सोन्याच्या सुरक्षिततेचा उपयोग करून, ग्राहक शिक्षण व आरोग्याच्या गरजा पूर्ण करण्यापासून ते लघुउद्योजकता विस्तारण्यापर्यंत आणि एमएसएमई च्या प्रगतीच्या प्रवासाला साथ देण्यापर्यंत वैयक्तिक, व्यावसायिक किंवा व्यवसायिक गरजा सहजपणे पूर्ण करू शकतात.

आयआयएफएल फायनान्स गोल्ड लोन चे बिझनेस हेड मनीष मयंक म्हणाले की आयआयएफएल फायनान्स आपल्या सीधी बात (सरळ व्यवहार) या मूलभूत तत्त्वज्ञानाने मार्गदर्शित होऊन प्रत्येक व्यवहारामध्ये संपूर्ण पारदर्शकता जपते आणि सर्व प्रक्रिया ग्राहकांच्या सर्वोत्तम हित लक्षात घेऊन रचलेल्या आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप शुभ आणि फायदेशीर असेल. महत्त्वाच्या कामात संघर्ष होईल. जास्त वाद घालण्याची परिस्थिती टाळा. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका.

**वृषभ :** व्यवसायाच्या क्षेत्रात केलेल्या प्रयत्नांना फायदा होईल. नोकरीत केलेल्या प्रयत्नांमध्ये अधिक जबाबदारी असेल. राजकारणातील एखाद्या खास व्यक्तीच्या सान्निध्याचा तुम्हाला फायदा होईल.

**मिथुन :** आज कला आणि अभिनय क्षेत्राशी संबंधित लोकांना काही यश आणि संपत्ती मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला घराबाहेर जावे लागेल. तुम्हाला सरकारी योजनेची जबाबदारी मिळू शकते.

**कर्क :** राजकारणात तुमचे धाडस आणि शौर्य पाहून तुमचे विरोधकही थक्क होतील. तुमच्या कामाच्या शैलीचे तुमच्या नोकरीत कौतुक होईल. नोकरी करणाजया लोकांना फायदा होईल.

**सिंह :** आजचा दिवस सकारात्मक असेल. आधी अडकलेले काम पूर्ण होईल. काम अधूनमधून पूर्ण होईल. अधिक संयम आणि बुद्धिमत्तेने काम करा. कोणाच्याही प्रभावात येऊ नका.

**कन्या :** आज तुम्हाला व्यवसायात तुमच्या भावंडांकडून सहकार्य मिळेल. सैन्याशी संबंधित लोक त्यांच्या शत्रूंवर विजय मिळवतील. राजकारणात कोणताही मोठा निर्णय घाईघाईने घेऊ नका.

**तुळ :** तुमचा राग नियंत्रणात ठेवा. नोकरीच्या ठिकाणी बदल होण्याची दाट शक्यता आहे. व्यवसायाच्या जबाबदाजया दुसजया कोणाकडे सोपवण्याऐवजी, तुम्ही त्या स्वत: हाताळाव्यात.

**वृश्चिक :** सहकाजयांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. खाजगी व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना त्यांच्या नवीन कामाच्या योजनांमधून फायदा मिळण्याची शक्यता आहे. नोकरीत मतभेद होऊ शकतात.


**धनु :** सत्तेत असलेल्या लोकांना नवीन जबाबदाजया मिळू शकतात. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना काही अडचणी येऊ शकतात. आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात.

**मकर :** आज कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होईल. पूर्ण होत आलेल्या कामात अचानक अडथळा येऊ शकतो. व्यवसायात एखाद्या अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. अन्यथा फसवणूक होऊ शकते.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी संघषार्चा असेल. महत्त्वाच्या कामात अडथळे येतील. तुमच्या समस्येला जास्त काळ वाढू देऊ नका. तुमचा राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. तुम्हाला नवीन मित्र मिळतील. कामाच्या ठिकाणी काही दबाव वाढू शकतो. आज कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील. व्यवसायात अडथळ्यांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २२१५



**आडवे शब्द :-**


१) मैने प्यार किया, दबंगचा नायक
५) सिद्ध
९) आईचा भाऊ
११) सातव
१२) सट्ट्याचा एक प्रकार
१३) भावांच्या बायकांसंबंधी, सामाईक
१७) पाताळ
२०) दोन आण्याचे नाणे
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) हाड, छोटे हाड (ग्रा.)
२४) पक्के आश्वासन
२६) माळ, हार (हिं.)
२७) माल
२८) वर्णन करणे
२९) व्रत
३०) कलावंत
३२) एकरुप
३५) वरपांगी
३६) ढग
३७) नकार देणे
३९) वितरण
४१) दात
४३) किंमत
४४) पुरुष
४६) श्रीमंत
४८) हेतू, कारण
५१) साधारण, जेमतेम
५२) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५४) कणव
५५) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) कालाचे परिमाण
५८) कैवारी, सांभाळणारा
५९) मनाला आलेला थकवा
६१) कपाळाला झालेली खोलवर जखम
६३) अर्धवर्तुळाकार
६५) आजीची आई
६७) विवाहित स्त्री
६९) सुसर
७०) डोंगराचा उभा भाग
७१) आशीर्वाद
७२) तृष्णा
७३) दक्षतेचा इशारा
७४) दया

**उभे शब्द :-**

१) बाजरी
२) बारीक केस
३) वाकणे, नमणे
४) बाज, पलंग
५) होकार नसणे
६) प्रकृती
७) काढलेली सुट्टी
८) पाळलेले, माणसाळलेले (जनावर)
९) भ्रम, जादू
१०) बागवान
१४) धाक, दरारा
१५) स्तुती
१६) कलेचा साठावा अंश
१८) मागे-पुढे करणे, तारतम्य
१९) किंचित छोटा
२२) घराण्याला कलंक लावणारा
२५) फुटाणे
२६) मत्स्य
२८) वाईट इच्छा
२९) राबता, जाणे-येणे
३०) हात
३१) मोटार(इं.)
३३) आई (इं.)
३४) सापाची एक जात
३५) केस कापणे
३८) एकाद्याच्या वतीने भीड घालणे
४०) उलथणे
४२) धमकी
४५) प्रजा
४६) प्रतिष्ठित
४७) भविष्य कथनाचा एक प्रकार
४९) केलेला अंदाज
५०) तात्पर्य
५३) श्रीरामाची चरित्र गाथा
५५) नवाकोरा
५६) वागणूक
५७) यम, मृत्यू, वेळ
५८) लाकूड तासण्याचे हत्यार
५९) मनाला आलेला थकवा
६०) फिरता पहारा
६२) उष्ण
६४) किंमत
६५) जहाज, जहाजाचा मुक्काम
६६) पाणी, आयुष्य
६८) गाईचे पिल्लू
७०) कशा प्रकारचा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नवरात्रोत्सवात येतोय नवीन कपड्यांचा ट्रेंड

## राजस्थान, गुजरातवरून येतात गरब्यासाठी विविध ड्रेस

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ११ :

शक्ती उपासनेचे महापर्व शारदीय नवरात्रोत्सवाला लवकरच प्रारंभ होणार आहे. नवरात्री हा एक प्रमुख सण आहे. पंचांगानुसार यंदा शारदीय नवरात्रोत्सव सोमवारी २२ सप्टेंबरला सुरू होत असून, नवरात्रीचे ९ दिवस देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहेत.

या दिवसात शहरात आयोजित होणाऱ्या गरबा उत्सवात नवीन कपड्यांचा ट्रेंड बघायला मिळणार आहे. यंदा ड्रेसच्या किमती २५ टक्क्यांनी वाढल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. यंदा शहरात गरब्याचे ड्रेसेस आणि आर्टिफिशियल दागिन्यांची उलाढाल वाढणार आहे.गरब्यासाठी लागणारे कपडे, दागिने अन्य मॅचिंग वस्तू खरेदीसाठी तरुणाईची बाजारात गर्दी झाली आहे. या उत्सवात रास गरबा विशेष असतो. त्यात युवक, युवती, महिलांचा मोठा सहभाग असतो. नवरंगाचे कपडे परिधान करण्यासाठी त्यांची महिनाभरापासून तयारी सुरू झालेली असते. यंदाही बाजारात नवरात्रीनिमित्त फॅशन ट्रेंड पाहायला मिळत आहे. गुजरात आणि



राजस्थान येथील ड्रेसला जास्त मागणी मागणी आहे. विविध रंगांचे कपडे वापरून देवीचा आशीर्वाद मिळवता येतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे अनेकजण ९ दिवसात ९ रंगांचे कपडे घालतात.

मागणी पाहून दुकानदारांनीही गरब्यासाठी गुजरात आणि उर्वरित. पान ४ दांडिया आणि गरब्यासाठी डिझायनर चनिया चोलीसह मयूरी, रजवाडी, मयूरी नेट, सनेडो, रामलीला झुमका, बोल बच्चन

**मागणी पाहून दुकानदारांनीही गरब्यासाठी गुजरात आणि दांडिया आणि गरब्यासाठी डिझायनर चनिया चोलीसह मयूरी, रजवाडी, मयूरी नेट, सनेडो, रामलीला झुमका, बोल बच्चन नवरंग, कच्छी वर्क, फॅन्सी धोती, नक्षीकाम केलेल्या जॅकेटला मागणी आहे**

नवरंग, कच्छी वर्क, फॅन्सी धोती, नक्षीकाम केलेल्या जॅकेटला मागणी आहे. पुरुषांसाठी नवरात्री स्पेशल केडीयूमध्ये वेगवेगळे प्रकार आणि लहान मुलांसाठीही पारंपरिक पद्धतीचे केडीयू दिसत आहे. तरुण-तरुणीचेड्रेस १५०० ते २ हजार रुपयांपर्यंत आहेत. बहुतांश गरबाच्या आयोजनात दररोजचा ड्रेस वेगळा असतो.

# चिंचाळा येथे एक गाव एक गणपती संकल्प यशस्वी



**मारेगाव:** तालुक्यातील चिंचाळा येथे श्री बाल गणेश उत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी गणेशोत्सव समाजपरिवर्तनासाठी या संकल्पनेवर साजरा करण्यात आला. लोकमान्य टिळक यांच्या स्वप्नातील आणि संत-महापुरुषांना अपेक्षित असलेला गणेशोत्सव येथे उत्साहात पार पडला. या उत्सवात डीजे न लावता केवळ भावगीत व भक्तिगीते वाजवणे अशा महत्त्वाच्या निर्णयांवर सर्वांनी एकमताने शिक्कामोर्तब केले. दहा दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात भजन संध्या, अभंगवाणी, जाहीर कीर्तन, श्री हरिपाठ, व्याख्यान, प्रबोधन यासह गावातील बालगोपाल, स्त्री-पुरुष यांच्यासाठी खेळांचे कार्यक्रमही घेण्यात आले. शेवटच्या दिवशी खेळातील विजेत्यांचा सत्कार करून त्यांना श्री हनुमान चालीसा आणि भेटवस्तू देण्यात आल्या. उत्सवाच्या अंतिम दिवशी 'आत्मनिर्भर ग्राम' ही संकल्पना सर्वांसमोर ठेवून गावातीलच श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, श्री गुरुदेव स्वर साधना भजन मंडळ आणि श्री हनुमान पदावली भजन मंडळ यांच्या पुढाकाराने श्री गणेशाच्या विसर्जनासाठी पालखी काढण्यात आली. भजनाच्या गजरात गणपतीचे विसर्जन करून उत्सवाची सांगता झाली. या उपक्रमामुळे गावात एकतेचा आणि सकारात्मक बदलाचा संदेश पोहोचला असून 'एक गाव -एक गणपती' ही संकल्पना यशस्वी ठरली.

# रस्त्यावरील वाहून गेलेल्या पुलाची पाहणी



■ महासागर प्रतिनिधी,
रिसोड , दि. ११ :

तालुक्यातील रिसोड ते हिवरा (रो.) रस्त्यावर असलेला पूल यंदा पावसाळ्यात तिसऱ्यांदा वाहून गेला आहे. या समस्येची गंभीर दखल घेत माजी मंत्री व खासदार अनंतराव देशमुख यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला आणि पूल वाहून जाण्याची कारणे व उपाययोजनांची सविस्तर माहिती घेतली. ग्रामस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन देशमुख यांनी तातडीने तात्पुरती दुरुस्ती (डागडुजी) करून रस्ता सुरू करण्याची हमी दिली. तसेच पुढील सहा महिन्यांत या ठिकाणी नवीन पूल बांधकाम पूर्ण करून ग्रामस्थांना दिलासा देऊ, असे आश्वासन दिले. या पाहणी वेळी वाघळुद ग्रामपंचायतीचे सरपंच कृष्णा दादाराव देशमुख, माजी तंटामुक्ती अध्यक्ष विलासराव देशमुख, ग्रामपंचायत सदस्य नरसिंगराव सरनाईक, माजी सदस्य विलासराव गायकवाड, शासकीय ठेकेदार गणेशराव देशमुख, तसेच राजुभाऊ देशमुख, सुनील देशमुख, संजाबराव देशमुख, संतोषराव देशमुख, मोतीराम जाधव, भगवान गिरी, ओम देशमुख, वेदांत देशमुख, अक्षय देशमुख, विनोद नंदनकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या भेटीद्वारे स्थानिकांना दिलासा मिळत असून, नवीन पुलाच्या कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. ग्रामस्थांची मोठी अडचण ग्रामस्थांनी पुलामुळे होणाऱ्या अडचणींचे विवरण माजी खासदारांसमोर मांडले. विशेषतः विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्यासाठी, शेतकऱ्यांना शेतमाल वाहतुकीसाठी आणि रुग्णवाहिका हालचालीसाठी हा पूल अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगण्यात आले. देशमुख यांनी ग्रामस्थांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही दिले.

# पोषणयुक्त आहार घेणे ही निरोगी जीवनाची पहिली पायरी

■ महासागर प्रतिनिधी,
दर्यापूर , दि. ११ :

प्रत्येक व्यक्तीने आपले आरोग्य निरोगी राहण्यासाठी संतुलित आहार घेणे महत्वाचा आहे. याचा अर्थ असा की योग्य प्रमाणात वेगवेगळे पोषणात्मक पदार्थ खाणे गरजेचे आहे. जेणेकरून तुमच्या शरीराला आवश्यक पोषक घटक मिळेल. चांगला आहार तुमच्या शरीराची वाढ होण्यास मदत करते. विद्यार्थ्यांनी फास्टफूड खाण्याऐवजी दररोज पोषणयुक्त आहार घेणे, हे निरोगी जीवन जगण्याची पहिली पायरी आहे. असे प्रतिपादन प्रा. नीलेश अढाऊ यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थाद्वारा संचालित स्थानिक जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात जागतिक पोषण दिन हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी किशोरवयीन मुलीच्या आहार व आरोग्य विषयक समस्या या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.अढाऊ बोलत होते.प्राचार्य डॉ.अतुल बोडखे यांच्या



मार्गदर्शनाखाली गृह-अर्थशास्त्र विभाग व महिला तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश माता, अर्भक आणि लहान मुलांचे कुपोषण कमी करणे , आरोग्य आणि पोषणाला प्राधान्य देणे हा आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. निलेश अढाऊ, प्रमुख वक्त्या म्हणून आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट, मुंबईच्या अश्विनी वानखडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

अश्विनी वानखडे यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थीनींना विविध महत्त्वपूर्ण विषयांवर शास्त्रीय दृष्टीकोनातून मार्गदर्शन करतांना सांगितले की, मासिक पाळीचे चक्र, पाळी दरम्यान होणारे शारीरिक व भावनिक त्रास, तसेच त्यावरील उपाय याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन गृह-अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्योत्स्ना पुसाटे तर आभार प्रा. डॉ.वैशाली चौरपगार यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा.माधुरी कदम, प्रा. महल्ले तसेच बहुसंख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना अश्विनी वानखडे व मंचावर उपस्थित डॉ. ज्योत्स्ना पुसाटे, प्रा. नीलेश अढाऊ प्रत्येक व्यक्तीने पोषक युक्त आहाराला महत्व द्यावे आपल्या दैनंदिन जीवनामध्ये संतुलन आहार घ्यावा. प्रत्येक विद्यार्थीनींनी योगा ,ध्यान, याकडे लक्ष द्यावे, तरच आपले आरोग्य चांगले राहील. असेही आवाहन या वेळी मान्यवरांनी विद्यार्थीनींना केले.

# विकासकामांची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी,
वाशीम, दि. ११ :

बंजारा समाजाची 'काशी' म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध पोहरादेवी तसेच उमरी येथील विकासकामांची पाहणी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आज (दि.९ सप्टेंबर) केली. यावेळी त्यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा आढावा घेऊन पर्यटन दृष्ट्या आकर्षक व नागरिकांसाठी सुविधायुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या कामांना गती देण्याच्या सूचना दिल्या. यामुळे आता या ठिकाणी प्रशासनाच्या पुढाकारातून पर्यटनासाठी विशेष सुविधा उपलब्ध केल्या जातील. यासाठीच्या सूचनाही आता देण्यात आल्या आहेत. दरवर्षी याठिकाणी मोठया संख्येने भाविक सहभागी होतात. यामुळे या ठिकाणाला पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी आता प्रयत्न केला जात आहे.

या पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच बांधकामाधीन असलेले पर्यटक निवास, संत सेवालाल महाराज मंदिर, रामराव बापू समाधी स्थळ,उमरी येथील जेतालाल महाराज मंदिर परिसर आणि भाविकांसाठी उभारण्यात येत असलेले यात्री शेड व बंजारा विरासत संग्रहालय, आदी स्थळांना भेट दिली. विकासकामांतर्गत सुरू



बांधकामांची प्रगती तपासून संबंधित यंत्रणेला गतीमान करण्याचे निर्देश दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी कारंजा कैलास देवरे, मानोरा तहसीलदार डॉ. संतोष येवलेकर, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अविनाश धोंगडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) वाकोडे, गटविकास अधिकारी प्रफुल्ल भोरखडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कंत्राटदार उपस्थित होते. विशेषतः पोहरादेवीच्या बाबतीत शासनाने मान्य केलेल्या विकास आराखड्याला प्रत्यक्षात आणण्यासाठी व मूर्त स्वरूप देण्यासाठी जिल्हा प्रशासनाची विशेष भूमिका आहे. आराखड्याअंतर्गत बंजारा विरासत,मंदिर परिसर, रस्ते, वाहतूक नियोजन, पायाभूत सुविधा, महिला सुविधा, शौचालये, पर्यटक निवास यासाठी शासन आणि प्रशासनाचा योग्य समन्वय ठेवावा.

असे ते म्हणाले. यांसारख्या कामांसाठी शासन व प्रशासनाने घनिष्ठ समन्वय ठेवणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी प्रगतिपथावरील कामांची माहिती दिली.

# सिंदखेडराजा विकास आराखड्याची मागणी लावून धरणार

## प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
सिंदखेडराजा , दि. ११ :

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज माँ साहेब जिजाऊंचे दर्शन घेतले असून सिंदखेडराजा विकास आराखड्याची मागणी लाऊन धरणार असल्याचे सांगितले. बुलडाणा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ता मेळाव्याचे निमित्ताने प्रदेशाध्यक्ष जिल्ह्यात



दाखल झाले आहेत. राजे लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यात जाऊन त्यांनी माँ जिजाऊंचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी राजवाड्यामध्ये गवत वाढलेले आहे. त्याचे संवर्धन करण्यासाठी पर्यटन मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार असून त्यांना सुद्धा सिंदखेडराजा येथे प्रत्यक्ष बघण्याचे निमंत्रण देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या राजवाड्याचे साफसफाईचे काम नगर परिषदेकडे देण्यात यावे, अशी त्यांनी यावेळी मागणी केली. एकंदर सिंदखेडराजा विकास आराखडा यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार रेखा खेडेकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र अंभोरे शहराध्यक्ष सिताराम चौधरी, शिवाजीराजे जाधव, सतीश काळे, श्याम मेहेत्रे, विठ्ठल राठोड सहकार्यकर्ते उपस्थित होते.


**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विधमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

-: जाहीरनामा :-

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



(The same notice "महसूल व वनविभाग / कोर्ट विधमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय … -: जाहीरनामा :- … तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता" is printed in 10 further boxes.)


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## अवकाशपरी जान्हवी डांगेटी



जान्हवी डांगेटी या २३ वर्षीय भारतीय महिला शास्त्रज्ञाची नासाच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन क्षेत्रात आपले स्थान सिद्ध केले आहे. टायटन स्पेस इंडस्ट्रीज या अमेरिकन कंपनीच्या २०२९ च्या अंतराळ मोहिमेसाठी जान्हवीची निवड झाली आहे. या मोहिमेत अंतराळवीर पृथ्वीभोवती दोनदा प्रदक्षिणा घालतील आणि दोन सूर्योदय आणि दोन सूर्यास्त पाहतील.या प्रवासात तिला तीन तास शून्य गुरुत्वाकर्षणाचा अनुभव मिळेल. हे उड्डाण अमेरिकेतून सुरू होईल आणि ऑर्बिटल पोर्ट स्पेस स्टेशनपर्यन्त जाईल. या मोहिमेचे नेतृत्व नासाचे अनुभवी अंतराळवीर आणि निवृत्त अमेरिकन सैनिक कर्नल विल्यम मॅकआर्थर ज्युनियर करणार आहेत. ते टायटन्स स्पेससाठी मुख्य अंतराळवीर म्हणून काम करतात. २०२६ मध्ये जान्हवी या अंतराळ मोहिमेसाठी विशेष प्रशिक्षण घेईल.जान्हवीने तिचे प्राथमिक शिक्षण आंध्र प्रदेशातील पलकोल्लू येथे झाले तर पंजाबमधील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये तिने इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन इंजिनिअरिंगची पदवी मिळवली. त्यामुळे तिला विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपले करियर घडवण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त झाली.

जान्हवी नासाच्या इंटरनॅशनल एअर अँड स्पेस प्रोग्राममध्ये भारतातील पहिली महिला शास्त्रज्ञ म्हणून सहभागी झाली होती. यावेळी तिने नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमध्येतिने शून्य गुरुत्वाकर्षण, उच्च उंचीवरील मोहिमा, स्पेस सूट ऑपरेशन्स आणि प्लॅनेटरी सिम्युलेशनमध्ये प्रशिक्षण घेतले आहे. पोलंडयेथील ॲनॅलॉग ॲस्ट्रोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये जान्हवीने मंगळासारख्या ग्रहांवर वावरण्याचे प्रशिक्षणदेखील घेतले आहे. तसेच हवाई येथील पॅन स्टार्स टेलिस्कोपच्या सहाय्याने ॲस्टोराईड्सम्हणजे अवकाशातील छोट्या ग्रहांच्या शोधात जान्हवीचे योगदान लक्षणीय आहे. जान्हवीला नासाच्या स्पेस ॲप्स चॅलेंजमध्ये पीपल्स चॉइस अवॉर्ड तर इस्रोच्या वर्ल्ड स्पेस वीकमध्ये यंग अचिव्हर अवॉर्ड मिळाले आहे.जान्हवीच्या कुटुंबीयांचा तिच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे. तिचे आईवडील श्रीनिवास आणि पद्मश्रीसध्या कुवेतमध्ये राहतात. जान्हवी डांगेटीच्या या प्रेरणादायी प्रवासामुळे भारतीय महिलांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्याची प्रेरणा मिळते आहे.

मानिनी

**जान्हवी नासाच्या इंटरनॅशनल एअर अँड स्पेस प्रोग्राममध्ये भारतातील पहिली महिला शास्त्रज्ञ म्हणून सहभागी झाली होती. यावेळी तिने नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमध्येतिने शून्य गुरुत्वाकर्षण, उच्च उंचीवरील मोहिमा, स्पेस सूट ऑपरेशन्स आणि प्लॅनेटरी सिम्युलेशनमध्ये प्रशिक्षण घेतले आहे. पोलंडयेथील ॲनॅलॉग ॲस्ट्रोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये जान्हवीने मंगळासारख्या ग्रहांवर वावरण्याचे प्रशिक्षणदेखील घेतले आहे. तसेच हवाई येथील पॅन स्टार्स टेलिस्कोपच्या सहाय्याने ॲस्टोराईड्स म्हणजे अवकाशातील छोट्या ग्रहांच्या शोधात जान्हवीचे योगदान लक्षणीय आहे.**

## कसा वाढवाल आत्मविश्वास?



आत्मविश्वास वाढवण्यासाठी सर्वप्रथम स्वतःवर विश्वास ठेवणे महत्त्वाचे आहे. आपण जसे आहोत तसे स्वतःला स्वीकारले पाहिजे. त्यासाठी स्वतःला ओळखायला शिका. आपल्या गुणांकडे लक्ष द्या आणि छोट्या-छोट्या यशाचा आनंद घ्या. अपयश आले तर निराश न होता त्याकडे शिकण्याची संधी म्हणून पाहा. रोज सकारात्मक विचार करा आणि हे 'मी करू शकतो / करू शकते' असे स्वतःला वारंवार सांगा. चांगल्या लोकांच्या सहवासात राहिल्याने मनाला बळ मिळते. नियमित व्यायाम, चांगले वाचन आणि नवीन कौशल्ये शिकणे हेही आत्मविश्वास वाढवण्यासाठी उपयोगी ठरते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्वतःवर प्रेम करा.आत्मविश्वास वाढवण्यासाठी काही कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. संवादकौशल्य वाढवा म्हणजे स्पष्ट, आत्मविश्वासाने आणि योग्य शब्दांत बोलणे शिका.छोट्या गटात किंवा कार्यक्रमात बोलण्याची सवय लावून घ्या. तुमची शरीरभाषा ठाम ठेवा. सरळ उभे राहणे, डोळ्यात डोळे मिळवून बोलणे, हसतमुख राहणे यामुळे आत्मविश्वास वाढतो.वेळेचे योग्य व्यवस्थापन करायला शिका. वेळेचा योग्य वापर केल्याने स्वतःवरचा विश्वास वाढतो.लहानसहान निर्णय स्वतः घेण्याचा सराव करा. म्हणजे आपोआपच निर्णयसाठी इतरांवर अवलंबून राहणे थांबेल आणि आत्मविश्वास वाढेल. संगणक वापरणे, स्वयंपाक करणे, चित्रकला, वादन, लेखन, क्रीडा किंवा परदेशी भाषा शिकणे यासारखी नवीन कौशल्ये शिका. त्यामुळे आत्मविश्वास तर येतोच पण आपले व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनते. आत्मविश्वास हा एकाच दिवशी येत नाही. पण सतत शिकणे, प्रयत्न करणे आणि स्वतःला स्वीकारणे यामुळे तो हळूहळू प्रबळ होतो.

स्किल डेव्हलपमेंट

## मुलीला मदत करायची आहे...

माझ्या २४ वर्षांच्या मुलीचं एका मुलावर प्रेम आहे. तो आयुष्यात स्थिरस्थावर आहे. पण का कोण जाणे,मला तो फारसा आवडत नाही. माझी मुलगी त्याच्याशी बरेचदा वाद घालते. फोनवरही त्यांच्यात भांडणं सुरू असतात. या भांडणांमुळे ती सारखी रडत असते. दर दोन दिवसांनी तिचं हे रडणं पहायला मिळतं. त्याला तिच्याशी लग्न करण्यात रस नसल्याचं तिचं म्हणणं आहे. पण लवकरच सगळं काही सुरळीत होईल, असं तिला वाटतं. त्या दोघांचे स्वभाव फारसे जुळत नाहीत, असं मला वाटतं. या नात्याशी संबंधित समस्या, प्रश्न, अडचणी ती मला सांगत नाही. मी तिला कशी मदत करू?



– तुमच्या मनस्थितीची मला निश्चितच कल्पना आहे. पालक म्हणून आपण आपल्या मुलांची खूप काळजी घेतो. त्यांच्या भविष्याबद्दल जागरूक असतो. पण तुमची मुलगी सज्ञान आहे. त्यामुळे तिचा निर्णय तिनेच घ्यायला हवा, असं वाटतं. तुम्हाला वाटणारी चिंता स्वाभाविक आहे. पण या नात्यात सतत नाक खुपसल्यामुळे तिच्यात आणि तुमच्यात अधिक दुरावा निर्माण होईल. या नात्याबद्दल ती आशादायी आहे. त्यामुळे तिला तुमचा खंबीर पाठिंबा हवा आहे. तुमचं भरपूर प्रेम मिळावं, अशी तिची अपेक्षा आहे. परिस्थिती कशीही असली तरी आई आपल्या पाठीशी आहे याची जाणीव तिला करून द्या. तिला तुमच्याबद्दल विश्वास वाटायला हवा. यामुळे ती स्वतःच्या अडचणी तुम्हाला सांगेल. तुम्ही या मुलाशी बोलू शकता. या दोघांना समुपदेशकाकडे नेऊ शकता. मात्र लग्नाचा निर्णय तुमच्या मुलीलाच घ्यायचा आहे हे लक्षात ठेवा.

काय करू?



## कुंडीत करा कांद्याची लागवड

कांदा कापताना आपण मुळाकडचा भाग काढून टाकतो. याच भागाचा वापर करून कुंडीत कांद्याची लागवड करता येईल. यासाठी सहा इंच खोल कुंडीचा किंवा कंटेनरचा वापर करा. कांद्याच्या लागवडीसाठी टबचा वापर करता येईल. कांद्यांच्या संख्येवरून कुंडी किंवा कंटेनरची रूंदी ठरवता येईल. आता या कुंडीत सुपीक माती आणि खतं घाला. वरून एक इंच जागा सोडा. आता कुंडीतल्या मातीत दोन इंचांपर्यंत जागा करा. त्यात कांदा पेरायचा आहे. कांद्याची मुळं पेरल्यानंतर वरून माती टाका. त्यात पाणी घाला. माती ओलसर होईल, इतकं पाणी घाला. कुंडीसाठी योग्य जागा निवडा. रोपाला सहा ते सात तास सूर्यप्रकाश मिळेल,अशी जागा शोधा. दरम्यानच्या काळात मातीतला ओलावा टिकून राहील याची पूर्ण काळजी घ्या. माती ओलसर आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी त्यात बोट घालून बघा. माती हाताला ओलसर लागायला हवी. मातीचा वरचा भाग कोरडा आणि टणक वाटला तर थोडं पाणी घाला. काही काळानंतर कांदा कापणीसाठी तयार असेल. कांदे तीन इंचांचे झाले की काढता येतील. अजून मोठे कांदे हवे असतील तर थोडा वेळ थांबता येईल. मात्र तीन इंचांचे कांदे वापरता येतील. कांदे मातीतून काढा, धुवून घ्या आणि वापरायला सुरूवात करा.

परसबाग

## स्क्रबिंगची योग्य पद्धत

त्वचेसाठी एक्सफोलिएशन खूप गरजेचं आहे. एक्सफोलिएशन किंवा स्क्रबिंगमुळे मृत त्वचा दूर झाल्याने चेहरा छान तजेलदार दिसू लागते. म्हणूनच आठवड्यातून एक किंवा दोन वेळा एक्सफोलिएशन करून घेणं गरजेचं आहे.

■ स्क्रबिंग करण्याआधी केस नीट बांधून घ्या. तसंच हेडबँडने पुढचे केसही बांधून ठेवा. यामुळे केस चेहऱ्यावर येणार नाहीत.



■ आता पाणी थोडं गरम करून घ्या. त्यात टर्किश टॉवेल बुडवा आणि हा टॉवेल हलक्या हातांनी दोन ते तीन मिनिटांसाठी चेहऱ्यावर ठेवा. यामुळे चेहऱ्यावरची रोमछिद्रं खुली होतील.

■ चेहऱ्याची रोमछिद्रं खुली झाल्यानंतर सौम्य फेसवॉशने चेहरा स्वच्छ धुवून घ्या.

■ आता तुम्हाला स्क्रबरचा वापर करायचा आहे. तुम्ही पहिल्यांदाच स्क्रबर वापरणार असाल किंवा नव्या कंपनीचा स्क्रबर आणला असेल तर पॅच टेस्ट करून घ्या. यासाठी हातांवर थोडा स्क्रबर घ्या. हा स्क्रबर हनुवटीवर लावून बघा. जळजळ जाणवली नाही किंवा त्वचा लाल झाली नाही तर हे स्क्रब तुम्हाला चालू शकेल.

■ आता तुम्ही स्क्रबरचा वापर करू शकता. स्क्रबिंग केल्यानंतर चेहरा कोमट पाण्याने धुवून टाका. सर्व स्क्रब निघून गेल्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवून टाका. यामुळे उघडलेली रोमछिद्रं बंद होऊन जातील.

■ चेहरा धुतल्यानंतर मऊ टॉवेलने कोरडा करून घ्या. हलक्या हातांनी चेहरा पुसा. आता तुम्ही मॉईश्चरायझर लावू शकता.

अशा पद्धतीने स्क्रबिंग केल्याने तुम्हाला लाभ मिळू शकतील.

ब्युटी टॉक

## चविष्ट भरलेली भेंडी

**आपण नेहमी परतलेली भेंडी बनवतो. बरेचदा एकाच प्रकारची भेंडीची भाजी बनवून कंटाळा येतो. अशा वेळी वेगळ्या प्रकारची भरलेली भेंडी करून बघा. झटपट होणारी ही भाजी सगळ्यांना नक्कीच आवडेल.**

**साहित्य:** पाव किलो भेंडी, एक चमचा बटर, एक चमचा मिक्स हर्ब्ज, एक चमचा रेड चिली फ्लेक्स, अर्धा कप किसलेलं पनीर, एक चमचा हिरव्या मिरचीची पेस्ट, एक चमचा बेसन आणि अर्धा कप किसलेलं चीज, मीठ

**कृती:** भेंडी धुवून स्वच्छ करून घ्या. सर्व भेंडी मधून चीर देऊन दोन भाग करा. आता एका कढईत बटर घाला. गरम झाल्यावर त्यात हिरव्या मिरचीची पेस्ट, पनीर, चिली फ्लेक्स, मिक्स हर्ब्ज, बेसन, चीज आणि मीठ हे साहित्य घालून शिजवून घ्या. भेंडीत भरण्याचं स्टफिंग तयार करून घ्या. आता दुसऱ्या कढईत थोडं तेल घालून भेंडी घालून परतून घ्या. भेंडी कुरकुरीत व्हायला हवी. आता या तळलेल्या भेंडीत मसाला भरा. पोळी किंवा पराठ्यासोबत खा.

रसगंधा



## ट्रेंड डाएटचे...

आज प्रत्येकाला तंदुरूस्त रहायचं आहे. वाढलेलं वजन कमी करण्यासाठी अनेकजणी प्रयत्नशील असतात. नव्या वर्षातही काही डाएट ट्रेंड्सचा बोलबाला असेल.



❶ आपल्या ताटातलं अन्न रसायनमुक्त आणि पौष्टिक असावं म्हणून नव्या वर्षात घरच्या अन्नावर भर असेल. यासोबतच सेंद्रिय, रसायनविरहित पदार्थांची चलती असेल.

❷ पौष्टिक आणि आरोग्यदायी पदार्थांचे अनेकविध पर्याय हॉटेल्समध्येही पहायला मिळत आहेत. म्हणूनच घराबाहेरही लोक शक्य तितका पोषक आहार घेत आहेत.

❸ पारंपरिक भोजनाऐवजी आरोग्यदायी पर्यायांची निवड होणार आहे. मैद्याच्या जागी गव्हाचा वापर वाढतो आहे. तसंच मिश्र पिठांवरही लोकांचा भर आहे. नेहमीच्या दुधाऐवजी नारळ किंवा बदामाचं दूध, पनीरऐवजी टोफू खाणं पसंत केलं जात आहे.

❹ नव्या वर्षात लोकांचा फ्लेक्सिटेरियन होण्यावर भर असेल. फ्लेक्सिटेरियन आहारात फळं, भाज्यांचा समावेश असतो. मात्र त्यात गरजेनुसार दुग्धजन्य किंवा प्राणीजन्य पदार्थांचा समावेश केला जातो.

डाएट अँड न्यूट्रिशन

## ब्लाउजची विविधांगी फॅशन

मैत्रिणींनो, साड्यांवर आपण महागडे ब्लाउज शिवून घेतो. कलाकुसर, नक्षीकाम केलेले ब्लाउज खूप छान दिसतात. या ब्लाउजची शिलाईही खूप जास्त असते. मात्र हे ब्लाउज क्वचितच घातले जातात. एवढे महागडे ब्लाउज नुसते पडून राहणं योग्य नाही. हे ब्लाउज तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता.

▶ तुमच्याकडचा फॅन्सी ब्लाउज हाय वेस्ट स्कर्टवर घालता येईल. प्लेन किंवा डिझायनर ब्लाउज आणि स्कर्ट यांचं कॉम्बिनेशन खूप उठून दिसेल. प्लेन ब्लाउज असेल तर प्रिंटेड स्कर्ट कॅरी करता येईल. प्रिंटेड ब्लाउजवर प्लेन स्कर्ट घालता येईल. अशा ब्लाउजवर मॅचिंग स्कर्टची निवड करा किंवा तुमच्याकडचा एखादा स्कर्ट ब्लाउजसोबत मॅचिंग करून घालता येईल. या लूकसोबत पारंपरिक मोजडी किंवा कोल्हापुरी चप्पल घालता येतील.

▶ धोती पँट आणि मॅचिंग ब्लाउज ही फॅशन खूप छान दिसेल. या लूकसोबत तुम्ही छानसं श्रग घालू शकता. कोणत्याही सोहळ्यात हा पेहराव शोभून दिसेल.

▶ तुमचा ब्लाउज फार हेवी किंवा एंब्रॉयडरीवाला नसेल तर तो वाईड लेंग्थ पँटसोबत कॅरी करा. हा खूप आरामदायी पेहराव आहे. या पेहरावात तुम्ही दिवसभर मिरवू शकाल. कोणत्याही आउटिंगसाठी हा लूक बेस्ट आहे. गडद रंगाचा ब्लाउज आणि लाईट कलर पँट किंवा गडद पँट आणि लाईट ब्लाउज हे कॉम्बिनेशन छान दिसेल. तुमचा ब्लाउज शॉर्ट असेल तर लेस लावा. त्यामुळे तो क्रॉप टॉपप्रमाणे दिसेल.

▶ ट्राउझर किंवा पलाझोसोबतही ब्लाउज कॅरी करता येईल.



प्रिंटेड पँटवर प्लेन ब्लाउज कॅरी करता येईल. ब्लाउज आणि पलाझो किंवा पँट यामुळे तुम्हाला युनिक लूक मिळेल. ब्लाउजसोबत हाय वेस्ट ट्राउझर किंवा पँट कॅरी करा. त्यावर हिल्स घाला. ट्रेंडी ज्वेलरीमुळे तुमचा लूक खुलून दिसेल.

▶ तुमच्याकडे लेहंगा असेल किंवा ट्रॅडिशनल स्कर्ट असेल तर त्यावरही ब्लाउज घालता येईल. लेहंग्यावर ब्लाउज घालण्याचा ट्रेंड जुनाच आहे पण हा लूक खूप छान दिसतो. लेहंगा आणि ब्लाउजसोबत हेवी दुपट्टा कॅरी करा.

फॅशन फंडा

### हेअर केअर

### काळजी कुरळ्या केसांची...

अनेकींना नैसर्गिक कुरळ्या केसांचं वरदान लाभलेलं असतं. अर्थात कुरळ्या केसांची देखभाल करणं खूपच आव्हानात्मक आहे. कुरळ्या केसांचा एक लूक असतो. हा लूक टिकवून ठेवावा लागतो. यासाठी कुरळे केस धुताना विशेष काळजी घ्यायला हवी. कुरळे केस फार धुवू नयेत. आठवड्यातून दोन वेळा केस धुणं पुरेसं आहे. कुरळे केस मुळातच थोडे कोरडे असतात. हे केस वारंवार धुतल्यामुळे ओलावा निघून जातो. असे केस खूपच विचित्र दिसू लागतात. त्यामुळे कुरळे केस फार धुवू नयेत. कुरळ्या केसांना नियमित कंडिशनर लावायला हवा. तसंच डीप कंडिशनिंग करून घ्यायला हवं. केस टॉवेलने खूप घासल्यामुळे केसांचा पोत बिघडतो.



### लाईफस्टाईल

### घरीच बनवा साबण

बाजारातल्या साबणात नाही म्हटलं तरी थोडीफार घातक रसायनं असतात. म्हणूनच तुम्ही घरच्या घरी उटण्याचा साबण बनवू शकता. यासाठी दोन चमचे मुलतानी माती, एक चमचा बेसन, एक चमचा तांदळाचं पीठ, अर्धा चमचा कस्तुरी हळद, एक चमचा जेष्ठमधाची पूड आणि एक चमचा बदामाची पूड असं साहित्य घ्या. हे सर्व घटक एका भांड्यात घाला. नीट मिसळून बाजूला ठेवा. आता तुम्हाला सोप बेस लागेल. मिल्क किंवा क्लिअर सोप बेस यापैकी एकाची निवड करता येईल. अर्धा किलो सोप बेसचा वापर करून बरेच साबण तयार करता येतील. हा सोप बेस डबल बॉयलिंग पद्धतीने वितळवून घ्या. सोप बेस वितळल्यानंतर त्यात आधी तयार केलेलं मिश्रण घाला. चार चमचे मिश्रण पुरेसं आहे. सर्व घटक नीट मिसळून घ्या. मग स्वीट बदाम तेल आणि एसेन्शियल ऑईलचे काही थेंब घाला. आता हे सर्व मिश्रण साच्यात किंवा वाटीत घाला. मात्र त्याआधी साचा किंवा वाटी ऑलिव्ह ऑईलने मोल्ड करून घ्या. साधारण दोन तासांमध्ये साबण घट्ट होईल. आता त्याचा वापर करता येईल.



### स्मार्ट शॉपिंग

### सेलमध्ये खरेदी करताना...

सध्या बऱ्याच ठिकाणी मॉन्सून सेल लागल्याचं पहायला मिळतं. सेलमध्ये कपडे, चप्पल स्वस्त दरात मिळतात. अशा ठिकाणी खरेदीदारांच्या उड्या पडतात. पण सेलमध्ये खरेदी करताना काही गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे. सेलमध्ये पहिल्या दोन दिवसात दर्जेदार आणि तुमच्या साईझच्या वस्तू मिळू शकतात. तसंच शेवटच्या दोन दिवसात तुम्हाला जास्त सवलत मिळू शकते. सेलमध्ये कपडे घेताना बरेचदा तुमच्या आकाराचे कपडे मिळतीलच असं नाही. अशा वेळी मोठ्या आकाराचे कपडे घेऊन अल्टर करता येतील.




### किचन टिप्स

### सायीत घाला कणीक

घरीच तूप कढवण्यासाठी महिला साय जमवून ठेवतात. पण बरीच साय जमवूनही हवं तेवढं तूप होत नाही. भरपूर तूप हवं असेल तर तूप कढवताना सायीत थोडी कणीक घाला. यामुळे थोडी साय असली तरी भरपूर तूप तयार होईल. साय वितळू लागल्यावर त्यात दोन चमचे कणीक घाला. साय अधूनमधून ढवळत रहा. त्यामुळे हळूहळू तूप वेगळं होईल. हे तूप गाळून घ्या.



# नेपाळमधील उद्रेकाची भारतातही शक्यता..

## जावंधीयांचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,वर्धा, दि. ११ :
शेतकरी, शेतमजुराची अशीच उपेक्षा सुरू राहिली तर देशातील गावातला युवक नक्षलवादी होईल, आता तशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जे नेपाळ मध्ये होत आहे तेच येथे सुद्धा होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे खळबळजनक वक्तव्य शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी वर्ध्याच्या विशेष जनसुरक्षा विधेयक विरोधी आंदोलन सभेत बोलताना केले.

वर्ध्याच्या जमनालाल बजाज चौक येथे विशेष जनसुरक्षा विधेयक विरोधात धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जावंधीया यांनी संताप व्यक्त केला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, काँग्रेस नेते शैलेश अग्रवाल, शेखर शेंडे, अभ्यूदय मेघे, अर्चना भोमले, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, नितेश कराळे, शिवसेनेचे नेते नेहाल पांडे, राजू खुपसरे, माजी आमदार अशोक शिंदे, प्रमोद भोमले, मकापचे नेते यशवंत झाडे, हेमलता मेघे, अविनाश काकडे, संदीप किटे आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

पुढे बोलताना विजय जावंधीया म्हणाले की, मला वाटते आपल्या देशातील लोकांची सहनशक्ती मोठी आहे. त्याचाच फायदा राजकीय लोक घेत आहेत. गणपती दूध प्यायला होता हे माहित झाल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी गणपतीला दूध पाजण्याकरिता गेले होते.

हा मास मीडियाचा ट्रायल होता, लोकांना कसं आकर्षित करता येईल हे मोदी यांना लक्षात आल्यानंतर सुंदर फायदा त्यांनी करून घेतला आणि रोज खोटं बोलतात तरी सुद्धा देशात लोकप्रिय आहे, याचंच मला आश्चर्य वाटतं.. गावागावात दहा पंधरा भिंतीं रंगवून पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांनी निवडणूक काळात दिलेल्या वचनाची आठवण करून देण्याची गरज असल्याचं विजय जावंधिया म्हणाले.

गावात रंगविलेल्या भिंती मधून सर्वसामान्य माणूस जागृत होईल. आणि सामान्य माणूसच सत्तेतील खोटारडेपणाला उत्तर देऊ शकतो. सोयाबीन कपाशीचे मोठे नुकसान झाले आहे. असे असताना देखील हमीभाव मिळण्याची शक्यता नाही असल्याचे त्यांनी सांगितले. अभुदय मेघे, यशवंत झाडे, प्रमोद भोमले, अविनाश काकडे, नेहाल पांडे यांनी देखील आपल्या भाषणातून जन सुरक्षा विधेयकाला प्रखर विरोध केला आहे.

बहुपक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांनी धरणे आंदोलन करत सरकारच्या धोरणाचा जमनालाल बजाज चौकात निषेध केला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, माकपा यांच्यासह विविध संघटना या आंदोलनात सहभागी झाल्याचे दिसून आले.

विधेयकाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात लोकशाही विरोधी व नागरी हक्कांवर गदा आणणारे विधेयक तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

# पृथ्वीजवळ २३ ला येणार नेपच्यून ग्रह



### खगोलीय घटनेची प्रचंड उत्सुकता

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ११ :
आपल्या ग्रहमालेतील शेवटचा नेपच्यून ग्रह येत्या २३ सप्टेंबर रोजी पृथ्वीच्या सर्वाधिक जवळ येणार आहे. याला खगोलीय भाषेत प्रतियुती असे म्हणतात. एवढेच नव्हे तर हा ग्रह सूर्याच्याही जवळ येणार आहे. प्रतियुतीदरम्यान ग्रहांचे अंतर पृथ्वीपासून नेहमीच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे खगोल शास्त्रज्ञांना या ग्रहांचे निरीक्षक योग्यप्रकारे करता येते. नेपच्यून ग्रह हा २३ सप्टेंबर रोजी पृथ्वीच्या जवळ येणार असल्यामुळे खगोलप्रेमी व शास्त्रज्ञांमध्ये उत्सुकता आहे.

सूर्याला एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी नेपच्यून ग्रहाला १६५ वर्षे लागतात. तसेच हा ग्रह १६ तासात स्वतःभोवती प्रदक्षिणा पूर्ण करतो. या ग्रहाचा शोध १३ सप्टेंबर १८४६ रोजी जर्मन खगोलशास्त्रही गॅले आणि लव्हेरिया या वैज्ञानिकांनी लावला होता.

नेपच्यून या ग्रहाला १३ चंद्र असून येथील वातावरणात मिथेन वायू असल्यामुळे तो निळा दिसतो. या ग्रहाचा व्यास ४८ हजार ६०० कि.मी. आहे. या ग्रहाचे पृष्ठभागाचे तापमान उणे २१४ अंश सेल्सिअस आहे. २४ ऑगस्ट १९८९ रोजी व्हायेजर-२ हे मानवरहीत यान नेपच्यून जवळून गेले होते. सूर्यापासून या ग्रहाचे अंतर ४५२ कोटी कि.मी. आहे.

वर्षभरात कोणता ना कोणता ग्रह हा पृथ्वीच्या जवळ येत असतो. परंतु, काही ग्रह हे बऱ्याच कालावधीनंतर पृथ्वीच्या जवळ येतात. त्यामुळे अशा घटनांना दुर्मिळ घटना समजले जाते. कधी युती-प्रतियुतीही होत असते. या घटना खगोल प्रेमींसह विद्यार्थ्यांना ज्ञानवर्धनासाठी उपयोगी ठरतात.

**रात्रभर आकाशात पर्वणी**

ढगाळ वातावरण निवळले तर २३ सप्टेंबर रोजी रात्रभर फिक्कट निळ्या रंगाच्या नेपच्यून ग्रहाला दुर्बिणीच्या माध्यमातून बघता येईल. हा ग्रह आकाशात ठिपक्याप्रमाणे लहान दिसत असल्यामुळे तो उघड्या डोळ्यांनी बघता येणार नाही.

मात्र नेहमीच्या तुलनेत पृथ्वीच्या जवळ आल्यामुळे दर्जेदार दुर्बिणीतून त्याची निरीक्षण करता येईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल तज्ज्ञ विजय गिरुळकर यांनी दिली आहे. २३ सप्टेंबरला हा ग्रह सायंकाळी पूर्व क्षितिजावर उगवेल आणि पहाटे पश्चिमेकडे मावळेल. हा ग्रह रात्रभर आकाशात दिसेल. या ग्रहाच्या निरीक्षणासाठी शक्तीशाली दुर्बिणीची आवश्यकता आहे. याआधी हा ग्रह १९ सप्टेंबर २०२३ रोजी पृथ्वीच्या जवळ आला होता, अशी माहिती मराठी विज्ञान परिषदेतर्फे देण्यात आली आहे.

## विदेशी कंपन्यांना झटका, स्वदेशीला संधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्रातील कौशल्य विकासाच्या क्षेत्रात मोठं वळण आलं आहे. आतापर्यंत संशोधन, सल्लागार आणि धोरण आखणीसाठी परदेशी कंपन्यांचा दबदबा होता. पण आता चित्र बदलणार आहे. कौशल्य, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता विभागात स्वदेशीची हाक प्रत्यक्ष अंमलात उतरवली गेली आहे.

राज्यातील आयटीआय, व्यावसायिक शिक्षण संस्था आणि विविध प्रशिक्षण केंद्रांमध्ये रोजगाराशी संबंधित धोरणात्मक अहवाल तयार करणं, संशोधनात्मक काम करणं किंवा अभ्यासक्रमांची आखणी करणं, ही सगळी कामं आता भारतीय कंपन्यांकडे सोपवली जाणार आहेत. म्हणजेच विदेशी कन्सलटंसी कंपन्यांना आता नो एंट्री!

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, स्वदेशी कन्सलटंसींनाच प्राधान्य देण्यात येईल. मेक इन इंडियाच्या धर्तीवर संशोधनातही भारतीय कंपन्यांना जागा दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या बदलामुळे राज्यातील कौशल्य प्रशिक्षण संस्थांमध्ये तांत्रिक आधुनिकतेसोबतच भारतीय विचारांचा सहभागही वाढणार आहे.

### शुद्ध हवेच्या अमरावतीमध्ये रंगणार

## ३८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

### नोव्हेंबर महिन्यात आयोजन, राष्ट्रीय स्तरावर नियोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / अमरावती, दि. ११ :
३८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन अमरावतीमध्ये होणार आहे. १ आणि २ नोव्हेंबर रोजी हे संमेलन होईल, अशी माहिती पक्षीमित्र संघटनेचे किशोर गठडी यांनी दिली. अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेकडे यंदा यजमानपद आहे.

पक्षीमित्रांचे संघटन असलेली महाराष्ट्र पक्षीमित्र ही संस्था राज्यात चार दशकांपासून कार्यरत असून, पक्षी मित्रांचे संघटन, पक्षी अभ्यास, पक्षी संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत आहे.

पक्षीमित्रांचे संघटन व पक्षी विषयक घडामोडींचे आदान प्रदान व्हावे या उद्देशाने संघटनेतर्फे दरवर्षी राज्यस्तरीय तसेच वेळोवेळी विभागीय स्तरावर पक्षीमित्र संमेलने होतात. अशा प्रकारचे संघटन आणि संमेलने घडवून आणणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

**'वेक्स'चे रौप्यमहोत्सवी वर्ष**

अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन ही संस्था पक्षी अभ्यास, वन्यजीव संशोधन व पर्यावरण जनजागृतीसाठी विदर्भात कार्यरत असून, यावर्षी संस्थेच्या स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या रौप्यमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून यावर्षी अमरावती येथे पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन करण्याचे संस्थेतर्फे ठरविण्यात आले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून मान्यता प्राप्त झाल्याने आगामी ३८ वे संमेलन अमरावती येथे होणार हे निश्चित झाले आहे.


**अखिल भारतीय नियोजन**

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त वेक्सतर्फे ऑक्टोबर २०२५ ते ऑक्टोबर २०२६ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे 'वेक्स'च्या नुकत्याच पार पडलेल्या कार्यकारिणी सभेत निश्चित करण्यात आले. तसेच पक्षीमित्र संमेलन हे भव्य स्वरुपात आयोजित करायचे असल्याने त्यास अखिल भारतीय स्तरावरून सुद्धा सहभाग व्हावा याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळेच यावर्षीचे संमेलन हे तिसरे अखिल भारतीय संमेलन सुद्धा होणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध चर्चासत्रे, सादरीकरणे, परिसंवाद, प्रकट मुलाखत व राज्याबाहेरील सहभागींचे बहुभाषिक सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. संमेलनाचा भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे 'विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन', विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा तसेच पक्षी छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे दिले जाणारे पुरस्कार तसेच विविध स्पर्धांच्या पुरस्कारांनी मान्यवरांना गौरवण्यात येणार आहे. यावेळी पक्षीविषयक पुस्तकांचे प्रकाशन सुद्धा होणार असल्याचे समजते.

संमेलनाला जोडून एक दिवस अगोदर पक्षी या विषयावर कार्यशाळा तसेच संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मेळघाट सहलींचे आयोजन करण्यात येणार आहे. या संमेलनास राज्यातून तसेच राज्याबाहेरील सुमारे तीनशे प्रतिनिधी यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

संमेलनाची व सबंधित कार्यक्रमांच्या नोंदणी बाबतची माहिती महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या वेबसाइटवर तसेच विविध माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.


"दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा, कनेक्टिव्हीटी, उत्पादकता, शाश्वत उपाय आणि सुरक्षा या सर्वांची हमी देणाऱ्या अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी आमचे सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे."
**नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

**लोकार्पण समारंभ**

**नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्र. 53 वर बोले पेट्रोल पंप चौक ते नागपूर विद्यापीठ परिसर चौक दरम्यान चार पदरी उड्डाणपुलाचे बांधकाम**
**लांबी : 2.85 कि. मी. । किंमत : ₹ 191 कोटी**

**प्रकल्पाचे फायदे**

बोले पेट्रोल पंप चौक ते वाडी पोलीस ठाणे यातील प्रवासाचा वेळ 35 मिनिटांवरून 8 मिनिटांवर आणला जाईल.

रवी नगर परिसरातील वाहतुकीची वर्दळ कमी होईल.

लॉ कॉलेज चौक, रवी नगर चौक, भरत नगर चौक आणि फुटाळा जंक्शन या मोठ्या चौकात वाहतुकीच्या अनुषंगाने सुरक्षा उपाय योजनेत वाढ.

व्हेरायटी चौक ते जुना वाडी ऑक्ट्राय नाक्यापर्यंत समर्पित सायकल ट्रॅक उपलब्ध होईल.

रस्त्याच्या कडेला सिमेंट कॉंक्रिट ड्रेनेज बांधल्यामुळे रवी नगर परिसरातील पाणी साचण्याच्या समस्येला आळा बसेल.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला पादचारी मार्ग (फुटपाथ).

रस्त्यांवर दिवे लावल्यामुळे सुरक्षा आणि सुरक्षितता अधिक सुधारेल.

दिनांक : शुक्रवार, 12 सप्टेंबर 2025 । वेळ : सायं. 5.30 वाजता
स्थळ : बोले पेट्रोल पंप चौक, अमरावती रोड, नागपूर



शुभहस्ते
**नितीन गडकरी**
केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन, महामार्ग, भारत सरकार

प्रमुख अतिथी
**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



विशेष उपस्थिती
**चंद्रशेखर बावनकुळे**
मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा

**ॲड. आशिष जयस्वाल**
राज्यमंत्री, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार, महाराष्ट्र राज्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अभिजीत वंजारी**<br>विधान परिषद सदस्य | **सुधाकर अडबाले**<br>विधान परिषद सदस्य | **डॉ. परिणय फुके**<br>विधान परिषद सदस्य | **कृपाल तुमाने**<br>विधान परिषद सदस्य | **संदीप जोशी**<br>विधान परिषद सदस्य |
| **डॉ. नितीन राऊत**<br>आमदार (उत्तर नागपूर) | **कृष्णा खोपडे**<br>आमदार (पूर्व नागपूर) | **प्रविण दटके**<br>आमदार (मध्य नागपूर) | **मोहन मते**<br>आमदार (दक्षिण नागपूर) | **विकास ठाकरे**<br>आमदार (पश्चिम नागपूर) |

सौजन्य : T and T GROUP T and T Infra Limited

@nitingadkary @officeOfNG | @nitin_gadkari @OfficeOfNG | @gadkari.nitin | gadkari.nitin | Nitin Gadkari

महासागर

# वृत्तसागर

नागपूर

■ शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ ■

## हिट ॲन्ड रनमध्ये दुचाकीस्वाराचा हकनाक मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
भरधाव असलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने मोटारसायकलस्वार व्यक्तीला जबर धडक दिली आणि पळून गेला. यात गंभीर जखमी मोटारसायकलस्वाराचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

ही घटना पारडी ठाण्यांतर्गत आऊटर रिंगरोडवरील तरोडी गावाजवळ घडली. विजय उमाशंकर रॉय (३८) रा. तुमसर, भंडारा असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी त्याचा नातेवाईक धम्मदीप मेश्राम रा. पंचशीलनगरच्या तक्रारीवरून आरोपी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

विजयने तीन महिन्यांपूर्वी गांधीबाग परिसरातील एका ऑटोडीलरकडून एमएच-४०/यू-०१६४ क्रमांकाची मोटारसायकल खरेदी केली होती. ही गाडी स्वतःच्या नावावर करण्यासाठी विजयला बुधवारी सकाळी ग्रामीण आरटीओ कार्यालयात जायचे होते. मंगळवारी सायंकाळी तो मोटारसायकलने नागपूरसाठी निघाला. आऊटर रिंगरोडवर तरोडी गावच्या पुलाजवळ अज्ञात चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्याला जबर धडक दिली आणि पळून गेला. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पारडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. विजयला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

### श्री श्री रविशंकर यांच्या सानिध्यात उघडणार

# शेतकऱ्यांच्या समृद्धीची कवाडे

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि.११ :
नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे. आत्मनिर्भर भारत व आत्मनिर्भर शेतकरी ही संकल्पना राबविण्याकरिता व नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याकरिता राज्य शासनाचा कृषी विभाग आणि आर्ट ऑफ लिविंग यांच्यामध्ये विविध प्रकारचे करार शेतकरी महोत्सवाच्या माध्यमातून होणार आहेत.

अध्यात्मिक व योगगुरु श्री श्री रविशंकर यांच्या पावन सांनिध्यात रामटेक भागात विषमुक्त सेंद्रिय शेतीसोबत शेतकऱ्यांच्या फायद्याच्या अनेक योजनाचे कवाड उघडले जाणार आहे अशी माहिती राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली.

रामटेक येथे आज १२ सप्टेंबर रोजी होऊ घातलेल्या शेतकरी महोत्सवाच्या निमित्ताने ॲड. जयस्वाल बोलताना म्हणाले की, रामटेक ही प्रभू श्री रामांच्या पद स्पर्शाने पावन झालेली पुण्यभूमी आहे. साधू संतांच्या वास्तव्याने आणि तपश्चर्येने या भूमिचे अध्यात्मिक सिंचन केले आहे. आज जगविख्यात अध्यात्मिक व योग गुरु श्री श्री रविशंकरजी यांच्या चरणधुळीने ही भूमी गौरवान्वित होणार आहे.



महाराष्ट्र शासन आणि आर्ट ऑफ लिविंग संयुक्तपणे करणार टाटा कंपनीसोबत सामंजस्य करार

सोमनाथच्या अद्भुत ज्योतिलिंगांचे दिव्य दर्शन या मेळाव्यात उपस्थित राहणाऱ्यांना होईल. हा अद्भुत व अद्वितीय योग असेल. श्री श्री यांच्या शेती व शेतकरी हिताच्या कामांनी, विषमुक्त सेंद्रिय शेती प्रकल्पानें, या शिवाय शाश्वत शेती समृद्ध शेतकरी या ब्रीद वाक्यानुसार केलेल्या कामाने मला अतिशय प्रभावीत केले. आर्ट ऑफ लिविंगच्या बंगलोर आश्रमात मी आचार्य श्री ना भेटलो तेव्हापासून त्यांची मदत घेऊन आपला शेतकरी कसा समृद्ध होईल त्याची मी ब्लूप्रिंट तयार करीत होतो. आता गुरुदेव श्री श्री च्या सान्नीध्यात या सर्व समस्यांवरील उपायांची कवाडे उघडतील असा मला विश्वास आहे.

आर्ट ऑफ लिविंग आणि राज्य शासनाचा कृषी विभाग यांच्यामध्ये अनेक करार देखील होतील. शेतकऱ्यांनी पीकविलेल्या सेंद्रिय शेतमालासाठी बाजारपेठ व विक्रीसाठी मॉल, शेतकऱ्यांच्या शेतात जलतारा योजना, शेतात पडणारे पाणी शेतात जिरवून जमिनीचे पुनर्भरण, नाला खोलीकरणाचे प्रोजेक्ट, माती परीक्षण प्रयोगशाळांची उभारणी, जैविक निविष्ठा केंद्राची निर्मिती, शेतीपूरक व्यवसायासाठी मदत, बांबू लागवड, अटल बांबू योजनेची अंमलबजावणी, पाण्याचे सूक्ष्म नियोजन व सूक्ष्म सिंचन अशा विविध विषयावर चर्चा, निर्णय, करार, परस्पर सहकार्य हा शेतकरी महोत्सव आयोजनामागचा शासनाचा व कृषी विभागाचा हेतू आहे.

शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन भक्कमपणे उभे असून, त्यांच्या समृद्धीसाठी एक पाऊल पुढे टाकणे अपेक्षित आहे. महोत्सवात आचार्य मार्गदर्शन करणार आहे. शेतकरी व नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन ॲड. जयस्वाल यांनी केले.

### रश्मी शुक्ला यांच्याविरुद्ध फोन टॅपिंग प्रकरणी

## मानहानीचा दावा रद्द

पटोले यांनी केला होता ५०० कोटींचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याविरुद्ध दाखल केलेला मानहानीचा दावा न्यायालयाने रद्द केला आहे. वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश आनंद मुंडे यांनी हा निर्णय दिला.



पटोले यांनी ५०० कोटी रुपयांचा दावा केला होता. हा दावा पुणे येथील बहुचर्चित फोन टॅपिंग प्रकरणाशी संबंधित होता. रश्मी शुक्ला पुणे पोलिस आयुक्त असताना २०१७-१८ मध्ये वादग्रस्त फोन टॅपिंग करण्यात आले होते. चौकशी समितीच्या अहवालानुसार गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक वैशाली चांदगुडे यांनी शुक्ला व इतरांविरुद्ध २५ फेब्रुवारी २०२२ रोजी बंडगार्डन पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली होती.

हा मानहानीचा दावा प्राथमिक टप्प्यावरच रद्द करण्यासाठी रश्मी शुक्ला यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेमधील ऑर्डर-७/नियम-११ अंतर्गत अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने तो अर्ज मंजूर केला. पोलिस तक्रारीतील आरोपांमुळे मानहानीचा दावा दाखल केला जाऊ शकत नाही. तसेच, तक्रारीमध्ये पटोले यांच्यावर कोणतेही आरोप करण्यात आले नाही. ती तक्रार पटोले यांच्या विरोधात नाही.

याशिवाय, संबंधित एफआयआर मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. हे मुद्दे दिवाणी न्यायालयाने हा निर्णय देताना विचारात घेतले. शुक्ला यांच्यातर्फे वरिष्ठ ॲड. देवेंद्र चव्हाण, तर पटोले यांच्यातर्फे ॲड. ए. आर. पाटणे यांनी बाजू मांडली.

## महिला आयोग आपल्या दारी

### १८ ला नागपूर येथे जनसुनावणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत नागपूर जिल्हयातील तक्रारींची जनसुनावणी गुरुवार १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सदर येथील जिल्हा नियोजन भवन, नागपूर येथे सकाळी ११ वाजता होणार आहे.

आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर तक्रारींची सुनावणी घेणार आहेत. जिल्ह्यातील अन्यायग्रस्त, पीडित महिलांनी पुढे येवून या जनसुनावणीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोगातर्फे करण्यात आले आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणांमुळे शक्य होत नाही. त्यामुळे आयोग जिल्हास्तरावर पोहचत आहे.

महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत जनसुनावणीला पोलिस, जिल्हा प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक आदी उपस्थित असल्याने तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. यातून आपली कैफियत मंडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याच काम आयोग करीत असल्याचे अध्यक्षा श्रीमती चाकणकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या जनसुनावणीत संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## व्यवसायिकावर गोळीबार करीत लुटले ५० लाख

कडबी चौकाजवळ घडली घटना : हवालाची रक्कम असल्याचा संशय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
कडबी चौक सारख्या अतिशय गजबलेल्या परिसरात बुधवारच्या रात्री ८.३० वाजताच्या सुमारास एका व्यवसायिकावर गोळीबार झाला. व्यापारी जखमी होवून खाली कोसळताच हल्लेखोरांनी त्याच्या दुचाकीच्या डिक्कीतील पन्नास लाख रुपये पळविले.

राजू रुपचंद दीपानी (४४) रा. मेकोसाबाग असे जखमी व्यापाऱ्याचे नाव आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली. माहिती मिळताच जरीपटका ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण क्षीरसागर यांच्यासह ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनीही घटनास्थळी पाहणी केली.

हल्लेखोरांनी लुटपाट करून नेलेली रक्कम हवालाची असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. रात्री उशिरापर्यंत विविध चर्चांना उधान आले होते. उपायुक्त कदम यांनी आरोपीच्या शोधासाठी एक पथक रवाना केले आहे. तसेच शहराच्या सीमा सील केल्या असून वायरलेसवर सर्वांना संदेश देण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राजू हे किराणा व्यवसायी आहेत. तसेच इतर व्यापा?यांकडून पैसे गोळा करण्याचेही काम करतात. तसेच त्यांचे हवाला व्यापाऱ्यांशीही संबध असल्याचे सांगण्यात येत आहे. ते कडबी चौकातील पेट्रोल पंपच्या मागच्या परिसरात राहतात. तो मार्ग सुरक्षित आणि गुळगुळीत असल्याने नेहमीच त्या मार्गावर वाहनांची वर्दळ असते.

इंदोराकडून बर्डीकडे जाणारे किंवा बर्डीकडून इंदोराकडे जाणारे त्याच मार्गाने ये-जा करतात. बुधवारी रात्री दीपानी यांनी ५० लाखांची रक्कम दुचाकीच्या डिक्कीत ठेवली आणि निघाले. काही अंतरावरच पाळतीवर असलेल्या दोन ते तीन आरोपींनी त्यांच्यावर गोळीबार केला.

एक गोळी दीपानी यांच्या पोटावर लागली, दुसरी पायात जाऊन अडकली तर तिसरी खांद्यात घुसली. दुचाकीचे नियंत्रण सुटले आणि दीपानी खाली कोसळले. त्याच वेळी हल्लेखोरांनी त्यांच्या डिक्कीतील पन्नास लाखांची रक्कम काढली आणि पसार झाले. घटनास्थळपासून हाकेच्या अंतरावर पेट्रोल पंप, दुकाने, खानावळ, पानटपरी, पाणीपुरी, नारळ पाण्याचे दुकान आहेत. अशा गजबजलेल्या परिसरात राजूवर गोळीबार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

माहिती मिळताच जरीपटक्याचे पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. तत्पूर्वी जखमीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. राजू शुद्धीवर आल्यानंतर त्यांचा जबाब नोंदविण्यात येईल. त्यानंतरच खरा प्रकार समोर येईल. दरम्यान पोलिसांना अनेक प्रश्नांची उत्तरे शोधायची आहेत. हल्लेखोर कोण, रक्कम कोणाची आणि कुठे घेऊन जात होते. हल्लेखोरांशी त्यांचा काय संबध, त्यांना टीप कोणी दिली. पिस्तूल कुठून आणली. या सा?या प्रश्नांच्या उत्तरासाठी दीपानी यांचे बयान आवश्यक आहे. दरम्यान पोलिस यंत्रणा कामाला लागली असून लवकरच आरोपींच्या मुसक्या आवळल्या जातील असा विश्वास उपायुक्त कदम यांनी व्यक्त केला आहे.

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आज रामटेकमध्ये

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.११ :
राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे १२ सप्टेंबर रोजी नागपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावरयेत आहेत.
१२ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३५ वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे त्यांचे आगमन होईल. सकाळी ६.५० वाजता विमानतळावरुन रवी भवनकडे प्रयाण करतील. सकाळी १० वाजता रवी भवन येथून नेहरु मैदान, रामटेककडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता रामटेक येथे आगमन होईल.



शेतकरी समृध्दी महोत्सवास उपस्थित राहून दुपारी १.३० रामटेक येथून नागपूरकडे प्रयाण करतील. दुपारी ३.४५ वाजता ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून पुणेकडे प्रयाण करतील.

## सोमनाथ ज्योतिर्लिंग आज रामटेकमध्ये

दर्शनासाठी उसळणार भाविकांची तोबा गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ११ :
सोमनाथ मंदिरातील प्राचीन ज्योतिलिंग जे हवेत तरंगत होते, त्याला मोहम्मद गजनींनी १०२६ मध्ये नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. त्या ज्योतिलिंगच्या अवशेषला अग्निहोत्री पुजारी यांनी ११ लहान शिवलिंगमध्ये रुपांतरित केले.



या शिवलिंगाला अभिरक्षक पुजारी सीतारामन शास्त्री यांनी गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना जानेवारी २०२५ ला दिले. हे शिवलिंग दर्शनासाठी नागपूरला आणण्यात आले. या शिवलिंगला रामटेकच्या नगरीत देखील दर्शनासाठी ठेवण्यात यावे. अशी विनंती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केली. ही विनंती गुरुदेव व आर्ट ऑफ लिव्हिंगनी मान्य केली. त्यामुळे नेहरु मैदानात उद्या दिनांक १२ सप्टेंबर ला सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत उपल्ब्ध राहणार आहे. नागरिकांना लाडू प्रसाद व रुद्राक्ष देखील उपलब्ध करून देणार आहे.

या दुर्लभ ज्योतिलिंग चुंबकीय कशी आहे? शास्त्रज्ञांना समजून सांगता येत नाही. हे शिवलिंग माती, पृथ्वीतील कुठलेही खडक किंवा उल्का पासून तयार नाही. असे भूगर्भ शास्त्रज्ञ, खनिज अन्वेषण विभाग यांनी प्रमाणित केलेले आहे. रामटेक नगरी व परिसरातील नागरिकांना या शिवलिंगच्या दर्शनाचा योग प्राप्त झालेला आहे.

## वाडीच्या राजाचे उत्साहात विसर्जन



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ११ :
दत्तवाडी येथील गुरुप्रसाद गणेशोत्सव मंडळाच्या वाडीचा राजा चे विसर्जन थाटामाटात व भावपूर्ण वातावरणात पार पडले. सलग ११ दिवस मंडळाच्या वतीने धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना वाडीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सोहळ्याच्या यशस्वी आयोजनात कार्यक्रम संयोजक अजित पॉल व अभिजित जोशी यांचे विशेष योगदान राहिले. मंडळाचे अध्यक्ष पंकज कौंडण्य, सचिव अमोल सोनसरे, मनीष शर्मा, मनिंदर परमार, अनिल विधळे नितीन अन्नपूर्णे यांनी मोलाची भूमिका बजावली. यशस्वीतसाठी हर्षल काकडे, गौरव जैस्वाल, अमन लाडे, सतीश नायर ,विरेंद्र वर्मा ,कल्पना सगदेव,दीपा डांगे,तृप्ती गोखले, जान्हवी खिरवडकर, मेघना कुटे, अंजली कुलकर्णी, तृप्ती झाडे ,लक्ष्मी बैस यांनी मंडळाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

याचबरोबर बाल गणेश सेना मधील लहान मुले वेदश्री कौंडण्य, उत्कर्ष सोनसरे, योगेश कद्रे, हर्षित मुदलियार, मुदीत मुदलियार, विराज बाटवे, सिद्धू सिरावार, भव्य मंगलानी, आयुष सिरासावार व चिकु कश्यप यांचा विशेष सहभाग मिळाला. या सर्वांच्या सहकायार्मुळे वाडीचा राजा विसर्जन सोहळा अविस्मरणीय ठरला. संपूर्ण वाडी परिसरात भक्ती, उत्साह व एकात्मतेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

## मोक्काच्या आरोपीला एमडीसह अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथक (एनडीपीएस)ने गोपनिय माहितीच्या आधारावर वाठोडा ठाण्यांतगत मोक्कामध्ये आरोपी असलेल्या गुंडाला अंमली पदार्थासह अटक केली. त्याला खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षाही सुनावण्यात आली होती. शफीक खान उर्फ अप्पू रफीक खान (३६) रा. राऊतनगर, वाठोडा असे अटकेतील २२आरोपीचे नाव आहे.

शफीक हा महेंद्रनगर परिसरातील कुख्यात गुन्हेगार फिरोज हड्डी आणि साजिद उर्फ काजू यांचा साथीदार आहे. फिरोज विरुद्धही खुनाचा प्रयत्न, चेन स्नॅचिंगसह गंभीर गुन्हे नोंद आहेत. सोप्या मार्गाने पैसे कमावण्यासाठी फिरोज हड्डी आणि शफीकने मारहाण आणि लुटपाट सोडून अंमली पदार्थांची विक्री सुरू केली.

रात्री २.३० वाजताच्या सुमारास वाठोडा परिसरातील जुन्या दिघोरी नाक्याजवळ शफीक कोणाला तरी माल देण्यासाठी येत असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोनि गजानन गुल्हाने, सपोनि संदीप जाधव, पोहवा विजय यादव, अरविंद गेडेकर, मनोज नेवारे, विवेक अढाऊ, सहदेव चिखले, धनपत मझरेटे, अंकित खरे, राहुल पाटील आणि अनूप यादव यांच्या पथकाने उमरेड मार्गावर सापळा रचून त्याला अटक केली.

### सेवा पंधरवाड्यात शासकीय सुविधांवर आधारित

## नागपूर जिल्ह्यात सेव्हन स्टार महसूली गाव अभियान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक २ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण राज्यभर सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. या सेवा पंधरवाडा कालावधीत नागपूर जिल्ह्यात शासकीय सुविधांच्या प्रभावी अंमलबजावणीवर आधारीत सेव्हन स्टार महसूली गाव अभियान राबविले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

महसूल व जिल्हा परिषदेअंतर्गत गावपातळीपर्यंत सर्व सामान्य जनतेची शासनासंदर्भात असलेली कामे सुरळीत मार्गी लागावीत, जनतेला उत्तम सेवेचा प्रत्यय यावा यावर सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.



सेव्हन स्टार महसूली गाव अभियानामध्ये प्रत्येक गावासाठी पाणंद रस्ता, पात्र असलेल्या गरजूंना पट्टे वाटप, अर्धन्यायिक प्रकरणासंदर्भात स्थानिक पातळीवरच सुलभ न्यायनिवाडा व्हावा यासाठी विशेष लोक अदालत, गरजूंना प्रमाणपत्र वाटप, तक्रार निवारणातून समाधान दिवस, जिवंत सातबारा व फेरफार, संजय गांधी निराधार योजनेतून अधिकाधिकांना न्याय या सात कार्यक्षेत्रांवर केलेल्या कामांचे मूल्यमापन करुन अशा गावांना सेव्हन स्टार महसूली गाव जाहीर केले जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

शासनस्तरावरुन राबविल्या जाणाऱ्या विशेष मोहीमा यांचा उद्देश हा प्रशासन अधिकाधिक पारदर्शी व्हावे, यातून जनतेला न्याय मिळावा, सेवकाची भूमिका शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अधिक वृद्धींगत व्हावी असा असतो. लोक कल्याणाचा भूमिकेतून शासनाने घेतलेले अनेक उत्तम निर्णय याची प्रचिती या पंधरवाड्याच्या माध्यमातून सर्वांना प्रत्ययास यावी व हे अभियान ठराविक दिवस मर्यादेत न राहता कायम सुरु राहावे असा दृष्टीकोन यातून वृद्धींगत होईल असे त्यांनी स्पष्ट केले.

पंधरवाड्यादरम्यान अतिक्रमण नियमानुसार नियमानुकुल करणे, जमीन मालकांना पट्टे वाटप करणे, पाणंद रस्ते मोकळे करणे या कामास प्राधान्य दिले जाणार असून फ्लॅगशिप योजनांचा सुध्दा पंधरवाड्यात समावेश करण्यात आला आहे.

महसूल, कृषि, ग्रामविकास, पुरवठा विभाग, वन विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, उपनिबंधक सहकारी संस्था, नगर पालिका, ग्राम विकास विभाग, मत्स्य विभाग, रेशीम विभाग आणि इतर काही विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

# पगारासाठी शिक्षकांनी मोर्चातून वेधले लक्ष


हक्क व प्रतिष्ठेसाठी धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ११ :

पगार सुरू करण्यासह विविध मागण्यासाठी शालार्थ शिक्षक संघर्ष समितीच्या वतीने यशवंत स्टेडियम येथून संविधान चौकापर्यंत गुरुवारी मोर्चा काढण्यात आला. शालार्थ आयडी घोटाळा समोर आल्यानंतर काही शिक्षकांचे वेतन रोखण्यात आले आहे. गेल्या पाच, सहा महिन्यांपासून शिक्षकांचे पगारच झाले नाही.

त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. शिक्षकांचे काम सुरू असून नियुक्ती देण्यात आली असतानाही पगार रोखण्यात आले आहे. कागदपत्र न दिल्याचे कारणपुढे करत ५०० च्या वर शिक्षकांचे पगार रोखण्यात आले आहे.

यापूर्वी या शिक्षकांनी उपसंचालक व वेतन पथक अधीक्षकांशी चर्चा केली. परंतु पगारच होत नसल्याने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. हा मोर्चा यशवंत स्टेडियम येथून काढण्यात आला.

मोर्चाचे नेतृत्व प्रहार शिक्षक संघटनेचे नागपूर जिल्हाध्यक्ष दिपक कोंबाडे यांनी केले. यावेळी शेकडोच्या संख्येत शिक्षक उपस्थित होते. मुख्य मागण्या

१) शालार्थ प्रणालीच्या प्रकरणामुळे ज्या शिक्षकांचे वेतन रखडलेले आहे ते लवकरात लवकर सुर करण्यात यावे व सेवेतील शिक्षकांचे पगार दिवाळी पूर्वी करण्यात यावे.
२) बोगस शिक्षक या शब्दांचा वारंवार होणारा प्रयोग टाळावा.
३) शिक्षकांना सराईत गुन्हेगारासाखी वागणूक देण्यात येवू नये.
४) समायोजित झालेले शिक्षक यांना शालार्थ मध्ये शिथिलता देण्यात यावी व मुदत वाढ देण्यात यावी.
५) शिक्षण विभागातील भ्रष्टाचार तात्काल थांबवावा.
६) शिक्षण उपसंचालक कार्यालयात समांतर अधिकारी नियुक्त करून त्यांचा कडुन शिक्षकांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.
७) ज्या शिक्षकांचे नियुक्ती संबंधी कागद पत्र उपलब्ध नाही त्यांना ती कागद पत्र शिक्षणाधिकारी कार्यालयातून सांक्षांकित प्रती उपलब्ध करून द्यावे.

# प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकतींवर सुनावणी पूर्ण

## सर्व हरकतींवर प्राधिकृत अधिकारी श्रावण हर्डीकर यांचे समक्ष सुनावणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर मगाविण्यात आलेल्या हरकती व सूचनांवर मंगळवारी (ता.९) महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात सुनावणी पूर्ण झाली. राज्याच्या नगरविकास विभागाने या सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केलेले महाराष्ट्र महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या समक्ष व नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी पूर्ण झाली. यावेळी हद्द बदल बाबत ६०, मतदार यादी व विधानसभा निहाय प्रभाग रचना करण्याबाबत १६, व्याप्तीतील नावाबाबत २५, तर आरक्षणाबाबत ७ आक्षेप प्राप्त झाले होते. महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना गेल्या २३ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात आली होती. यावर गेल्या ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. एकूण ११५ आक्षेपकर्ते यांनी हरकती व सूचना दिल्या होत्या. सुनावणी दरम्यान यातील १५ आक्षेपकर्ते अनुपस्थित होते.



यावेळी महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी, उपायुक्त श्रीमती विजया बनकर, उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, नगर रचना विभागाचे उप संचालक श्री. गिरीश गोडबोले, श्री. ऋतुराज जाधव, कार्यकारी अभियंता श्री. सुनील उईके, श्री. रितेश लोखंडे आदी उपस्थित होते. सुनावणीपूर्वी मनपा डॉ, अभिजीत चौधरी व श्रीमती वैष्णवी बी. यांनी श्रावण हर्डीकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या हरकती व सूचनांचे चार गटामध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. यात प्रभागांच्या हद्दीबाबत आक्षेप, मतदार यादी व विधानसभा निहाय प्रभागरचना करण्याबाबत आक्षेप, व्याप्तीतील नावाबाबत हरकती व आरक्षणाबाबत हरकतींचा समावेश होता. यावेळी हरकत घेणाऱ्यांचे आक्षेप सविस्तरपणे नोंदविण्यात आले. सकाळी ११ वाजता सुनावणीला सुरूवात झाली आणि सायंकाळी ६.३० वाजता सुनावणी प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली. संपूर्ण सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मनपाचे सहायक आयुक्त श्याम कापसे, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, निवडणूक विभागाने अनंत नागमोते, आनंद वराडपांडे, सागर पवार, मकरंद सातपुते, किशोर मोगलेवार, जीवराज काळे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

# जीवन विकास विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांचा तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत विजय



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ११ :

क्रीडा आणि युवा सेवा संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत जीवन विकास विद्यालय आणि ज्युनियर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या गटाने शानदार खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा ओम साई स्पोर्टिंग व्हॉलीबॉल अकादमी येथे पार पडली. खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी दाखवत आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. क्रीडा शिक्षक उमेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या संघामध्ये कर्णधार अथर्व गावंडे, उपकर्णधार तेजस राऊत, ओमकुमार दिघोरे, तुषार रहांगडाले, पवन रजक, नमन बारेकर, नयन बागडे, अमन हवेलीकर, मोहम्मद ताहिर शेख, डॅनियल शेख, इशान वाणी आणि अथर्व वराडे या खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेत यश संपादन केल्याबद्दल खेळाडूंचे अभिनंदन जीवन शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ.श्रा. गो. पराते, उपाध्यक्ष सुरेश झुरमुरे, सचिव प्रशांत सपाटे, सहसचिव बा. रा. बोकडे, अजय घाटे, केशव माणूसमारे, प्रकाश तोवर, नरेंद्र पटेल, जीवन विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दिनेश चुन्हे, उपमुख्याध्यापिका सौ. कुंजलवार, उपमुख्याध्यापक विवेक सातेलवार, पर्यवेक्षक पांडुरंग चौधरी, श्री. बंड, जीवन विकास वनिता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा टोंग, पर्यवेक्षक शशांक नंदनवार, क्रीडा शिक्षक उमेश मोहोड, जगदीश लडके, स्वप्नील गवळी तसेच दोन्ही शाळांचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शंतनू महल्ले यांना आयबीपीएस परीक्षेत अखिल भारतीय सातवा क्रमांक

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. ११ :



गाव लहान असलं तरी स्वप्नं मोठी असावीत याचा उत्तम आदर्श पारडी (गोतमारे) गावातील शंतनू श्रवणजी महल्ले यांनी आपल्या मेहनतीने घालून दिला आहे. आयबीपीएस या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत शंतनू यांनी अखिल भारतीय स्तरावर सातवा क्रमांक मिळवून संपूर्ण जिल्ह्याचा मान उंचावला आहे.

गावातील पहिला प्रथम वर्ग अधिकारी ठरण्याचा मान शंतनू यांच्या नावावर गेला असून, त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवीन उत्साह व ऊर्जा निर्माण झाली आहे.

शिक्षणात नेहमीच प्रगतीशील असलेल्या शंतनू यांनी काटोलच्या नबीरा महाविद्यालयातून बी.एस्सी. व एम.बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर दोन वर्षे जिल्हा परिषद स्पर्धा परीक्षा अभ्यासकेंद्रात परिश्रमपूर्वक तयारी केली. शांत, संयमी व शिस्तबद्ध अभ्यास ही त्यांची खासियत ठरली. योग्य नियोजन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी देशभरातील लाखो विद्यार्थ्यांतून अव्वल स्थान पटकावले.

लवकरच शंतनू पंजाब नॅशनल बँकेत कनिष्ठ व्यवस्थापन श्रेणी स्केल-१ मध्ये क्रेडिट ऑफिसर म्हणून रुजू होणार आहेत. त्यांच्या या यशामुळे गावकऱ्यांबरोबरच संपूर्ण तालुका आणि जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कठोर परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन मिळाले तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय पातळीवर मोठं यश संपादन करू शकतातङ्क हे शंतनू महल्ले यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे.

# शासकीय आदिवासी आश्रम शाळेत जनजागृती शिबिराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ११ :

राज्य आपत्ती प्रतिसाद दल नागपूर येथील टीम च्या वतीने दि.१० सप्टेंबर रोजी शासकीय आदिवासी आश्रम शाळा नवेगाव चिचदा, ता.रामटेक येथे जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले सदर शिबिरामध्ये विद्यालयात शिकत असलेल्या संपूर्ण विद्यार्थ्यांना नैसर्गिक आपत्ती व त्यावर करायच्या उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली सोबतच नैसर्गिक आपत्तीमध्ये एकमेकांची मदत कशी करावी जीवित हानी कशी टाळावी याबाबत प्रामुख्याने मार्गदर्शन करण्यात आले पोलीस उपनिरीक्षक सुनील चव्हाण व त्यांच्या संपूर्ण टीम ने प्रात्यक्षिकासह सीपीआर बाबत सविस्तर मार्गदर्शन केले स्वतःच्या जीवाचे रक्षण कसे करावे याबाबत घरगुती साहित्याचा उपयोग करून बचाव कसे करावे याचे मार्गदर्शन करण्यात आले सदर शिबिराच्या आयोजनाकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रमुख माननीय बच्चन सिंग यांचे विशेष मार्गदर्शन लाभले शिबिराच्या यशस्वी आयोजना करिता शाळेच्या मुख्याध्यापिका पाल व संपूर्ण स्टाफ यांनी विशेष प्रयत्न केले.

# भाजप मीडिया सेलच्या सहसंयोजकपदी तरुण निर्वाण यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



नागपूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष तरुण निर्वाण यांचा नुकतीच भाजप मीडिया सेलच्या सह-संयोजकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. चेंबरचे अध्यक्ष सीए कैलाश जोगानी यांनी यावेळी सांगितले की, नवनियुक्त पदाधिकारी संघटनेला नवी दिशा आणि ऊर्जा देतील. यावेळी कार्यक्रमाला सचिव विजय जयवाल, उपाध्यक्ष प्रदीप जाजू, संचालक वसंत पालीवाल, निखिल काकाणी आणि माजी अध्यक्ष गोविंद पसारी यांची उपस्थिती होती.

# गुप्ता हाऊसमध्ये सव्वा दोन लाखांची चोरी

**हिंगणा:** मार्गावरील ग्रिनिफल्ड सोसायटीसमोर गुप्ता हाऊस येथे राहणाक्तया मनदकुमार राजेंद्रसिंग यांच्याकडे घरोडी करून अज्ञात चोरांनी २ लाख २० हजाराचा ऐवज चोरून नेला. मनदकुमार हे आपल्या घराला कुलूप लाऊन कुटुंबियांसह बाहेरगावी गेले होते. अज्ञात चोरांनी बंद दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटातील २ लाख २० हजाराचे सोन्याचांदीचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी घरोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# मिशन रेबीज मोहिमेअंतर्गत मनपा २८ सप्टेंबरपर्यंत राबविणार मोहिम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपूर महानगरपालिका द्वारा मोकाट कुत्र्यांची नसबंदी व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत राबविण्यात येत असलेल्या 'मिशन रेबीज' या मोहिमेअंतर्गत गेल्या १ सप्टेंबरपासून ते ८ सप्टेंबरपर्यंत ३२५ कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. यामुळे 'मिशन रेबीज' या उपक्रमाला नागरिकाचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. ही लसीकरणाची मोहिम २८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शन अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या देखरेखीत शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी आणि रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरणासाठी 'मिशन रेबीज' उपक्रम राबविण्यात येत आहे. यातून मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण येणार मदत होणार आहे. वर्ल्ड वाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस होप, मिशन रेबिज, निर्मिती पिपल्स अॅन्ड ॲनिमल वेलफेअर सोसायटी, नागपूर द्वारा सामूहिक श्वान रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेची सुरुवात १ सप्टेंबर २०२५ पासून सुरु झाली आहे. या मोहिमेकरिता वर्ल्ड वाईड व्हेटर्नरी सर्व्हिस (डब्ल्यू व्हीएस) तर्फे लसीसह डॉक्टर आणि सहायक उपलब्ध करून देण्यात आले आहे. तर महानगरपालिकेतर्फे वाहन आणि श्वानांच्या लसीकरणासाठी लागणारे

## मोकाट श्वानांच्या लसीकरण मोहिमेला गती



मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात कुत्र्यांच्या लसीकरणाची मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ सप्टेंबरपासून सुरु झालेल्या या लसीकरण मोहिमेत ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत अखेर ३२५ श्वानाचे रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले आहे.

याशिवाय नागपूर महानगरपालिकेच्या झोन निहाय कार्यक्षेत्रातील झोन क्रं. १ ते १० मध्ये आजारी, अपघातग्रस्त, पिसाळलेली, चावा घेणारी भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी झोन निहाय वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. याकरीता भांडेवाडी, गोरेवाडा आणि महाराजबाग येथे पशु निवारा केंद्राची उभारणी केलेली असून औषधोउपचारानंतर पश्चात मुळ जागी सोडण्यात येत असते अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिली आहे.

तीन वर्षात ५६ हजार ९९७ कुत्र्यांचे लसीकरण शहरातील मोकाट प्राण्यांना हाताळणे व त्यांच्यावर नियंत्रणाच्या दृष्टीने नागपूर शहरामध्ये याकरीता भांडेवाडी, गोरेवाडा, आणि महाराजबाग प्राणी जन्म नियंत्रण केंद्र तयार करण्यात आले.

या तीनही केंद्रात स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने मागील तीन वर्षापासून नागपूर महानगर कार्यकक्षेतील कुत्र्यांचे नसबंदी शस्त्रक्रिया व अँटीरेबीज लसीकरण राबविण्यात येत आहे. मे. व्हेटसब फॉर ॲनिमल, सातारातर्फे भांडेवाडी केंद्रात २६ हजार ८००, मे. कृष्णा सोसायटी फॉर ॲनिमल, पुणेतर्फे गोरेवाडा केंद्रात २२ हजार ७९४ आणि मे. स्वातंत्र्य ॲनिमल वेलफेअर सोसायटी, हैदराबाद हैद्राबादतर्फे महाराजबाग केंद्रात ७ हजार ४०३ असे एकूण ५६ हजार ९९७ कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६४ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. बुधवार (ता.१०) रोजी शोध पथकाने ६४ प्रकरणांची नोंद करून ३३,८००/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत २० प्रकरणांची नोंद करून ८,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १००/- रुपयांची वसुली करण्यात आली.दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.४००/-दंड) या अंतर्गत ७ प्रकरणांची नोंद करून २,८००/- रूपयांची वसुली करण्यात आली.मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून ४,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली.वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून ९,५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत ४ प्रकरणाची नोंद करून रू.४,०००/- चे दंड वसुल करण्यात आले.उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १७ प्रकरणांची नोंद करून ३,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास २ प्रकरणांची नोंद करून रु.२,०००/-चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध धंतोली झोन अंतर्गत प्रतीक शंभरकर यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/- चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. भोले किराणा भंडार यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसुल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे.अहमद हॉटेल यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/- चे दंड वसुल करण्यात आले.आशीनगर झोन अंतर्गत मे.राजा बेकरी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/- चे दंड वसुल करण्यात आले.उपद्रव शोध पथकाने ४ प्रकरणांची नोंद करून रू.२०,०००/-दंड वसूल केला.

# आयसीएआय तर्फे जीएसटी एआयचा कर आकारणी वर चर्चासत्र संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :



आयसीएआय नागपूर शाखेने आयसीएआयच्या व्यावसायिक विकास समितीच्या वतीने जीएसटी खटल्यांमध्ये एआयचा कर आकारणी आणि वापर या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. आयसीएआयचे पाच माजी अध्यक्ष, वरिष्ठ मान्यवर, माजी अध्यक्ष आणि २५० हून अधिक सदस्य उपस्थित होते. आयसीएआय नागपूर शाखेचे अध्यक्ष सीए. दिनेश राठी, यांनी सर्वांचे स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या. आयसीएआयच्या पाच माजी अध्यक्षांनी व्यासपीठावर उपस्थित राहून हा ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केला.

आयआरएस, आयकर महासंचालक (प्रशिक्षण), एनएडीटी, नागपूर यांनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.आयसीएआय -सीएचे पाच माजी अध्यक्ष -अशोक चांडक,सीए जयदीप शाह, सीए.सुनील तलाटी, सीए अतुल गुप्ता आणि सीए. निहार जंबुसारिया यांच्या उपस्थितीने सेमिनार अधिक समृद्ध झाला. प्रमुख पाहुणे आयसीएआयचे माजी अध्यक्ष सीए अशोक चांडक यांनी पाच माजी अध्यक्षांना एकाच व्यासपीठावर आमंत्रित करून इतिहास घडवल्याबद्दल नागपूर शाखेचे कौतुक केले. आणि सदस्यांना मौल्यवान अंतर्दृष्टी आत्मसात करण्याचे आवाहन केले.आयसीएआयचे माजी अध्यक्ष जयदीप शाह यांनी अशा ज्ञान-चालित कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल शाखेचे कौतुक केले, अध्यक्ष सीए जितेंद्र सगलानी यांनी त्यांच्या संक्षिप्त भाषणात नागपूर शाखेचे या हाय-प्रोफाइलसेमिनारचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल कौतुक केले .

सीए आय सी ए आय चे माजी अध्यक्ष सुनील तलाटी यांनी कर आकारणी आणि उत्तराधिकार नियोजनाची गुंतागुंत ज्यामध्ये मृत्युपत्र समाविष्ट आहे' यावर भाषण दिले. सीए आय सी ए आय चे माजी अध्यक्ष अतुल गुप्ता यांनी ' टीएसी जिएसटी खटले आणि एआय चा वापर' या विषयावर एक व्यापक सत्र दिले. सीए.आयसीएआयचे माजी अध्यक्ष निहार जंबुसारिया यांनी ङ्गनवीन आयकर कायदा, २०२५ ची महत्त्वाची वैशिष्ट्ये यावर सादरीकरण केले. तांत्रिक सत्रांचे समन्वय सीए अंकुश केशरवानी, सीए. विनोद अग्रवाल आणि सीए. प्रणवकुमार लिमाजा यांनी केले, तर आयसीएआय नागपूर शाखेचे माजी अध्यक्ष -सीए संजय एम. अग्रवाल, सीए किरीट कल्याणी आणि सीए राजीव दमानी यांनी कार्यवाहीचे अध्यक्षपद भूषवले, त्यांच्या निरीक्षणांनी चर्चा समृद्ध केली.

उद्घाटन सत्राचे संचालन सीए उपाध्यक्ष स्वरूपा वाजलवार,आयसीएआय नागपूर यांनी आभार मानले.सचिव दीपक जेठवानी यांनी प्रमुख पाहुणे, माजी अध्यक्ष, वक्ते, सत्र अध्यक्ष आणि या प्रसंगी सीए देखील उपस्थित होते. तृप्ती भट्टड, कोषाध्यक्ष, व्यवस्थापकीय समिती सदस्य - सीए प्रतीक पालन आणि सीएआशिष अग्रवाल, माजी अध्यक्ष सीए सतीश सारडा, सीए महेश राठी, सीए ओ.एस.बागडिया, सीए अनिरुद्ध शेणवाई आणि सीए अभिजित केळकर यांच्यासह या सेमिनारचा समारोप झाला .

# दिघोरामध्ये अतिक्रमण करून राहणाऱ्यांना शासनाकडून पट्टे मिळणार : माजी आमदार राजू पारवे

■ महासागर प्रतिनिधी,
भिवापूर, दि. ११ :
शहरातील विशाल सभागृह येथे भाजपा कार्यकर्ता मेळावा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आमदार राजू पारवे यांच्या अध्यक्षते खाली पार पडला.

तालुका महिला आघाडी व शहर महिला आघाडी यांचा कार्यकारणी घोषित करून असंख्य महिलांचे पक्ष प्रवेश करून नविन जवाबदारी देण्यात आली. तसेच तालुका युवा मोर्चामध्ये युवकांनी प्रवेश केला यावेळी पद वाटप करण्यात आले. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत भाजपाची सत्ता आणू असे प्रतिपादन माजी आमदार राजु पारवे यांनी केले असून शासनाने बऱ्याच वर्षापासून दिघोरा, सिद्धार्थ नगर मध्ये



अतिक्रमण करून राहणाऱ्यानां मालकी हक्काचे कागदपत्रे मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.
या वेळी माजी आमदार सुधीर पारवे, महमंत्री अनिल निधान, रिकेजी चवरे, राहुल किरपाण युवा मोर्चा अध्यक्ष चेतन खडसे, महिला आघाडी अध्यक्ष प्रीतीताई मानमोडे, महामंत्री बशोलीताई चड्डा, माजी शहराध्यक्ष आनंद गुप्ता, अरविंद चौधरी, किशोर मार्गणवार, तालुका महिला अध्यक्ष प्रणिता पडोळे यांच्यासह पक्षाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन निलिमा नागोसे यांनी केले.यावेळी प्रास्तविक भाषण तालुकाध्यक्ष श्रावण वराडे यांनी केले. शहराध्यक्ष अनिल समर्थ यांनी आपले विचार व्यक्त केले हा कार्यक्रम यशस्वीसाठी जिल्हामंत्री हिमांशू अग्रवाल, महामंत्री जावेद कुरेशी,युवा मोर्चाचे अध्यक्ष धनंजय चौधरी, उपाध्यक्ष श्रीकांत बालपांडे, युवराज करनुके,महिला आघाडी अध्यक्ष निशा जांभुळे, वैशाली पेंदाम,सिताबाई दुर्गे व इतराचे सहकार्य लाभले.

# बेसापिपळा नगर पंचायत वृक्षारोपण कार्यक्रम

हिरव्यागार पर्यावरणाच्या दिशेने एक प्रशंसनीय उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ११ :
बेसा-पिपला: 'माझी वसुंधरा' अभियान आणि 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' अंतर्गत, नगर पंचायत बेसा-पिपलाद्वारे शिवनेरी उद्यानात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश स्थानिक नागरिकांना पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरूक करणे आणि परिसराला हिरवे व स्वच्छ बनवणे हा होता.
मुख्य अधिकारी श्री भारत नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात डइख उडठ ऋींपव ची महत्त्वाची भूमिका होती. एसबीआयच्या वतीने श्री मनोज मोहाले , श्री रमेश सिंह (शाखा प्रमुख डइख, बेसा), श्री वासनीक (उपव्यवस्थापक, विभागीय कार्यालय नागपूर पूर्व) आणि श्री मनीष कुमार समदर्शी (आर.एम., आर.बी.ओ. नागपूर पूर्व) उपस्थित होते.
या प्रसंगी नगर पंचायतचे प्रशासकीय अधिकारी मोहित राजनकर, अजय वाघमारे, लेखापाल श्री विष्णु गायकवाड, श्री राहुल घुगे, लेखापाल श्री मनोज कावले, स्वच्छता विभाग प्रमुख श्रीमती पूजा जाधव, स्वच्छता निरीक्षक श्री नितिन इमले, सिटी कोऑर्डिनेटर श्री मंगेश महुलकर आणि फीडबॅक फाउंडेशनचे श्री आकाश दीप आणि श्रीमती ज्योति राजपूत यांनी सक्रिय सहभाग घेतला. नगर पंचायत बेसा-पिपला, फीडबॅक फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट आणि स्थानिक नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. उपस्थित नागरिकांनी उत्साहाने वृक्षारोपणात भाग घेतला आणि लावलेल्या झाडांची काळजी घेऊन पर्यावरण संवर्धनात आपली भूमिका बजावण्याचा संकल्प केला. या उपक्रमांतर्गत, डइख उडठ फंडद्वारे ५०० झाडे उपलब्ध करून देण्यात आली असून, येत्या काही दिवसांत आणखी रोपे दिली जातील. हा प्रयत्न केवळ बेसा-पिपळाला'ग्रीन बेसा' म्हणून विकसित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी आणि हिरवेगार पर्यावरण सुनिश्चित करण्याचाही एक संकल्प आहे.

# अभियंता संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा



■ महासागर प्रतिनिधी, कुही, दि. ११ : जिल्हा परिषद अभियंता संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. जिल्हाध्यक्ष, अभियंता राहुल राघोर्ते यांचे मार्फत सदर सभेचे आयोजन करण्यात आले. सभेच्या आयोजनाचे मुख्य कारण जिल्हा परिषद अभियंता संघटना शाखा नागपूर ची नवीन कार्यकारणी गठीत करणे होते. या सभेला निवडणूक निर्णय अधिकारी सेवानिवृत्त शाखा अभियंता गणेश मेंढेकर, केशव हलगुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर सभेला जिल्हा परिषद नागपूर येथील कार्यरत कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सभासद मोठ्या संख्येने सभेला उपस्थित होते. सदर सभेमध्ये काटोल उपविभाग अभियंता रवी मिरगे यांची सर्वानुमते बिनविरोध जिल्हा अध्यक्ष पदाकरिता निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदावर राहुल फुल्लूके तसेच मनोज झोडापे, नागपूर व कार्याध्यक्ष पदावर दिनेश मुनीश्वर यांची बिनविरोध निवडणूक करण्यात आली. संघटनेचे सचिव विद्युत अभियंता गणेश शहारे, कोषाध्यक्ष पदावर पूनम ईरचालवार यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. नवीन कार्यकारणी गठीत केल्यानंतर मावळते जिल्हाध्यक्ष अभियंता राहुल राघोर्ते यांनी नवीन कार्यकारिणीस पुढील यशस्वी वाटचालीकरिता अभिनंदन व शुभेच्छा देऊन आभार प्रकट केले. नवनियुक्त अध्यक्ष रवी मिरगे यांनी बिनविरोध निवड केल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले. व कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता सहाय्यक अभियंत श्रेणी-२ तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचे आस्थापना विषयक प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावणे करिता आवश्यक ती पावले उचलण्याचे ठोस आश्वासन दिले.

# आग्नेय मध्य रेल्वेमध्ये आधुनिक दूरसंचार सुविधांकडे नवे पाऊल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ : आग्नेय मध्य रेल्वेमध्ये दूरसंचार सेवा अधिक आधुनिक आणि प्रभावी बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला असून महाव्यवस्थापक तरुण प्रकाश यांनी दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, मुख्यालय, बिलासपूर येथे नवीन जीएम इंटरकॉम एक्सचेंजचे उद्घाटन केले.

जीएम इंटरकॉम एक्सचेंजचा शुभारंभ



या प्रसंगी अतिरिक्त महाव्यवस्थापक विजय कुमार साहू, विभागीय रेल्वे व्यवस्थापक जी. पी. खुटे, राजमल खोईवाल तसेच विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे नवीन इंटरकॉम एक्सचेंज अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित एस्टेरिस्क आधारित आयपी टेलिकॉम एक्सचेंज आहे, जे व्हॉइस ओव्हर आयपी प्रणालीवर काम करते. याद्वारे, टेबलटॉप आयपी फोनवरून ऑडिओ आणि व्हिडिओ कॉल करता येतात. या प्रणालीमध्ये कॉन्फरन्सिंग, वन-टच्डायलिंग, व्हिडिओ कॉलिंग, कॉल ट्रान्सफर, कॉल फॉरवर्डिंग इत्यादी अनेक वैशिष्ट्ये आहेत.
व्हिडिओ कॉल मोठ्या डिस्प्ले युनिटवर (टीव्ही/पीसी) प्रदर्शित केला जाऊ शकतो, ही प्रणाली अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सोयीस्कर असेल. ॲस्टेरिस्क सिस्टम ओपन सोर्सवर आधारित आहे आणि कोणत्याही कंपनीच्या हार्डवेअरसह सहजपणे काम करू शकते. ही प्रणाली केवळ सार्वत्रिक आणि लवचिक नाही तर आर्थिकदृष्ट्या देखील फायदेशीर आहे.
रेल्वेच्या कामात याचा वापर करता येतो. यामुळे वेग, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता वाढेल. यावेळी महाव्यवस्थापक तरुण प्रकाश यांनी अधिकाऱ्यांना ही आधुनिक दूरसंचार सुविधा लवकरच स्थापित करण्याचे निर्देश दिले.

# कुही तालुका खाजगी शाळा शिक्षक पतसंस्थेची आमसभा



■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. ११ :
तालुक्यातील खाजगी शाळा सेवकांची पतपुरवठा सहकारी संस्था कुही ची ४१ वी सर्वसाधारण आमसभा लक्ष्मी मंगल कार्यालय येथे समोपचारात संपन्न झाली.
सरस्वती फोटो माल्यार्पण व पुजणाने सभेला सुरुवात झाली. आमसभेला अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष माधव ठावरी होते. प्रास्ताविक व समायोजित भाषणे झाली. संस्थेच्या दिवंगत सभासदांना श्वधाजली वाहण्यात आली. संस्थेतील सभासदांच्या पाल्यांनी परीक्षेत गुणवत्ता प्राप्त केली.
त्यांना याप्रसंगी सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेतील सेवानिवृत्त झालेल्या २२ सभासदांचा सेवानिवृत्तीपर शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.
पतसंस्थेचा वार्षीक अहवालाचे वाचन सचिव शरद देशमुख यांनी केले. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाची समर्पक उत्तरे दिलीत. प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष चैतन्य ठवकर, कोषाध्यक्ष नामदेव ढोले, संचालक आशीष मेहर, शेषराव तितरमारे, श्वावण लांबट, कुंदन तितरमारे, नरेशकुमार शहारे, तज्ञ संचालक राजेंद्र भोयर, संचालिका दिप्ती तिजारे, प्रमिला हलमारे उपस्थित होते. संचालन प्रमिला हलमारे, आभार श्वावन लांबट यांनी केले. संस्थेचे कर्मचारी रवी भायदे, शंकर शेंडे, गौविंदा चौधरी, एकनाथ चकोले यांनी परीश्वम घेतले.

## एटीएममध्ये चोरीचा प्रयत्न : आरोपीला अटक

**नागपूरः** एटीएममध्ये छेडछाड करून चोरीचा प्रयत्न करणाक्तया चेतन चंदू उके (२५) रा. आष्टा (ता. समुद्रपूर) यास कपिलनगर पोलिसांनी अटक केली. चेतन हा ऑटोमोटिव्ह चौकातील स्टेट बँकेच्या एटीएममध्ये गेला. त्याने एटीएमची छेडछाड केली आणि तो बाहेर आला. तो एटीएम बाहेरच थांबला. दरम्यान, दोन तरुण एटीएममध्ये आले आणि त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, एटीएममधून पैसे निघाले नाही. दोघेही तरुण निघून गेले. त्यानंतर पुन्हा चेतन आतमध्ये गेला आणि एटीएममधून पैसे काढण्याचा प्रयत्न करू लागला. तोच एटीएममधील सायरन वाजला. हा प्रकार जवळच्या इमारतीत राहणाङ्घया मुलाच्या लक्षात आला. त्याने ही माहिती नियंत्रण कक्षाला दिली. ऑटोमोटिव्ह चौकात वाहतूक शाखेचे हे. कॉ. मुश्ताक शेख हे आपल्या सहकाङ्घयांसह बंदोबस्त करीत होते. त्यांना ही माहिती समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि चेतनला ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी त्याला कपिलनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# ज्योतिषी नीलम तुममुलवार यांना दैवज्ञ शिरोमणी पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
नागपूरच्या ज्योतिषी नीलम सचिन तुममुलवार यांना भोपाळ येथे आयोजित आंतरराष्ट्रीय ज्योतिष परिषदेत आणि दैवज्ञ



सन्मान सोहळा २०२५ मध्ये दैवज्ञ शिरोमणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दिवं. पंडित मणिराम उपाध्याय यांच्या स्मरणार्थ रत्नवाला मालवीय भोपाळ शहरात आयोजित समारंभात विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित नीलम तुम्मुलवार यांना २०२५ चा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यासोबतच ज्योतिष, तंत्र, विधी, टॅरो कार्ड, हस्तरेषा आणि अध्यात्म या क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल ज्योतिषाचार्य नीलम तुम्मुलवार यांना हा सन्मान देण्यात आला. या आंतरराष्ट्रीय ज्योतिष परिषदेत आणि देवज्ञान सन्मान सोहळ्यात देशभरातील साधक, तंत्राचार्य, ज्योतिषी, टॅरो कार्ड वाचकांसह २०० विद्वान सहभागी झाले होते. सर्वांनी आपापल्या क्षेत्रात आणि विविध विषयांवर संशोधन केले आणि सर्वांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थांवर आपले मत मांडले.

# अडयाळ पुनर्वसन ग्राम सरपंच यांचा मनमानी कारभार

## उपसरपंच ,सदस्य व ग्रामवासी आले सरपंच यांच्या विरोधात

■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. ११ :
भिवापूर पासून पाच किमी अंतरावर असलेल्या अडयाळ येथे ग्राम पंचायत आहे. येथील लोकसंख्या १ हजाराच्या जवळपास आहे. सध्या अडयाळ हे गाव ग्राम पंचायत सरपंच योगेश तुमडाम याच्यामुळे चर्चेत आले आहे. येथील सरपंच ग्राम पंचायत सदस्याला विश्वासात न घेता मनमानी कारभार करीत असल्यामुळे उपसरपंच निखिल येवले यांच्यासह इतर सदस्य व ग्रामवासी यांनी एकत्र येत भिवापूर पंचायत समिती कार्यालय गाठून सहाय्यक गटविकास अधिकारी विजय जिडगिलवार यांना निवेदन देवून सरपंच यांच्या मनमानी कारभारामुळे ग्राम पंचायती ला कुलूप लावण्याचा इशारा यावेळी उपस्थित ग्रामवासी यांनी आज दि. ११ सप्टेबरला निवेदनातून दिला आहे. त्यामुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे. नुकताच पार पडलेला तहकुब ग्रामसभेत चपराशी यांच्या नियुक्तीला उपसरपंच निखील येवले व गावकऱ्यांनी कडाडून विरोध केला होता. तसेच जन सुविधा अतर्गत शोक सभा मंडपाचे निकृष्ट बांधकाम झाले असून मंडपाला भेगा पडल्या आहे. तसेच काटेरी ताराचे कुंपन केले नसल्याचे यात गैर प्रकार झाल्याचा आरोप ग्राम पंचायत सदस्य व ग्रामवासी यांनी केला आहे. पंचायत समिती सहाय्यक गट विकास अधिकारी जिडगिलवार यांना निवेदन देतांना उपसरपंच निखील येवले, ग्राम पंचायत सदस्य अनिल खानखुरे, सौ. मंगला भोयर, सुनंदा अंडेलकर, सौ. अनुसया मेश्राम , रेवता तिडके यांच्यासह मोठया संख्येने ग्रामवासी उपस्थित होते.

# आदर्श हायस्कुल येथे शिक्षक दिवस साजरा

## नाटक , स्पर्धा आणि शिक्षकांचा सत्कार

**कन्हान :** आइडियल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श हायस्कुल कन्हान येथे दहावीच्या विद्यार्थांनी मंगळवार रोजी शिक्षक दिवस कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमात



प्रामुख्याने उपस्थित संस्थेचे अध्यक्ष पुष्पा द्विवेदी , सचिव भरत सावळे , सहसचिव गीता मेश्राम , मुख्याध्यापक गीरजाशंकर यादव , प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका लता पेटकर सदस्या शिवम द्विवेदी , छाया मिसाल सह आदि मान्यवरांचा हस्ते डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन आणि केक कापुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली . मान्यवरांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शिक्षक दिनगच्या शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमात दहाविच्या विद्यार्थांनी नाटक आणि शिक्षक , शिक्षिकांनी विविध खेळ स्पर्धा प्रस्तुत करुन उपस्थितांचे मन मोहित केले . विद्यार्थांनी शिक्षकांचा शॉल आणि भेट वस्तु देऊन सत्कार करुन शिक्षक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला . कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु.प्रीति सोनावने यांनी केले आणि आभार प्रदर्शन कु.उजाला गौतम यांनी केले . कार्यक्रमात शिक्षक , शिक्षिका , कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# कृषिमित्र दिनेश ठाकरे यांना 'छत्रपती महाराष्ट्र उद्योजक सन्मान'

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ११ :
विदर्भातील शेतकऱ्यांना चंदन लागवडीकडे वळिवणारे, कृषी क्षेत्रात सतत नवनवीन प्रयोग करणारे आणि शेतकऱ्यांच्या जीवनमान उंचाविण्यासाठी झटणारे कृषिमित्र दिनेश शेषराव ठाकरे यांना यंदाचा छत्रपती महाराष्ट्र उद्योजक सन्मान जाहीर झाला आहे.
हा प्रतिष्ठेचा पुरस्कार १३ सप्टेंबर २०२५ रोजी पुण्यात केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे.



**चंदनश्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव, पुण्यात १३ सप्टेंबरला केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण'**

**चंदन लागवडीचे जनक ठरले ठाकरे**
काटोल तालुक्यातील दिनेश ठाकरे यांना शेतकरी बांधवांमध्ये 'चंदनश्री' म्हणून ओळखले जाते. पारंपरिक शेतीला नफ्यात आणण्यासाठी त्यांनी चंदन लागवडीचा पर्याय शेतकऱ्यांसमोर ठेवला. स्वतः पुढाकार घेत चंदनाची नर्सरी उभारली आणि त्यातून हजारो रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली. त्यांच्या प्रयत्नामुळे आज विदर्भातील शेकडो शेतकरी चंदन लागवड करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.

**संशोधन व कार्यशाळांचा उपक्रम**
प्रगतशील शेतकरी असलेले दिनेश ठाकरे यांनी शेती नफ्यात आणण्यासाठी सातत्याने प्रयोग केले. शेतीला उद्योगाचे स्वरूप कसे देता येईल? या प्रश्नावर ते वर्षानुवर्षे संशोधन करत आहेत.
याचबरोबर त्यांनी काटोल परिसरात कृषी कार्यशाळांचे आयोजन करून देशभरातील नामवंत तज्ज्ञांना आमंत्रित केले. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतींचे ज्ञान मिळाले आणि उत्पन्न वाढविण्याचे मार्ग खुले झाले.

**संस्थात्मक योगदान**
ठाकरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या हक्कांच्या प्रश्नांवर आवाज उठवला. बाजारपेठेतील शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद मानले जातात.

**परिसरात आनंदाची लाट**
काटोल भागातील नागरिक, शेतकरी व कार्यकर्त्यांनी दिनेश ठाकरे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल हार्दिक अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार केवळ दिनेश ठाकरे यांचा नाही तर संपूर्ण विदर्भातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया अनेक ठिकाणी उमटली आहे.

## सुधीर शंभरकर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे जिल्हा अध्यक्ष



**कामठी :** डॉ गौतम गोसावी महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्याचे, पदाधिकारी घोषित केले.त्यात नागपूर जिल्ह्याच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे अध्यक्ष म्हणून सुधीर भाऊ शंभरकर यांच्या नावाची घोषणा केली. या नियूक्ती बद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नागपुर प्रदेशाचे अध्यक्ष प्रकाश कुंभे, कामठी शहर अध्यक्ष प्रदीप वासनिक , मनोहर कनोजे , सुभाष भोंडेकर , गजभिये आदींनी अभिनंदन केले .

# श्री ऋख्खडाश्रम कनिष्ठ महाविद्यालयात एक दिवसीय विद्यार्थी स्वयंशासन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ११ :
शहरातील पुरातन व शिक्षणाचा उत्तमोत्तम दर्जा कायम ठेवत सतत यशस्वी विद्यार्थी घडविणारे महाविद्यालय श्री ऋख्खडाश्रम कनिष्ठ महाविद्यालयात डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी एक दिवसीय विद्यार्थी स्वयंशासित कार्यक्रम राबविण्यात आला.
कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, दीपप्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. एक दिवसीय स्वयंशासित प्राचार्य कुमारी पलक गेडाम, उपप्राचार्य आर्यन कांबळे यांनी कामकाज पाहिले. कार्यक्रमाला विचार मंचावर उपस्थित अध्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य ज्योती गोंधळे मार्गदर्शन करताना म्हणाले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वातंत्र्य काळात सोव्हिएत युनियनमध्ये भारताचे राजदूत (आलरीरवी) होते. या पदावर कार्यरत असतांना




रशियाचे राष्ट्राध्यक्ष स्टॅलिन यांच्या सोबत काम करण्याची व चर्चा करण्याची संधी एका शिक्षकाला मिळाली. ही आपल्या सर्व शिक्षकांसाठी गर्वाची, अभिमानाची गोष्ट आहे. ते एक प्रसिद्ध भारतीय तत्त्वज्ञ, शिक्षक आणि राजकारणी होते, ज्यांनी भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती म्हणूनही काम पाहिले. यशस्वी जीवनाची पायाभरणी ही शालेय शिक्षणातूनच होते. नंतरच्या काळात उच्च शिक्षण घेतानाच निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवूनच पुढील वाटचाल केली पाहिजे. विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिनातील सहभाग हा केवळ शिक्षक होण्याचा अनुभव देणारा नसून, भविष्याला आकार देणारी रूची, कला दर्शविणारे एक प्रतीक असते.
विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून भूमिका पार पाडताना जबाबदारीने संपूर्ण दिवस कारभार सांभाळला. अदिती राऊत या विद्यार्थिनींनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. दुर्गा गजभिये या विद्यार्थिनीने कविता सादर केली. स्वयंशासित उपप्राचार्य आर्यन कांबळे या विद्यार्थ्यांनी या दिवसाचे महत्त्व, शिक्षकच हे खरे समाजाचे आदर्श आहेत. तसेच स्वयंशासित प्राचार्य पलक गेडाम यांनी मानवी जीवनाचे धडे, शिक्षक या माध्यमातून मिळते असे मनोगत व्यक्त केले.
प्रत्येक स्वयंशासित शिक्षक वर्गात शिकवत असताना भविष्यात उत्कृष्ट शिक्षक होण्याची, एक प्रचिती दिसून आली. ४५ विद्यार्थ्यांनी विविध विषय वर्गात शिकविले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा रेखा बन्सोड, ललिता भांडारकर, वर्षा चाफले, नवरंग मेश्राम, डॉ गणेश धोटे, जितेंद्र लांजेवार, राजु भोयर, चंद्रमनी घरडे, महेश बोंद्रे, अमित खंडे, कुणाल लेंडे यांनी सहकार्य केले. संचालन श्रेया वाडीभस्मे, आभार मुस्कान शेख यांनी मानले.

# उड्डाणपुलाला गडकरींनी दिले काँग्रेसच्या नेत्याचे नाव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
भाजप आणि काँग्रेस यांच्यात राजकीय वितुष्ट अतिशय टोकाचे असले तरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरातील एका उड्डाणपुलाला काँग्रेसच्या नेत्याचे नाव दिले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने देशभरात रस्ते, भुयारी मार्ग, उड्डाणपूल बांधण्याचा धडाका लावला आहे. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यत रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बोगदे उभारण्यात येत आहेत. नागपुरातही मोठ्या संख्येने उड्डाणपूल, भुयारी मार्गाचे काम सुरू आहेत.



नागपुरातील अमरावती मार्गावरील आरटीओ चौक ते फुटाळा चौकापर्यंतच्या उड्डाणपुलाचे उद्घाटन येत्या एक-दोन दिवसात होणार आहे. फुटाळा चौकाच्या दिशेने सर्व्हिस रोडचे काम केले जात आहे. या प्रकल्पासाठी विविध परवानगी मिळण्यात विलंब झाल्याने उड्डाणपुलाच्या पूर्णत्वासाठी वर्षभर प्रतीक्षा करावी लागली.

बोले पेट्रोल पंप चौकापासून सुरू होणारा हा उड्डाणपूल आरटीओ कार्यालयापुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा फुले परिसर, फुटाळा चौकापर्यंत २.८५ किमी लांबीचा आहे. शहरातील सर्वात वर्दळीचा हा उड्डाणपूल असून, उड्डाणपुलाला ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपूल असे नाव देण्यात आले आहे, तर वाडी पोलिस ठाणे ते गुरुद्वारा हा पहिला उड्डाणपूल १.९५ किमी लांबीचा आहे. पुलावरील वाहनांसाठी वेगमर्यादा ८० किमी प्रतितास निश्चित केली आहे.

पुलावर एकूण ७६६ सेग्मेंट्स बसविण्यात आले असून, लॉ कॉलेज चौकात मलेशियन तंत्रज्ञानाचा वापर करून ६५ मीटर लांबीचे, २५० टन वजनाचे ६ गर्डर्स उभारण्यात आले आहेत. महाराजबाग क्लबपासून सर्व्हिस रोडवरही वाहतूक सुरू केली जाणार आहे.

# फुटपाथवरील दोन वृक्ष पादचाऱ्यांसाठी धोकादायक



महासागर

## प्रभाग वार्ता

■ सुनील जेकब, नागपूर, दि. ११ :
नागपूर शहराच्या न्यायालयामागे, मस्जिद जवळचे दोन वृक्ष नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहेत. या झाडांच्या फांद्या रस्त्यावर लोंबकळत असून, त्यांना लागूनच वीजेच्या तारा आहेत.

प्रसंगी या झाडांमध्ये विद्युत प्रवाह येवून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होवू शकतो. फुटपाथवरून चालणाऱ्या लोकांना या झाडांच्या फांद्याचाही मोठाच अडथळा होत असून, मनपाने लक्ष पुरविण्याची मागणी होत आहे.

# मध्यवर्ती कारागृहात कैद्यांमध्ये राडा

## पाणी भरण्यावरून झाला वाद : आठवडाभरातील दुसरी घटना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
पाणी भरण्यावरून दोन कैद्यात वाद सुरू असताना तिसऱ्याच एका कैद्याची एंट्री झाली. सिनेस्टाईल त्याने दादागिरी दाखवित एकाची बाजू घेत दुसऱ्या कैद्याला बेदम मारहाण केली. तसेच त्याला ठार मारण्याची धमकी दिली.

कर्तव्यावर असलेले कारागृह रक्षक धावले. मध्यस्थी करून वाद सोडविला. ही घटना मंगळवारच्या सायंकाळी बडी गोल बरॅक एकच्या मागच्या भागात घडली.

या प्रकरणी धंतोली पोलिसांनी कारागृह रक्षक अमोल इखारकर यांच्या तक्रारीवरून दादागिरी करणाऱ्या कैद्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रवीण श्रीनिवास महाजन (३७) रा. कसबापेठ, पुणे असे त्या कैद्याचे नाव आहे. विशेष म्हणजे भांडण करणारे दोघे आणि दादागिरी करणारा असे तिघेही विचाराधीन कैदी आहेत.

आरोपी प्रवीण हा पुण्यातील चर्चित गुंड आहे. २०२१ मध्ये त्याने पुण्याच्या बुधवारपेठेत एका पोलिसावर चाकूने हल्ला करीत त्याचा खून केला होता. त्यावेळी प्रविण तडीपार होता.

याच वर्षी त्याला नागपूरच्या कारागृहात ठेवण्यात आले आहे. यशपाल नानकचंद चौहान हा मंगळवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास बडी गोल क्रमांक १ च्या मागच्या भागातील नळावर बादलीने पाणी भरत होता.

त्याच वेळी तोसिफ इब्राहिम शेख रा. ताजबाग हा नळावर गेला आणि यशपालची बादली बाजूला करुन त्याने स्वतःची बादली नळाखली लावली. यावरून यशपाल आणि तोसिफ यांच्यात वाद झाला.

दोघेही एकमेकांना शिवीगाळ करीत होते. दरम्यान प्रविण नळावर आला. दादागिरी करीत त्याने तोसिफला अश्लील शिवीगाळ करीत बेदम मारहाण सुरू केली. तसेच त्याला ठार मारण्याची धमकी दिली. याघटनेमुळे इतर कैद्यांमध्ये खळबळ उडाली. आरडा ओरड होताच पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

मध्यस्थी केल्याने त्यांच्यातील वाद मिटला. जखमी तोसिफला उपचारार्थ कारागृह रुग्णालयात भरती करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच धंतोली पोलिस घटनास्थळी पोहोचले. प्रविणविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### काही दिवसांपूवीर्ही घडली होती अशीच घटना

गेल्या मंगळवारीही मध्यवर्ती कारागृहात अशाच प्रकारची घटना घडली होती. दोन कैद्यांमध्ये क्षुल्लक कारणातून वाद झाला होता. यात एका कैद्याने टिकासीने हल्ला करीत दुसऱ्या कैद्याला गंभीर जखमी केले होते. ही घटना बरॅक क्र. २ जवळ घडली होती.

## हुडकेश्वर खुर्द येथे आपली बस टर्मिनल

# ईलेक्ट्रिक स्टार बस स्टॉपचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ११ :
नागपूर तालुक्यातील हुडकेश्वर खुर्द येथे सरपंच मीना कमलाकर शेंडे यांच्या हस्ते आपली बस टर्मिनल इलेक्ट्रिक स्टार एसी बस स्टॉप चे उद्घाटन करण्यात आले.

या बससेवेचा थांबा सुरु झाल्याने परिसरातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना प्रवासासाठी मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. या उपक्रमामुळे वाहतूक सुलभ व सोयीस्कर होणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

या बससेवेची सुरुवात केल्याबद्दल ग्रामपंचायतीतर्फे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानण्यात आले.

कार्यक्रमाला उपसरपंच शुभम हटवार, ग्रा. पं. सदस्य कुणाल कानफाडे, मंगला भगत, अर्चना बुरबुरे, शुभम पारसे, शारदा कास्टे, कोमल परतेकी, निःस्वार्थ संस्थेचे अध्यक्ष सचिन घोडे, माजी सरपंच कमलाकर शेंडे, माजी उपसरपंच अभय भगत, सुधाकर कास्टे, प्रवीण चरडे, विनोद शेंडे, आपली बस टर्मिनलचे सहारे ,मंगेश धांडे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.